**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय बाळकृष्ण खंडाळकर
१४६३, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक (प्रभारी अधीक्षक),
सहकारी संस्था (नागरी बँका), महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३६८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. संजय बाळकृष्ण खंडाळकर
१४६३, शुक्रवार पेठ, पुणे.

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री. प्रकाश अष्टेकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि. ६/४/२०११ रोजी प्रस्तुत अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु त्या दिवशी तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्यामुळे पुन्हा सुनावणीची तारीख मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री. संजय बाळकृष्ण खंडाळकर यानी केली. त्यानुसार दि. २७/६/२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले:

अपीलकर्ता - सहकार आयुक्त कार्यालयाच्या एका पत्राच्या संदर्भात माहिती मागितली होती. हे पत्र ज्या कागदपत्रांवर आधारित आहे त्या कागदपत्रांच्या प्रती, तसेच या प्रकरणातील मालमत्ताधारक सौ. उज्ज्वला संजय खंडाळकर यांच्या मालमत्तेच्या लिलावातील बेकायदेशीर खरेदी करुन भरलेल्या रकमांच्या चलनांच्या साक्षांकित प्रती मागितल्या होत्या. सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि नियम १९६१ नुसार काटेकोरपणे पालन न करता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी कार्यवाही केली असल्यामुळे ही माहिती मिळणे आवश्यक आहे. पुणे अर्बन को. ऑप. बँकेकडे संदर्भित कागदपत्रांची मागणी करुन देणे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर बंधनकारक आहे.

जन माहिती अधिकारी - श्री. संजय खंडाळकर व सौ.उज्ज्वला खंडाळकर यांच्या मालमत्तेच्या विक्रीबाबतची पुणे अर्बन को.ऑप. बँकेची कार्यवाही बेकायदेशीर असल्याची अपीलकर्ता श्री. संजय बाळकृष्ण खंडाळकर यांची तक्रार असून या संदर्भातील बँकेकडील कागदपत्रांची मागणी त्यानी केली आहे. त्याना हवी असलेली कागदपत्रे मागवून देणे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार संदर्भित बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही. या बँकेवर कारवाई करण्याची अपीलकर्त्यांची मागणी असून सहकार आयुक्तांच्या निर्णयाची कारणमीमांसा ते विचारत आहेत. आमच्या कार्यालयाकडून या संदर्भातील संपूर्ण संचिकेच्या छायाप्रती अपीलकर्त्यांना देण्यात आल्या असून न झालेली कागदपत्रे ते मागत आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. बँकेने केलेल्या

कार्यवाहीविषयीची तक्रार व त्याच्या अनुषंगाने कारवाईची मागणी, तसेच खुलासा, स्पष्टीकरण, अन्वयार्थ अशा स्वरुपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.प्रितम यशवंत पाटील
मु.पो.येवती, ता.करवीर, **अपीलकर्ता**
जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषि),**
पंचायत समिती करवीर, ता.करवीर,
जि.कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत येवती, ता.करवीर,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८६/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | २८.६.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**<br>ग्रामपंचायत येवती, ता.करवीर, जि.कोल्हापूर<br>श्री.दिलीप अशोक कांबळे<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषि),**<br>पंचायत समिती करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर<br>श्री.एस.पी.देसाई | |

| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** ग्रामपंचायत येवती च्या संपूर्ण दप्तराची पाहणी करणेबाबत |
|---|---|

## विवेचन

'मी मागणी केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती मला मिळाली असून त्यामध्ये काही अपूर्णतः नाही. त्यामुळे मी केलेले अपील निकाली ठेवण्यात यावे', असे अपीलकर्ता श्री.प्रितम यशवंत पाटील यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (कृषि), पंचायत समिती करवीर, ता.करवीर, जि.कोल्हापूर श्री.एस.पी.देसाई यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २८ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अल्लाउद्दीन काशीम अत्तार
मु.पो.आळते, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर २९३५,
सी वॉर्ड, जुना बुधवार पेठ, सोन्या मारूती चौक, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८० / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अल्लाउद्दीन काशीम अत्तार
मु.पो.आळते, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर २९३५, सी वॉर्ड,
जुना बुधवार पेठ, सोन्या मारूती चौक, कोल्हापूर श्री.हिरालाल शंकर मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, हातकणंगले,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.मोहन स. काळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : गवाच्या हद्दीत नसलेले गट घालून दोन वेगवेगळे नकाशे जन माहिती अधिकारी यानी दिले. नकाशा चुकीचा असल्यामुळे दुरूस्त केला पाहिजे.

जन माहिती अधिकारी : महावीर खाण कामगारांची मजूर सहकारी संस्थेच्या नकाशावरून प्रत्यक्ष मोजणी करून माहिती दिली.

अपिलीय प्राधिकारी : नकाशा चुकीचा असल्याचे अपीलकर्त्याचे म्हणणे असून त्याबाबत तक्रार असल्यास ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५अंतर्गत येत नाही.

अपीलकर्त्याची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र शिवराम खापरे
हणबर गल्ली, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१५ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामचंद्र शिवराम खापरे
हणबर गल्ली, कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूर
श्री.गुंडू तुकाराम पोवार

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, कोल्हापूर
श्री.एस.आर.चौगुले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : माझ्या भूखंडातून नगरपरिषदेच्या माजी अधिकाऱ्यानी रस्ता काढून केलेल्या अतिकमणाबद्दल सन १९९१ पासून तक्रार करीत असूनही मोजणी चुकीची करण्यात आली व अतिक्रमण काढलेले नाही. माझे दहा लाख रूपयाचे नुकसान झाले असून अतिक्रमण काढून भरपाई मिळावी.

<u>जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी</u> : अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असूनही प्रत्यक्ष जागेवर मोजणी करून अतिक्रमण काढून देण्यात आले. त्याबाबतचे फोटो व नकाशे आयोगापुढे सादर करीत आहोत. अपीलकर्त्यास माहितीही दिली आहे.

अतिक्रमण काढल्याचे निवेदन खोटे व छायाचित्रे दिशाभूल करणारी असल्याचे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.खापरे यानी केले. परंतु अपीलकर्त्याची तक्रार हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. ईश्वर अंकुश शेलार
निराळे वस्ती, गौरा नगर, मुरारजी पेठ,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** अधीक्षक,
महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८९/२०१०/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता :-** श्री. ईश्वर अंकुश शेलार<br>निराळे वस्ती, गौरा नगर, मुरारजी पेठ, सोलापूर | |
| ४ | **माहिती :-** मागणीच्या मुळ अर्जाची जोडपत्र - अ छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

आयोगाचा समक्रमांकाचा दि. १८.९.२०१० चा आदेश

श्री. ईश्वर अंकुश शेलार यांच्या अपिलावर राज्य माहिती आयोगाने पारित केलेल्या, दि. १८.९ .२०१० च्या आदेशामधील अ. क्र. २ मध्ये श्री. शेलार यांच्या अर्जावर माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सप्रमाण अहवाल जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर श्री. इब्राहिम बी. हुबळीकर यानी दि.१५.१०.१० पर्यंत आयोगाला सादर करण्याचे आदेशित करण्यात आले होते.

आयोगाच्या आदेशानुसार अहवाल सादर न केल्याने दि. ९.५.२०११ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर श्री. इब्राहिम बी. हुबळीकर याच्याकडून खुलासा मागविण्यात आला. त्यास अनुसरून दि. ३.१.२०११ रोजी माहिती दिल्याची अपीलकर्त्याची पोहोच जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर श्री. इब्राहिम बी. हुबळीकर यानी दि. १९.५.२०११ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केल्याचे अहवालात नमूद केले आहे. त्यानी अहवाल मुदतीत सादर केला नसून आयोगाच्या आदेशाचे अनुपालन केलेले नाही. तसेच अपीलकर्त्यास माहिती विलंबाने दिली. त्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर श्री. इब्राहिम बी. हुबळीकर शास्तीस पात्र ठरतात. यास्तव आयोगाचे सुधारित आदेश पुढीलप्रमाणे :-

## सुधारित आदेश

अपीलकर्ता श्री.ईश्वर अंकुश शेलार यांचा माहितीमागणीचा मूळ अर्ज दि. २८.१२.२००९ चा असून दोन वर्षे विलंबाने - म्हणजे दि.३.१.२०११ रोजी माहिती दिली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर श्री. इब्राहिम बी. हुबळीकर याना रू. २५०००/- शास्ती करण्यात येत आहे. अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर श्री. एस. डी. सोनवणे यांनी श्री. हुबळीकर याच्या जुलै २०११, ऑगस्ट २०११, सप्टेंबर २०११, ऑक्टोबर २०११ व नोव्हेंबर २०११ या महिन्याच्या अनुक्रमे ऑगस्ट २०११, सप्टेंबर २०११, आक्टोबर २०११, नोव्हेबर २०११ व डिसेंबर २०११ मध्ये मिळणा-या वेतनातून पाच हप्त्यात वसूल करुन ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा, रकमा, (१८), माहितीचा अधिकार (००७०००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. 27 JUN 2011

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रकाश बाबूराव सरताळे
तिसंगी, पो.सोनके, ता.पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय,
सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सरव्यवस्थापक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सोलापूर, २०७/८/९, गोल्डिफॅच पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९२ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रकाश बाबूराव सरताळे
तिसंगी, पो.सोनके, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालय, सोलापूर
प्रतिनिधी श्री.बी.एस.कटकदौंड

**जन माहिती अधिकारी** तथा सरव्यवस्थापक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सोलापूर, २०७/८/९, गोल्डिफॅच पेठ, सोलापूर प्रतिनिधी श्री.सी.आर.राठोड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : 'जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अधिकारी चोराना सामील' अशी बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती. ती खरी आहे का? अशी विचारणा करून त्या अनुषंगाने माहिती मागितली होती. ती अपुरी दिली.

जन माहिती अधिकारी : संबंधित बातमीत तथ्य नसल्याचे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले. अपीलकर्त्यांनी बँकेच्या कर्मचाऱ्यांबाबत बदनामीकारक भाषा वापरून बिनबुडाचे आरोप करून त्या अनुषंगाने माहिती म्हणून विचारणा केली आहे. तसेही स्पष्ट केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. केलेली विचारणा उपरोक्त अधिनियमातील माहितीच्या संज्ञेत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र नारायण जाधव
१०० फूटी रोड, माळी वस्ती, यशवंतनगर, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (आस्था),
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२८ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.विजय यशवंत कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी (आस्था), सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.जयंत विश्वनाथ नाईक

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री.रामचंद्र नारायण जाधव यानी दि.२५.३.२०१० च्या अर्जान्वये खात्याअंतर्गत पदोन्नती समितीच्या संदर्भात मागितलेली माहिती दि.१९.४.२०१० च्या पत्रान्वये देण्यात आली. सन १९९८ ते आजअखेर अशा स्वरूपात त्यानी विस्तृत माहिती मागितली होती. त्या मुद्दयांबाबतच्या अभिलेखाचे अवलोकन करण्यासाठी कळवूनही ते आले नाहीत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली यांच्या आदेशानुसार फेरसुधारित माहितीही त्यानी दिलेल्या मुदतीत पुरविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी (आस्था), सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, जि.सांगली श्री.जयंत विश्वनाथ नाईक यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विकास भालचंद्र कोल्हटकर
खाडीलकर वस्ती, बालगंधर्व नाट्यगृहासमोर, मिरज, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग, ता.मिरज, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४३८ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ता.मिरज, जि.सांगली श्री.एम.व्ही.खद्दे

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ता.मिरज, जि.सांगली श्री.एस.एस.पवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.विकास भालचंद्र कोल्हटकर यानी अपील क्र.१६४३/२०१०/सांगली मध्ये मागितलेली माहितीच प्रस्तुत अपिलातही मागितली असून ती देण्यात आली आहे व आयोगाने या प्रकरणी अपील क्र.१६४३/२०१०/ सांगली मध्ये निर्णयही दिलेला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ता.मिरज, जि.सांगली श्री.एस.एस.पवार यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत बापूराव घोडके
लक्ष्मीनगर, प्लॉट नं.२, कुपवाड रोड, सांगली-४१६४१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६८४ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा
श्री.सदानंद वायसे-पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री.शशिकांत बापूराव घोडके यानी सेवानिवृत्तीनंतरच्या देय रकमेतून अनुज्ञप्ती शुल्क वसूल करण्याबाबतची माहिती मागितली होती. तसेच काही मुद्दयांचा खुलासा विचारला होता. माहिती घेण्यास ते आले नसल्यामुळे दिलेली नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा श्री.सदानंद वायसे-पाटील यानी केले. खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास देय असलेली माहिती रजिस्टर पोस्टाने अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा यानी दहा दिवसात पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्योतीराम वामन राक्षे
मनिषा कॉलनी, सुभाषनगर, मिरज, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग,
ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४९ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली
प्रतिनिधी श्री.दत्तात्रय बबनराव कवितके

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, ता.मिरज, जि.सांगली
श्री.दत्तात्रय बबनराव कवितके

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

अकस्मात मयत प्रकरणातील उपविभागीय दंडाधिकारी यांचा निर्णय प्रसिध्द झालेल्या राजपत्राची मागणी अपीलकर्ता श्री.ज्योतीराम वामन राक्षे यानी केली होती. संबंधित प्रकरण अंतिम वर्गीकरणासाठी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याकरीता शासनाकडे पाठविण्यात आले असल्याचे त्याना मुदतीत कळविले. त्यावरील त्यांचे अपील अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली यानी अमान्य केले. राजपत्रातील प्रसिध्दीसाठी संबंधित यादी शासकीय मुद्रणालयाकडे पाठविण्यात आली असून राजपत्राची प्रत प्राप्त होताच अपीलकर्त्यास देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, ता.मिरज, जि.सांगली श्री.दत्तात्रय बबनराव कवितके यानी पूरक कागदपत्रांसह केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजू शामराव कांबळे
गंगानगर, हिंदू-मुस्लिम कॉलनी, जुना हरिपूर रोड, मिरज, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण, तहसील कार्यालय, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण,
तहसील कार्यालय, फलटण, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५२ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजू शामराव कांबळे
गंगानगर, हिंदू-मुस्लिम कॉलनी, जुना हरिपूर रोड, मिरज, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, फलटण, तहसील कार्यालय, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा श्री.गजानन वा.गुरव

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : सन १९७८ ते १९९५ या कालावधीतील कागदपत्रे व सन १९७८ मधील ७/१२ उताऱ्याच्या प्रती मागितल्या होत्या. परंतु वाटपपत्राची प्रत मिळाली नाही.

<u>जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी</u> : अपीलकर्त्यास उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती दिल्या. मात्र सन १९७८ मधील वाटपपत्राचा शोध घेवूनही ते आढळले नाही, त्यामुळे माहिती देता आली नाही. त्याचा शोध घेत असून उपलब्ध होताच अपीलकर्त्यास त्याची प्रत देण्यात येईल.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. संबंधित वाटपपत्राचा अधिक शोध घेवून जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण, तहसील कार्यालय, फलटण, ता.फलटण, जि.सातारा यानी अपीलकर्त्यास मर्यादित मुदतीत कळविणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मीकांत गुरूबसप्पा तेलूर
राधानगरी रोड, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, २९३५, सी वॉर्ड,
जुना बुधवार पेठ, सोन्या मारूती चौक, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
करवीर तालुका, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८७ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, २९३५, सी वॉर्ड,
जुना बुधवार पेठ, सोन्या मारूती चौक, जि.कोल्हापूर श्री.हिरालाल शंकर मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
करवीर तालुका, जि.कोल्हापूर श्री.सुरेश शिवमूर्ती रेड्डी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

मिळकतीच्या मोजणीच्या अनुषंगाने नियमातील तरतुदी व काही तरतुदींच्या अन्वयार्थाच्या अनुषंगाने स्पष्टीकरण, अशी विचारणा अपीलकर्ता श्री.लक्ष्मीकांत गूरूबसप्पा तेलूर यानी केली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीत अशा प्रकारची विचारणा करता येत नसल्याचे एका आठवड्यात कळविले. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी यानीही तो निर्णय कायम केला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, करवीर तालुका, जि.कोल्हापूर श्री.सुरेश शिवमूर्ती रेड्डी व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, २९३५, सी वॉर्ड, जुना बुधवार पेठ, सोन्या मारूती चौक, जि.कोल्हापूर श्री.हिरालाल शंकर मोरे यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पांडुरंग आबाजी साळवे
मु.पो.दहिगाव, ता.माळशिरस, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस,
ता.माळशिरस, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस,
ता.माळशिरस, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५१ / २००९ / साळवे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पांडुरंग आबाजी साळवे
मु.पो.दहिगाव, ता.माळशिरस, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, ता.माळशिरस,
जि.सोलापूर श्री.प्रशांतसिंह मरोड

| | | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, ता.माळशिरस, जि.सोलापूर विद्यमान-श्री.अजितकुमार निलकंठ देशपांडे, तत्कालीन-श्री.विजय नारायण मोरे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : विहिरीच्या नोंदीबाबत खोट्या नोंदी केल्या असून, चुकीचे दस्तऐवज तयार झाले आहेत. माहिती मिळाली. परंतु दस्तऐवजात दुरूस्ती होणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी : संबंधित शेती अधिकाऱ्याकडून माहिती प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास पुरविली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. ३० जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक सिद्रामप्पा नालवार
बी-७, मंगल रेसिडेन्सी, आसरा चौकाजवळ, होटगी रोड, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष कार्यकारी अधिकारी (हद्दवाढ),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सार्वजनिक आरोग्य अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१७६ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक सिद्रामप्पा नालवार
बी-७, मंगल रेसिडेन्सी, आसरा चौकाजवळ, होटगी रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष कार्यकारी अधिकारी (हद्दवाढ),
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर श्री.अनिल विपत

**जन माहिती अधिकारी** तथा सार्वजनिक आरोग्य अभियंता,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर प्रतिनिधी श्री.आर.एम.गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : जलशुध्दीकरण केंद्रातील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन दिले. परंतु जादा पूरक भत्ता जुन्याच दराने दिला. त्याबाबतच्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय प्राधिकारी : सुधारित दराने वेतन देण्यात येत असले तरी जादा पूरक भत्त्यामध्ये सन १९८६ नंरत महानगरपालिकेने वाढ केलेली नाही. तसे अपीलकर्त्यास वेळावेळी स्पष्ट केले आहे.

अपीलकर्त्याची सुधारित भत्ते देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास अभिलेखाचे अवलोकन करून अपीलकर्त्यास प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मेघनाथ रमजान लोकरे
मु.पो.भिमनगर, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी
कार्यालय, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२४३ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मेघनाथ रमजान लोकरे
मु.पो.भिमनगर, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर तत्कालीन-श्री.सुरेश चंद्रकांत गरूड

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,
मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.शामराव चंदू गस्ते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.मेघनाथ रमजान लोकरे यानी केली. मात्र चार वर्षांच्या कालावधीतील विस्तृत स्वरूपाची माहिती अपीलकर्त्यांनी मागितली असून अर्जाला योग्य ते मुद्रांक शुल्क जोडलेले नसल्यामुळे अर्ज व अपील ग्राह्य धरलेले नाही. दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना नि:शुल्क अर्ज व अपिलाची सवलत असल्याचे अपीलकर्त्यांनी निदर्शनास आणून दिले असले तरी एवढी माहिती नि:शुल्क देणे कार्यालयीन खर्चात शक्य नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.शामराव चंदू गस्ते यानी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींची पूर्ण माहिती जन माहिती अधिकारी याना असणे व त्यावर कार्यवाही होणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.शामराव चंदू गस्ते व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.सुरेश चंद्रकांत गरूड याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# <u>आदेश</u>

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.मेघनाथ रमजान लोकरे यानी अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी करावी. कार्यालयाकडील उपलब्ध आर्थिक तरतुदीत शक्य असेल तेवढ्या प्रती जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर यानी नि:शुल्क पुरवाव्यात.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.एम.कन्नाबिरान
१/४, डिफेन्स सिव्हिलियन क्वार्टर्स, लुल्लानगर, पुणे-४११०४० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, नागरिक सुविधा केंद्र,
जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.एम.कन्नाबिरान
१/४, डिफेन्स सिव्हिलियन क्वार्टर्स, लुल्लानगर, पुणे-४११०४०

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे डॉ.जयश्री कटारे

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, नागरिक सुविधा केंद्र,
जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे श्री.डी.पी.गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : माझ्या मुलाचा जन्म व शिक्षण महाराष्ट्रातच झाले आहे. परंतु इतर मागासवर्गीय असल्याचा दाखला मात्र दिला जात नाही. त्याबद्दलची नियमानुसारच्या प्रक्रियांची माहिती मागितली. उत्तर मिळाले, परंतु माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी : अन्य राज्यातील इतर मागासवर्गीय असल्याचा दाखला या राज्यातून दिला जात नाही. तसे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले.

अपिलीय प्राधिकारी : संबंधित सर्व शासन निर्णयाच्या प्रती देण्याचे आदेश प्रथम अपिलाच्या दरम्यान दिले. अन्य राज्याच्या शासन निर्णयाची माहिती आम्ही देऊ शकत नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हनुमंत गोरख साळुंके
मु.सातोली, पो.उपळवाटे, ता.करमाळा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, सातोली विविध कार्यकारी सेवा सहकारी
संस्था मर्यादित, सातोली, ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३००८ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.एस.बी.शिरशेटवार

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, सातोली विविध कार्यकारी सेवा सहकारी
संस्था मर्यादित, सातोली, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.मन्सूर गुलाब दस्तगीर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सातोली विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, सातोली, ता.करमाळा, जि.सोलापूर या संस्थेला कोणतेही सरकारी अनुदान व अर्थसहाय्य नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तरीही माहिती दिली. केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने अपीलकर्ता वारंवार अर्ज करीत असतात, असे प्रतिपादन सचिव, सातोली विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, सातोली, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.मन्सूर गुलाब दस्तगीर यानी केले. संस्थेला शासकीय अनुदान व अर्थसहाय्य मिळत नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.एस.बी.शिरशेटवार यानी नमूद केले.

वरील निवेदने लक्षात घेता सातोली विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, सातोली, ता.करमाळा, जि.सोलापूर या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तरीही माहिती देण्याची सचिव श्री.मन्सूर गुलाब दस्तगीर यांची कृती उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नागेश मारूती खटके
मु.पो.लिंगीवरे, ता.आटपाडी, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
आटपाडी, ता.आटपाडी, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत लिंगीवरे, ता.आटपाडी, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७५४ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नागेश मारूती खटके
मु.पो.लिंगीवरे, ता.आटपाडी, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आटपाडी,
ता.आटपाडी, जि.सांगली श्री.कृष्णदेव रामचंद्र पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत लिंगीवरे,
ता.आटपाडी, जि.सांगली श्री.राजेंद्र धर्मराज ऐवळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : लिंगीवरे गावाच्या एकूण क्षेत्रफळाबाबतची माहिती मागितली होती. परंतु वारंवार स्मरण देऊनही पूर्ण व समाधानकारक माहिती मिळाली नाही.

<u>तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी</u> : गावाच्या एकूण क्षेत्रफळाबाबतची नोंद ग्रामपंचायत दप्तरी असलेल्या नमुना नं.१ ते २७ मध्ये उपलब्ध नाही. गाव कामगार तलाठ्यांकडे ती मिळू शकते. तसे कळविले. तसेच अन्य मुद्दयांबाबतही अभिलेखानुसार माहिती दिली. सन २००० ते २००४ या कालावधीत ग्रामपंचायतीने ठराव न करता काही व्यक्तींना झोपड्या बांधू दिल्या व चुकीच्या नोंदी केल्या, अशी अपीलकर्त्यांची तक्रार आहे. परंतु ही बाब स्वतंत्र चौकशीची आहे.

झोपड्यांच्या बांधकामासंदर्भातील अपीलकर्त्याची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील निर्णयाचा विषय नाही. गावाचे एकूण क्षेत्रफळ मात्र गावकामगार तलाठ्याकडून प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास कळविणे व ग्रामपंचायत दप्तरातही त्याची नोंद असणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत लिंगीवरे, ता.आटपाडी, जि.सांगली यानी संपूर्ण गावाच्या एकूण क्षेत्रफळाची माहिती गाव कामगार तलाठी यांच्याकडून प्राप्त करून घेऊन अपीलकर्त्यास पुरवावी व ग्रामपंचायत दप्तरी नोंदवावी.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २८ जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश तुकाराम टेंगले
सि.स.नं. ६४७८, हॉटेल कुमार शेजारी, अहिल्यादेवी होळकर चौक,
जुना कुपवाड रोड, शिंदे मळा, सांगली, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग,
मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५३ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सांगली
प्रतिनिधी श्री.दत्तात्रय कवितके

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग,
मिरज, जि.सांगली श्री.दत्तात्रय कवितके

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

ग्रामपंचायत हद्दीत उभारण्यात आलेल्या बेदाणा निर्मिती शेडबाबतची सन १९८९ ते आजअखेर माहिती अपीलकर्ता श्री.सुरेश तुकाराम टेंगले यानी विशिष्ट तक्त्यात संकलित करून व साक्षांकित करून मागितली हाती. विहित मुदतीत उत्तर देऊन वाढीव मुदत घेतली व त्यानुसार माहिती पुरविली. दिलेल्या माहितीवर 'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दिलेली माहिती'असा शिक्का आहे. परंतु त्या साक्षांकित प्रती नसल्यामुळे दंड करावा, अशी अपीलकर्त्याची मागणी आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीदरम्यानही त्यानी ही तक्रार केली होती. त्यावेळी सहीशिक्क्यासह सत्यप्रती देण्यात आल्या आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग, मिरज, जि.सांगली श्री.दत्तात्रय कवितके यानी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती दिल्याचा शिक्का प्रत्येक प्रतीवर असून साक्षांकित प्रती करून देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तरीही अपीलकर्त्यास मागणीनुसार सत्यप्रती करून देण्यात आलेल्या आहेत. हे उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मारूती हिंदूराव पाटील
बांबवडे, ता.पलूस, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, पलूस, ता.पलूस, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बांबवडे,
ता.पलूस, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५०४ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मारूती हिंदूराव पाटील
बांबवडे, ता.पलूस, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पलूस, ता.पलूस, जि.सांगली
श्री.रविंद्र शशिकांत मठकरी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बांबवडे, ता.पलूस, जि.सांगली
श्री.ए.एल.लोखंडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : शेतातील घराला नागरी सुविधा दिल्या नसतानाही घरपट्टी लावली आहे, हे बेकायदेशीर आहे. त्याबाबतचे समाधानकारक स्पष्टीकरण दिले जात नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : शासकीय नियमानुसार कर आकारण्यात आला आहे. नियमाचा तपशील अपीलकर्त्यास दिलेला आहे.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून कराबाबतची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मानसिंगराव दत्तू खोत
मु.पो.नरंदे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
वाळवा-इस्लामपूर, ता.इस्लामपूर, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, द्वारा-सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, वाळवा-इस्लामपूर, ता.इस्लामपूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६५२ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मानसिंगराव दत्तू खोत
मु.पो.नरंदे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाळवा-इस्लामपूर,
ता.इस्लामपूर, जि.कोल्हापूर श्री.जे.पी.शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, द्वारा-सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
वाळवा-इस्लामपूर, ता.इस्लामपूर, जि.कोल्हापूर श्री.बी.एच.मोकाशी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : दि आष्टा पिपल्स को-ऑप.बँक लि., आष्टा या बँकेच्या संदर्भात लोकशाही दिनात दिलेल्या तक्रारीवर जिल्हाधिकारी कार्यालयाने तत्काळ उत्तर द्यावयाचे असताना दहा महिने झाले तरी का उत्तर दिले नाही, याचा खुलासा विचारला होता. ल तक्रार केली होती. तक्रारीवर त्वरित व योग्य कार्यवाही केली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : जिल्हाधिकाऱ्यानी दिलेल्या आदेशानुसार तक्रार अर्जावर कार्यवाही करून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था याना अहवाल सादर केला. त्याची प्रत जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्याना दिली. केंद्र सरकारच्या कर्जमाफी योजनेत कर्ज माफ झाले नाही, याबद्दलची त्यांची मुख्य तक्रार आहे.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. प्रशासकीय कार्यवाहीविषयीची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५अंतर्गत येणारा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
मु.पो.जा.शिरोळ, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७१२ / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी<br>मु.पो.जा.शिरोळ, जि.कोल्हापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर<br>श्री.सूर्यकांत पाटील | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : श्री.शंकर बाबू पाडळकर यांच्या शिफारशीनुसार जुलै १९९५ मध्ये स्वातंत्र्यसैनिक लाभार्थी म्हणून श्री.सूर्यवंशी नोकरीस लागले आहेत का, अशी माहिती मागितली होती. दोन दिवस विलंबाने व अर्थबोध न होणारी माहिती दिली. अपिलीय प्राधिकारी यानी प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही व निर्णय दिला नाही. माहिती जाणीवपूर्वक दडविली जात आहे.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्याच्या दि.२२.४.२०१० च्या अर्जात अपेक्षित असलेल्या माहितीचा नेमका बोध होत नाही. नेमका, सुस्पष्ट व तपशीलवार अर्ज करावा असे तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यानी दि.१६.५.२०१० च्या पत्रान्वये कळविले. त्यानंतर अपीलकर्त्यानी स्पष्टीकरण दिले नसतानाही नावाच्या आधारे पूर्वीच्या कागदपत्रांचा शोध घेतला असता जुलै १९८८ मध्ये श्री.पाडळकर यांचे वारस म्हणून घोषित केलेल्या त्यांच्या भाच्याला प्राथमिक शिक्षक पदावर नोकरी दिली असल्याचे आढळले. ही माहिती सोबत आणली असून ती देत आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याची मागणी सुस्पष्ट नाही. जन माहिती अधिकाऱ्यानी विहित मुदतीत उत्तर दिले असून अभिलेखात अधिक शोध घेऊन पूरक माहितीही सादर केली आहे. माहिती मागताना अपीलकर्त्यानी नेमका तपशील देणे आवश्यक असून संदिग्ध विचारणीच्या आधारे अपेक्षित असलेली माहिती मागणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ग्राह्य धरता येणार नाही. मात्र अपिलीय प्राधिकाऱ्यानी उक्त अधिनियमातील विहित मुदतीत सुनावणी घेऊन अथवा कागदपत्रांच्या तपासणीवरून अपिलाचा निर्णय देणे बंधनकारक आहे, याची समज अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरगोंडा आण्णा पाटील
१६९०, लाळगे गल्ली, पंचमुखी मारूती रोड, खण भाग, सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण मंडळ, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक व लेखापाल, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण मंडळ, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३३ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरगोंडा आण्णा पाटील
१६९०, लाळगे गल्ली, पंचमुखी मारूती रोड, खण भाग, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण मंडळ, सांगली श्री.अनिल अमृत पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक व लेखापाल, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, प्राथमिक शिक्षण मंडळ, सांगली श्री.राजाराम लिंगप्पा माळी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : माझ्या पत्नीच्या भविष्य निर्वाह निधीची व महागाई भत्त्यातील फरकाची रक्कम १९ महिने झाले तरी मिळाली नाही. या विलंबाची कारणे व त्याला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे, ही माहिती दिली नाही. पत्नीच्या सेवानिवृत्तीनंतर सहा महिने होऊनही सेवानिवृत्ती वेतन चालू केले नाही व अन्य रकमा मिळाल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्याच्या पत्नीने नामनिर्देशन दिले नसल्यामुळे सेवानिवृत्ती वेतन देता आले नाही. भविष्य निर्वाह निधीची रक्कम शेतकरी सहकारी बँकेत होती. ती बॅक अवसायनात गेली असून अनेक कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम द्यावयाची राहिली आहे. या प्रकरणी न्यायालयात दावा चालू आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे अपीलकर्ता यांच्या पत्नीने दिलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार सेवानिवृत्ती वेतन सुरू करण्यात आले आहे. सर्व माहिती दिली असून प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये येत नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गणेश किसनराव माने
मु.पो.मणदुर, ता.शिराळा, जि.सांगली -४१५४१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे मंडळ,
सिंचन भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, वारणा कालवे विभाग क्र.१,
पेठ कॉलनी, इस्लामपूर, जि.सांगली -४१५४१५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६७८ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गणेश किसनराव माने
मु.पो.मणदुर, ता.शिराळा, जि.सांगली -४१५४१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, सिंचन भवन, ताराबाई पार्क, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.मल्लाप्पा रामचंद्र मेटकरी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, वारणा कालवे विभाग क्र.१, पेठ कॉलनी, इस्लामपूर, जि.सांगली श्री.मल्लाप्पा रामचंद्र मेटकरी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : पाटबंधारे विभागाच्या वसाहतीमधील वारणा टी.व्ही.केबल यांना विजेचे बिल आले असतानाही त्यांच्याकडून बिल घेतले जात नसल्याचे चुकीचे उत्तर दिले आहे. खडी क्रशरला दिलेली दगड उचलण्याची परवानगी एका कंपनीला दिल्याचे उत्तर जन माहिती अधिकाऱ्यानी दिले. परंतु हे काम आपल्याकडे नसल्याचे या कंपनीने कळविले आहे. अशा प्रकारे खोटी माहिती जन माहिती अधिकाऱ्यानी दिली आहे.

जन माहिती अधिकारी : वीज मंडळाकडून त्या त्या मीटर धारकाच्या नावे बिल पाठविले जात असले तरी शासनाच्या वतीनेच ते भरले जाते. त्याची माहिती अपीलकर्त्यास दिली आहे. खडी क्रशरच्या संदर्भात संबंधित कंपनीने ज्यांच्याकडे काम सोपविले त्याचे नाव व त्याबाबतचा पुरावाही अपीलकर्त्यास दिला आहे. कोणतीही माहिती खोटी नाही.

अपीलकर्त्यांनी कंपनीचे म्हणून जे पत्र सादर केले त्यातही जन माहिती अधिकाऱ्यानी सांगितल्याप्रमाणेच स्पष्ट नोंद आहे, असे असताना दिशाभूल करण्याचा प्रयत्न अपीलकर्त्यांनी केला. त्याबद्दल त्याना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुकुमार ज्ञानदेव पोवार
कार्यकारी संचालक, बाबासाहेब देशमुख शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या.,
आटपाडी, ता.आटपाडी, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (प्रशासन), संचालनालय वस्त्रोद्योग,
महाराष्ट्र राज्य, जुने सचिवालय इमारत, जिपीओसमोर, सिव्हिल लाईन, नागपूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक, बाबासाहेब देशमुख शेतकरी
सहकारी सूतगिरणी मर्या., आटपाडी, ता.आटपाडी, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७१८ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.सुकुमार ज्ञानदेव पोवार<br>कार्यकारी संचालक, बाबासाहेब देशमुख शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्या.,<br>आटपाडी, ता.आटपाडी, जि.सांगली प्रतिनिधी श्री.रहिमतुल्ला अहमद तांबोळी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

बाबासाहेब देशमुख शेतकरी सहकारी सूतगिरणी मर्यादित, आटपाडी, ता.आटपाडी, जि.सांगली या संस्थेकडून कोणतीही माहिती मिळाली नसल्याची तक्रार मूळ अर्जदार श्री.सुधीर अच्युतराव देशमुख यानी केली होती.

मात्र या सूतगिरणीला शासनाकडून भाग भांडवल वा अन्य प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अनुदान मिळत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदीनुसार संस्थेला उक्त अधिनियम लागू होत नाही. तरीही माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. संस्थेला उक्त अधिनियम लागू होत नसल्यामुळे मूळ अर्जदार श्री.देशमुख यांच्या प्रथम अपिलावर अपिलीय प्राधिकाऱ्यानी दिलेला आदेश रद्द करावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुकुमार ज्ञानदेव पोवार यानी केली.

उपरोक्त सूतगिरणीला शासनाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अनुदान वा अर्थसहाय्य असल्याचा पुरावा मूळ अर्जदारानी सादर केलेला नाही. तसेच अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयातही त्याचा उहपोह केलेला नसून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ३२ अन्वये सभासदास माहिती देण्याचा उल्लेख आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारी नाही. सबब अपीलकर्त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक (प्रशासन), संचालनालय वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, जुने सचिवालय इमारत, जिपीओसमोर, सिव्हिल लाईन, नागपूर यांचा निर्णय रद्द करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मुकुंद गोविंद मोरे
गोकुळ शिरगांव, घर नं. ५६५, अपीलकर्ता
एम.आय.डी.सी. माळवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (I),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक,
नगररचना कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७१७/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |
| | अन्य अपिले -अपिल क्र. ४४८/२०१०/कोल्हापूर, अपील क्र. ४४९/२०१०/ कोल्हापूर, अपील क्र.२६११/२०१०/कोल्हापूर आणि अपील क्र. २६१२/२०१०/कोल्हापूर | |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मुकुंद गोविंद मोरे
गोकुळ शिरगांव, घर नं. ५६५, एम.आय.डी.सी. माळवाडी,
ता. करवीर, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (I),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. संजय हिराप्पा हेरवाडे

| | | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक,<br>नगररचना, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. मारुती दगडू राठोड<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता,<br>विभाग क्र. ३, राजारामपुरी, कोल्हापूर महानगरपालिका,<br>जि. कोल्हापूर श्री. रमेश कृष्णकांत मस्कर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहा. अभियंता,<br>विभाग क्र. ३, राजारामपुरी, कोल्हापूर महानगरपालिका,<br>जि. कोल्हापूर श्री. विजय रामचंद्र पाटील<br><br>**तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा सहा. संचालक,<br>नगररचना, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.म.य.देवडे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - नगररचना योजनेत आमच्या मालकीची ३० फूटांऐवजी ४० फूट जागा घेतली. आमच्या मालकीच्या जागेत बेकायदेशीरपणे रस्ता केला. हा आमच्या जीवन-मरणाचा प्रश्न असल्यामुळे ४८ तासात माहिती देण्याची मागणी करुनही माहिती मिळाली नाही. जागेच्या क्षेत्रफळाची माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्ता एकाच जागेच्या संदर्भात त्याच त्याच माहितीसाठी सातत्याने अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करीत आले आहेत. वेळोवेळी त्याना माहिती देण्यात आली. तसेच सर्व अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिले. एवढेच नाही, तर त्यांच्या समवेत प्रत्यक्ष जागेवर मोजणी करुन नकाशाची प्रतही दिली. तरीही पुनःपुन्हा त्याच स्वरुपाची अपिले ते करीत आहेत. आयोगाने यापूर्वी याच विषयाबाबतची त्यांची अपील क्र. ३४५/२०१०/कोल्हापूर,

अपील क्र. ३५३/२०१०/कोल्हापूर व अपील क्र. १९६६/२००९/कोल्हापूर ही अपिले निकाली काढली आहेत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता प्रशासकीय कार्यवाहीबाबतच्या तक्रारीसाठी अपीलकर्ता वेळोवेळी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५- अंतर्गत अपिले करीत आहेत. त्यांची मागणी उपरोक्त अधिनियमाच्या कक्षेतील नाही, याची समज आयोगाने यापूर्वी देऊनही अपीलकर्ता तशाच मागणीची पुनरावृत्ती करीत आहेत. अशा प्रकारे कार्यालयीन वेळ व यंत्रणा याचा अपव्यय त्यानी करणे योग्य नाही. त्यामुळे अपीलकर्त्यांच्या याच मागणी संदर्भातील अपिलांची दखल यापुढे घेतली जाणार नाही, याची समज अपीलकर्त्यास प्रस्तुत अपिलाच्या सुनावणीच्या वेळी देण्यात आली आहे. त्यानुसार याच संदर्भातील अपीलकर्त्यांची अपील क्र.४४८/२०१०/कोल्हापूर, अपील क्र. ४४९/२०१०/कोल्हापूर, अपील क्र. २६११/२०१०/ कोल्हापूर आणि अपील क्र. २६१२/२०१०/कोल्हापूर ही अपिले आयोगाकडे दाखल केली असून त्याबाबतही हा निर्णय लागू राहील. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी रामचंद्र चव्हाण
मु.पो.रांजणी, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कवठे महांकाळ, तहसील कार्यालय,
कवठे महांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कवठे महांकाळ,
तहसील कार्यालय, कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७३६ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.शिवाजी रामचंद्र चव्हाण<br>मु.पो.रांजणी, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कवठेमहांकाळ, तहसील कार्यालय, कवठे महांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली तत्कालीन-श्री.रविंद्र बोंबले<br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कवठे महांकाळ, तहसील कार्यालय, कवठे महांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली श्री.पांडुरंग लक्ष्मण माने | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : कवठेमहांकाळ तालुक्यातील कुळ कायद्याच्या अंमलबजावणीबाबतची व तत्कालीन अभिलेखातील नोंदीबाबतची सन १९४८ ते १९६० या काळातील माहिती व काही आदेशांच्या

प्रतींची मागणी केली होती. माझे नाव शिवाजी रामचंद्र चव्हाण असे असताना पोपट रामचंद्र चव्हाण या नावाने माहिती पाठविली. जाणीवपूर्वक माहिती नाकारण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्याच्या दि.२४.६.२०१० च्या अर्जाला दि.१९.७.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. कवठेमहांकाळ तालुका सन १९६८ मध्ये अस्तित्वात आला असून अपीलकर्त्यांनी त्याच्याही आठ वर्षांपूर्वीची प्रदीर्घ कालखंडातील माहिती मागितली आहे. नियमावलीबाबत सार्वजनिकरीत्या पुस्तिका उपलब्ध असून ती घेण्याचे मुद्देनिहाय उत्तरात कळविले. श्री.पोपट रामचंद्र चव्हाण हे त्यांचे प्रचलित नाव असल्यामुळे त्या नावाने टपाल पाठविले. ते त्यानी स्वीकारले नाही. त्यामुळे मूळ अर्जातील नावाने पुन्हा माहिती पाठविली. त्यानी ज्या दाव्यातील नकला मागितल्या आहेत, तो सन १९७० मधील आहे. त्यांच्या नकलातील निष्कर्षाचे स्पष्टीकरण ते मागत असून ते देता येणार नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असलेल्या अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, कवठेमहांकाळ, तहसील कार्यालय, कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली यानी अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित संचिकांचे अवलोकन करू देऊन लेखी मागणी केल्यास ५० पृष्ठापर्यंतच्या प्रती निःशुल्क द्याव्यात.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास बाबुराव सगरे
लेंगरे, ता.विटा, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी, विटा-१, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कंपनी, विटा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२७४ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विलास बाबुराव सगरे
लेंगरे, ता.विटा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
विटा-१, जि.सांगली तत्कालीन-श्री.वसंत दत्तात्रय कुंभार

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,
विटा, जि.सांगली श्री.अविनाश रामराव पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : नवीन ट्रान्सफॉर्मर व कनेक्शन या संदर्भातील सन २००७-२००८ मधील माहिती दोन अर्जांद्वारे मागितली होती. ती विलंबाने व अपुरी मिळाली.

जन माहिती अधिकारी : देन अर्जांद्वारे विस्तृत स्वरूपाची माहिती अपीलकर्ता यानी मागितली होती. माहिती मुदतीत दिली. ती त्यानी स्वीकारली. परंतु काही प्रती ज्या कागदपत्रांमध्ये नसल्याचे नंतर त्यानी निदर्शनाला आणून दिले चुकून राहिलेल्या या प्रती लगेच दिल्या. मूळ अर्जामधील पूर्ण माहिती दिली असून आता नवीन कनेक्शनबाबतचा अहवाल ते मागत आहेत. ही मागणी मूळ अर्जात नाही.

दोन अर्जांबाबत एकच अपील करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. तसेच मूळ अर्जात मागितलेल्या व्यतिरिक्तची माहिती त्याच अर्जाचा भाग म्हणून अपिलात व अन्य पत्रव्यवहाराद्वारे मागता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भाऊसाहेब धोंडिबा गावडे
केंदूर, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
पुणे जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६० / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे
श्री.दत्तात्रय पांडुरंग झेंडकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे
श्री.पोपट दगडू भंडारे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

प्राथमिक शाळेतील अपहार प्रकरणी एप्रिल २००८ मध्ये केलेल्या तक्रारीबाबतच्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री.भाऊसाहेब धोंडिबा गावडे यानी मागितली होती. मूळ विषय सन १९९४-९५ मधील असून पोलीस अधीक्षक, ग्रामीण यांच्याकडे रितसर पत्र देण्यात आले आहे. तशी माहिती अपीलकर्त्यास दिलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.पोपट दगडू भंडारे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे श्री.दत्तात्रय पांडुरंग झेंडकर यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बी.एन.शिंदे
गणेशखिंड, पुणे पी.बी.नं.१३, पुणे-४११००७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पारनेर, तहसील कार्यालय, पारनेर,
ता.पारनेर, जि.अहमदनगर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, पारनेर,
तहसील कार्यालय, पारनेर, ता.पारनेर, जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८५ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बी.एन.शिंदे
गणेशखिंड, पुणे पी.बी.नं.१३, पुणे-४११००७

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पारनेर, तहसील कार्यालय, पारनेर,
ता.पारनेर, जि.अहमदनगर श्री.गोविंद पंढरीनाथ शिंदे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, पारनेर, तहसील कार्यालय, पारनेर, ता.पारनेर, जि.अहमदनगर श्री.सतीश भीमाशंकर शेटे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : कुळ कायदा कलम ३२-ग प्रमाणे किंमत ठरवून मिळण्याबाबत एप्रिल २००५ मध्ये दिलेल्या अर्जावरील निर्णयाची माहिती मागितली होती. अर्ज कार्यालयातून गहाळ झाला असल्याने जन माहिती अधिकाऱ्यानी माहिती दिली नाही व अपिलीय प्राधिकारी यानी अपील नाकारले. एकूण तीन अर्ज होते. त्यावर जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले नाही.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्याच्या दि.८.८.२००९ च्या अर्जाला दि.२.९.२००९ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. त्यांचा मूळ अर्ज उपलब्ध नसल्याचे व अन्य काही मुद्दयातील मागणी स्पष्ट होत नसल्याचे त्याना कळविले.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्याचे प्रथम अपील अंशतः मान्य केले व मूळ मागणीचा फेरअर्ज करावा असा निर्णय दिला. त्यानुसार दि.३१.३.२०१० रोजी त्यानी केलेल्या अर्जावरील अर्धन्यायिक स्वरूपाची प्रक्रिया पूर्ण करून दि.२०.९.२०१० रोजी निर्णय दिला. ही बाब प्रशासकीय कार्यवाहीची असून या अर्जावरील निर्णय अपीलकर्त्याच्या विरोधात गेल्यामुळे माहितीच्या अधिकारातील अपील त्यानी केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांना जन माहिती अधिकाऱ्यानी विहित मुदतीत उत्तर दिले असून कुळ कायदा कलम ३२-ग प्रमाणे किंमत ठरवून देण्याची त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. कारणे, स्पष्टीकरण, खुलासा अशा स्वरूपाची त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मच्छिंद्र संतराम कामठे
३४/३५, कमर्शियल बिल्डिंग,
मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष कार्य अधिकारी,
लेखा परीक्षक मंडळ पदुम, महाराष्ट्र राज्य, मंबई यांचे कार्यालय, मुंबई
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा विशेष लेखापरीक्षक,
सहकारी संस्था पदुम पुणे यांचे कार्यालय, बारामती दूध संघ,
इमारत सं. नं. ५६६, भूखंड क्र. ई -४५, मार्केटयार्ड , पुणे ४११ ०३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष कार्य अधिकारी,
लेखा परीक्षक मंडळ पदुम, महाराष्ट्र राज्य, मंबई यांचे कार्यालय.
मुंबई श्री. विनायक रामचंद्र साखरे

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा विशेष लेखापरीक्षक,
सहकारी संस्था पदुम पुणे यांचे कार्यालय, बारामती दूध संघ, इमारत सं. नं. ५६६,
भूखंड क्र. ई -४५, मार्केटयार्ड , पुणे श्री.सदाशिव पद्माकरराव चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

प्रमाणित व सनदी लेखा परीक्षकांच्या पॅनलच्या अनुषंगाने ११ मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. मच्छिंद्र संतराम कामठे यानी मागितली होती. स्पष्टीकरण, अभिप्राय अशा स्वरुपाची विचारणाही त्यात होती. मुद्देनिहाय उत्तर व माहिती अपीलकर्त्यास दिली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था पदुम पुणे यांचे कार्यालय, मार्केटयार्ड, पुणे श्री.सदाशिव पद्माकरराव चव्हाण यानी पूरक कागदपत्रांसह केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अन्वयार्थ, स्पष्टीकरण, खुलासा, अभिप्राय या स्वरुपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येत नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ. शिरीष सदाशिवराव पिंगळे
विभाग प्रमुख, रसायनशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अपीलकर्ता
नारायणगाव, ता. जुन्नर जि, पुणे ४१० ५०४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप कुलसचिव
पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, पुणे ४११ ००७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, पुणे डॉ. श्री. माणिक जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, पुणे श्रीमती अरुणा वि. चव्हाण
सौ. मेघना सावंत भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

पुणे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांमधील ५ शास्त्रांविषयाच्या संशोधन केंद्रांची माहिती अपीलकर्ता डॉ. शिरीष सदाशिवराव पिंगळे यानी विशिष्ट नमुन्यात मागितली होती. त्याना विहित मुदतीत उत्तर दिले. वस्तुतः संबंधित महाविद्यालयांनाही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू असल्यामुळे अपीलकर्त्यांनी महाविद्यालयांसंबंधित मुद्दयांबाबतची माहिती त्या त्या महाविद्यालयाकडून घ्यावयास हवी होती. विद्यापीठाकडून माहिती मुदतीत देण्यात आली. परंतु अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या ओदशानुसार संबंधित २० संशोधन केंद्रांकडून/महाविद्यालयांकडून माहिती मागवून घेऊन ती अपीलकर्त्यांना पाठविली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव,पुणे विद्यापीठ, पुणे श्रीमती अरुणा वि. चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा उप कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे डॉ. श्री. माणिक जाधव यांनी पूरक कागदपत्रांसह केले. त्यांनी केलेली कार्यवाही उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश दिनकर पुंडे
३ धनदा अपार्टमेंट, भक्ती मार्ग,
लॉ कॉलेज रोड, एरंडवन , पुणे ४११ ००४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रमेश दिनकर पुंडे
३ धनदा अपार्टमेंट, भक्ती मार्ग, लॉ कॉलेज रोड, एरंडवन , पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे श्री. साहेबराव दांडगे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री. अनिल शिंदे

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाने आपापल्या अधिकार क्षेत्रातील बेकायदेशीर बांधकामांचे सर्वेक्षण करुन याद्या सादर करण्याचे आदेश महानगरपालिका आयुक्तांनी दिले आहेत. या याद्यांची प्रत मागितली होती. १२६ पानांची, परंतु अपूर्ण माहिती मिळाली. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी क्षेत्रिय कार्यालयांना याद्या देणेबाबत कळविले असून एका कार्यालयाकडून माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - सर्व क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त करुन पाठवावयाची ही माहिती होती. तसे अपीलकर्त्यास वेळीच कळविले. प्राप्त झालेली माहिती देण्यात आली असून ऊर्वरित माहिती १५ दिवसांत देत आहोत.

माहिती अनेक कार्यालयांकडील असल्यामुळे ती १५ दिवसांत देण्याचा प्रस्ताव मान्य असल्याचे अपीलकर्त्यांनी सांगितले.

माहितीबाबतची उभय मान्यता लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २७ जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीपती उर्फ शशीकांत सोनु जगताप
रा. बी/२/४०२, अनुसया इनक्लेव्ह (बी)
वानवडी, पुणे ४११ ०४० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे ४११ ००२
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे ४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८६२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. श्रीपती उर्फ शशीकांत सोनु जगताप
रा. बी/२/४०२, अनुसया इनक्लेव्ह (बी) वानवडी, पुणे ४११ ०४०

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी,
पुणे श्री. एस. आर. परब

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,

| | |
|---|---|
| | तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी,<br>पुणे यांचे प्रतिनिधी श्री. पी. व्ही. धानेपकर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि. ११/५/२०११ रोजी प्रस्तुत अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु त्या दिवशी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नसल्यामुळे पुन्हा सुनावणीची तारीख मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री. श्रीपती उर्फ शशीकांत सोनु जगताप यानी केली. त्यानुसार दि. २७/६/२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली.

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - फेरफार प्रकरणातील तहसीलदारांच्या दुरुस्तीच्या हुकुमाची प्रत अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - जानेवारी १९६२ मधील हा विषय आहे. सदर हुकुमाचा शोध घेण्यात आला, परंतु मिळत नाही. तसे अपीलकर्त्यास कळविले होते. कुळकायदा शाखेकडे या हुकुमाची नक्कल उपलब्ध झाली असून आता ती अपीलकर्त्यास पुरवीत आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. अपीलकर्त्यानी मागितलेल्या हुकुम क्र.ए.एल.एम.पींपळे सौदागर २२/६४ या हुकुमाची प्राप्त झालेली प्रत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसीलदार कार्यालय, पुणे श्री. विकास भालेराव यानी अपीलकर्त्यास नि:शुल्क पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गणपत बाबुराव गावलगडदे
सर्व्हे नं. ५६६/१८ अ, मार्केट यार्ड, पुणे  अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय पुणे शहर, शुक्रवार पेठ,
खडकमाळ आळी, पुणे ४११ ००२

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी, बिबवेवाडी,
पुणे शहर, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे ४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२८०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय पुणे शहर, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी,
पुणे डॉ. योगेश भिमराव खरमाटे

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी, बिबवेवाडी,
पुणे शहर, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे श्री. ईश्वर स्वामीराव पिसे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि. २४/२/२०११ रोजी प्रस्तुत अपिलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु त्या दिवशी अपीलकर्ता उपस्थित नसल्यामुळे पुन्हा सुनावणीची तारीख मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री. गणपत बाबुराव गावलगडदे यानी केली. त्यानुसार दि. २७/६/२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली परंतु या तारखेलाही अपीलकर्ता उपस्थित नव्हते.

मिळकतीच्या फेरफार प्रकरणातील इच्छापत्राची छायांकित प्रत सादर करुन ती प्रमाणित करुन देण्याची मागणी अपीलकर्ता श्री. गणपत बाबुराव गावलगडदे यानी केली होती. परंतु सन १९८५ मधील संबंधित अर्ज व इच्छापत्र उपलब्ध होत नसल्याचे अपीलकर्त्यास कळविले. त्यानी दिलेल्या छायांकित प्रतीवर प्रमाणित करुन प्रमाणपत्र देता येणार नाही. अन्य कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसीलदार कार्यालय पुणे शहर, पुणे डॉ. योगेश भिमराव खरमाटे यानी केले. त्यांचे निवेदन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. राजेंद्र वसंत कामठे
महानगरपालिका शाळा क्र. ५८ जवळ,
मारुती अळी, कोंढवा खुर्द, पुणे ४११ ०४८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा न्यायाधीश-१,
पुणे जिल्हा सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रबंधक,
पुणे जिल्हा सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१६६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा न्यायाधीश-१,
पुणे जिल्हा सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे यांचे प्रतिनिधी
श्री. के. पी. येरुणकर

**जन माहिती अधिकारी** तथा प्रबंधक,
पुणे जिल्हा सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे यांचे प्रतिनिधी
श्री. के. पी. येरुणकर

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

एका दाव्यामधील कागदपत्रांच्या नकला अपीलकर्ता श्री. राजेंद्र वसंत कामठे यानी मागितल्या होत्या. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अभिलेख कक्षाकडे रीतसर अर्ज करुन नकला प्राप्त करुन घ्याव्यात, असे अपीलकर्त्यास कळविले. अपिलीय प्राधिकारी यानी तो निर्णय कायम केला. त्यानुसार अपीलकर्त्यांनी अर्ज करुन नकला प्राप्त करुन घेतल्या आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,पुणे जिल्हा सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे श्री. पी.एस.देशमुख यानी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००

श्री. रघुनाथ मकडू लोहार
प्लॉट नं. १५४, सेक्टर १९, कोयनानगर,
चिंचवड पूर्व, पुणे ४११ ०१९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे ४११ ०१८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
'अ' प्रभाग, भेळ चौक, सेक्टर २६, प्राधिकरण, पुणे ४११ ०४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

अन्य समाविष्ट अपील क्र. १६८६/२०१०/पुणे

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,
पुणे श्री. एन. एस. उमाटे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>'अ' प्रभाग, भेळ चौक, सेक्टर २६, प्राधिकरण,<br>पुणे श्री.सतीश नवलसिंह इंगळे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एका बागेसंबंधी अपीलकर्ता श्री. रघुनाथ मकडू लोहार यांची तक्रार असून ही बाग व त्यातील मंदिर बेकायदेशीर असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्या अनुषंगाने ते सातत्याने अर्ज व अपिले करीत असतात. तसेच एकाच विषयासंबंधात अर्ज असल्यामुळे सर्व अभिलेखांचे अवलोकन करण्यासाठी बोलाविले असता ते येत नाहीत. याच विषयाबाबत त्यानी १९ अपिले केली असून वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे. आयोगाने यापूर्वी त्यांच्या सन २०१० मधील अपील क्र. - ९४५, ९४६, ९४७, १०३१, १०९३, १३९८, १४२१, १४२२, १४२५, १४३२, १४३४, १४४१, १४५१, १४५२, १४५३, १४५४, १५२५, १५२६, १५३०, १५४३, १६७६, १९१६+ १९१८+ १९१९, २१०७, २१४०+२१४१, २१४२, २१४३, २१६७ मध्ये आदेश दिलेले आहेत. अभिलेखातील कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती देण्याची तयारी आहे. मात्र पुन:पुन्हा एकाच विषयाच्या अनुषंगाने अर्ज, पत्रव्यवहार व अपिले केल्याने कार्यालयीन कामातील वेळ अकारण खर्ची पडतो, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शहर अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री. एन. एस. उमाटे व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता 'अ' प्रभाग, भेळ चौक, सेक्टर २६, प्राधिकरण, पुणे श्री.सतीश नवलसिंह इंगळे यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता न माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिपादन रास्त आहे. अपीलकर्त्यांनी आवश्यक असल्यास संबंधित विषयातील सर्व अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती घेणे योग्य ठरेल. तसे न करता व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत न येणाऱ्या मागणीसाठी सातत्याने

अर्ज व अपिले करुन आयोगासह सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. आयोगाकडे दाखल असलेल्या त्यांच्या याच विषयासंदर्भातील अपील क्र. १६८६/२०१०/पुणे बाबतही हाच निर्णय लागू असून यापुढे याच संदर्भातील त्यांच्या अपिलांची दखल घेण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. २७ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामचंद्र राघु निंबाळकर
पौड रोड फाटा, केळेवाडी, स. नं. ४४,
ज्ञानराज क्लासेस जवळ, एरंडवणा, पुणे ४११ ०३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत,
पुणे ४११ ००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग मुळशी (पौड),
ता. मुळशी, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रामचंद्र राघु निंबाळकर
पौड रोड फाटा, केळेवाडी, स. नं. ४४,
ज्ञानराज क्लासेस जवळ, एरंडवणा, पुणे ४११ ०३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री. अ.व्यं.खैरे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा उप विभागीय अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग मुळशी (पौड),<br>ता. मुळशी, जि. पुणे श्री. सी. टी. नाईक |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - बोतरवाडी येथील रस्त्याच्या कामासाठी निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले असून अपूर्ण रस्ता केला आहे. रस्त्याच्या साईड पट्टयांचे काम केलेले नाही. ठेकेदाराने खरेदी केलेल्या साहित्याच्या पावत्या, कामाच्या पूर्णत्वाच्या दाखल्याची प्रत इ. माहिती दिली जात नाही. ठेकेदाराकडून कागदपत्रे घेऊन जन माहिती अधिकारी यानी माहिती दिली पाहिजे.

जन माहिती अधिकारी - आमच्या खात्याने मंजूर केलेल्या आराखडयाप्रमाणे (अंदाजपत्रका प्रमाणे) रस्त्याचे काम पूर्ण झालेले आहे. मोजमापाचे स्पष्टीकरण, देयके आदि कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यांना दिल्या. ठेकेदाराने खरेदी केलेल्या साहित्याच्या पावत्या आमच्या कार्यालयात नसतात. तरी श्री. निंबाळकर यांच्या शंकानिरसनाच्या दृष्टीने खरेदीच्या साहित्याची बिले त्याना दाखविण्याबाबत संबंधित मजूर संस्थेला कळविले. अंतिम देयक हेच कामाच्या पूर्णत्वाचे प्रमाण मानले जाते. त्याचा वेगळा दाखला दिला जात नाही.

अपिलीय प्राधिकारी - रस्त्याचे काम पूर्ण झाले असून मी स्वतः पाहणी केली आहे. अपीलकर्त्यांच्या तक्रारीत तथ्य नाही. खात्याने घातलेल्या अटींनुसार प्रत्येक ठेकेदाराने काम केले की नाही, याची तपासणी खात्यातर्फे केली जाते. मात्र ठेकेदाराने खरेदी केलेल्या साहित्याची बिले इ. कागदपत्रे ठेकेदारांच्या अखत्यारीत असतात.

रस्त्याचे काम योग्य प्रकारे व पूर्ण झाले नसल्याची अपीलकर्त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील निर्णयाचा विषय नाही. तसेच ठेकेदाराकडून पावत्या आदि कागदपत्रे प्राप्त करुन घेऊन ती अपीलकर्त्यास पुरविणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. मूळ निविदांचा धोरणात्मक तक्ता, निविदा नाकारणे वा स्वीकारण्याची कारणे, ठेकेदारांचे नातेसंबंध अशा स्वरुपाची विचारणा अपीलकर्त्यांनी केलेली आहे. या बाबी, तसेच पूर्णत्वाचा दाखला दिला नसल्यास कारवाईची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. रस्त्याच्या कामाला पुर्णत्वाचा दाखला देणे आवश्यक असल्यास तसा दाखला अथवा अंतिम देयकाचे प्रदान म्हणजेच काम पूर्ण झाल्याचे प्रमाण अशा स्वरुपाचे पत्र जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास द्यावे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नथु गेणू पवार
२८०, मंगळवार पेठ, शांतीप्रेम, पहिला मजला,
फ्लॅट नं. १०२, पुणे ४११ ०११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय, क्र. ३, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, टिळक रोड क्षेत्रीय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६५७/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. नथु गेणू पवार
२८०, मंगळवार पेठ, शांतीप्रेम, पहिला मजला, फ्लॅट नं. १०२, पुणे ४११ ०११

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
विभागीय कार्यालय, क्र. ३, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सतीश श्रीपाद भोसरेकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, टिळक रोड क्षेत्रीय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. जयंत दत्तात्रय वाघ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - विकसकाने मंजूर नकाशाप्रमाणे पुरेशा क्षमतेची पाण्याची टाकी बांधली नाही व सदनिका धारकांना पाणी पुरवठा करणे आवश्यक असतानाही पूर्तता केलेली नाही. त्याबाबत त्याच्यावर कार्यवाही करण्याच्या सदनिका धारकांच्या मागणीनुसार त्वरित कार्यवाहीची माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांच्या माहिती-मागणीच्या अर्जाला उत्तर देण्यात आले. तसेच पाणी पुरवठयासाठी आवश्यक असलेल्या दोन टाक्या बसविल्याशिवाय सुधारित नकाशाला मंजुरी दिली जाणार नाही, याची दक्षता घेतली जाईल.

अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संतोष गोयल
३८४ (नवीन) रास्ता पेठ, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. संतोष गोयल
३८४ (नवीन) रास्ता पेठ, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे श्री. रविराज फल्ले

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे श्री. रा.मा.गेंगजे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - अपील प्रकरणात आयोगाने केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन मिळाल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - संबंधित प्रकरणातील आदेश पारित झालेले नसल्यामुळे कागदपत्रांच्या प्रती दिल्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. संबंधित संचिका अपीलकर्त्यांना अवलोकनासाठी उपलब्ध करुन देऊन त्यांच्या लेखी मागणीनुसार हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे श्री. रा.मा.गेंगजे यानी सशुल्क पुरवाव्या .

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विठ्ठल रमाकांत मोरे
मु. खटकाळे, पो. निमगिरी, ता. जुन्नर,
जि. पुणे ४१०५०२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत विभाग)
पंचायत समिती कार्यालय, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७९९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कार्यालय, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे श्री. आनंद एस. भंडारी

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत विभाग)
पंचायत समिती कार्यालय, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे श्री. एन. जी. सरोगदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सरपंचाच्या चुलत भावाने सार्वजनिक विहिरीचे डबर चोरुन नेल्याबाबत केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री. विठ्ठल रमाकांत मोरे यानी मागितली होती व कारवाईची त्यांची मागणी होती. संबंधित प्रकरणी चौकशी करुन अहवाल देण्याचे आदेश गटविकास अधिकारी यानी पूर्वी दिले होते. त्यावेळी विस्तार अधिकाऱ्यांनी चौकशी केली होती. अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार पुन्हा विद्यमान जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी याना चौकशी करण्यास सांगितले व त्यांच्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यांना रजिस्टर्ड टपालाने पाठविली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे श्री. आनंद एस. भंडारी यानी पूरक कागदपत्रांसह केले.

अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून अशी कार्यवाही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केली आहे. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मूळ अर्जाला विहित मुदतीत उत्तर दिले जाणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत विभाग) पंचायत समिती कार्यालय, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे श्री. एन. जी. सरोगदे व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे श्री. आनंद एस. भंडारी यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. पांडुरंग रामभाऊ जराड
रा. उंडवडी, क.प.ता. बारामती, जि. पुणे                    अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. पांडुरंग रामभाऊ जराड
रा. उंडवडी, क.प.ता. बारामती, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे
श्री. पांडुरंग बाबुराव भोंग

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - मी व माझा सख्खा भाऊ या दोघांचीही नावे एका फेरफार उताऱ्यावर असून ७/१२ उताऱ्यावरील माझ्या मालकीच्या जमिनीवर फक्त माझे नाव लावून देण्याची मागणी आहे.

<u>जन माहिती अधिकारी</u> - सन १९५३-५४ चा हा फेरफार असून त्या बाबतची माहिती अपीलकर्त्यास दिली आहे. जमिनीला नाव लागणे ७/१२ मधील दुरुस्ती, वाटप आदि बाबी महसूल नियमावलीअंतर्गत येत असून तसा अर्ज अपीलकर्त्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे करावा लागेल, याचीही वेळोवेळी कल्पना दिली आहे.

अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. उदयराज अनिल आळंदकर
फ्लॅट नं. २० अी, बिल्डिंग सी-३,
सुर्यलोकनगरी, पुणे- सोलापूर रोड, पुणे ४११ ०१३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता,
'ड' प्रभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
'ड' प्रभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५७/२००९/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. उदयराज अनिल आळंदकर<br>फ्लॅट नं. २० अी, बिल्डिंग सी-३, सुर्यलोकनगरी,<br>पुणे- सोलापूर रोड, पुणे ४११ ०१३<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शहर अभियंता,<br>'ड' प्रभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी श्री. एन.एस.उमाटे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>'ड' प्रभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी<br>यांचे प्रतिनिधी श्री. अनिल देवराम शिंदे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - एकाच मिळकत क्रमांकात दोन मिळकतदार असल्याने एकमेकांना शेजारी दाखवून दोघांना दोन वेगवेगळया नोटिसा महानगरपालिकेने बजावल्या. एकच मिळकत असल्यामुळे सर्वांवर एकाच वेळी कार्यवाही करणे आवश्यक असताना विभागणी कशी केली, याची माहिती दिली जात नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> - दोन वेगवेगळी बांधकामे असल्यामुळे वेगवेगळया नोटिसा दिल्या व त्याची माहिती अपीलकर्त्यास दिली. त्यानी उपस्थित केलेले अन्य मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत.

एकाच मिळकत क्रमांकातील दोन मिळकतदारांना स्वतंत्र नोटिसा कशाच्या आधारे बजावल्या, याची माहिती जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास दोन दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपीलकर्ता यानी कायदेशीर तरतुदींच्या अनुषंगाने अन्वयार्थ स्वरुपाची व स्पष्टीकरणात्मक माहिती मागितली असून अशी मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कक्षेत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, 'ड' प्रभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी श्री. बळवंत तुकाराम बनकर यानी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. २०.७.२०११ पर्यंत आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. २७ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गणपतराव कृष्णाजी फारणे
वॉर्ड नं. ६/४४४, मंगळवार पेठ, इचलकरंजी,
जि. कोल्हापूर ४१६ ११५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उद्योग सह. संचालक,
पुणे विभाग, पुणे, कृषी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे - ५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८१३/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. गणपतराव कृष्णाजी फारणे
वॉर्ड नं. ६/४४४, मंगळवार पेठ, इचलकरंजी, जि. कोल्हापूर ४१६ ११५

**अपिलीय प्राधिकारी** तथा उद्योग सह. संचालक,
पुणे विभाग, पुणे, कृषी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर,
पुणे श्री. एस. एस. सुरवसे

**जन माहिती अधिकारी** तथा महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर श्री. गो. रा. जांगडा

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - यंत्रमागधारकांना कर्ज देण्याची तरतूद असताना यंत्रमागधारक नसलेल्या काही व्यक्तींनी शिवनेरी सहकारी बँक लि., इचलकरंजी या बँकेमार्फत शासनाच्या कर्ज योजनेचा लाभ घेतला आहे. त्याबाबतची माहिती जिल्हा उद्योग केंद्राकडून संदिग्ध स्वरुपात दिली जाते. म्हणून या संदर्भातील सर्व दस्तऐवजांची चौकशी होऊन शासनाच्या सवलतीचा नियमबाहय लाभ उठवणाऱ्यांवर कारवाई करावी.

जन माहिती अधिकारी - बँकेने दिलेल्या यादीतील कर्जदारांना सबसिडी दिली जाते. बँकेने कागदपत्रे प्रमाणित केल्यानंतरच ही कार्यवाही होत असल्यामुळे याबाबतची जिल्हा उद्योग केंद्राकडील उपलब्ध माहिती दिली.

अपिलीय प्राधिकारी - कार्यालयाकडील अभिलेखानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती योग्य आहे. चौकशी करुन अहवाल देण्याची कार्यवाही करणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ येत नाही. तथापि शासकीय योजनेचा लाभ योग्य व्यक्तींना मिळतो की नाही ही माहिती व्यापक सार्वजनिक हिताशी निगडित आहे. त्यामुळे अपीलकर्त्यास त्या बाबतची जिल्हा उद्योग केंद्राकडील सर्व कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिली जाणे व त्यानी लेखी मागणी केल्यास त्यानुसार प्रती दिल्या जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गणपती गोपाळ शेळके
मु. पो. परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्य सहाय्यक,
आरोग्य विभाग, पंचायत समिती करवीर,
ता. करवीर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६२/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. गणपती गोपाळ शेळके
मु. पो. परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्य सहाय्यक,
आरोग्य विभाग, पंचायत समिती करवीर,
ता. करवीर, जि. कोल्हापूर श्री. विष्णुपंत गोपाळ भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर श्री. विलास दत्तात्रय राबाडे

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - अधिकृत परवाना न घेता व जमिनीची योग्य मोजणी न करता माझ्या जमिनीतून गटार काढण्यात आले. त्याविरुध्द तक्रार केली असता हे बांधकाम करणाऱ्या उपसरपंचांनी धमकी दिली. अधिकाऱ्यांनी माझ्या जमिनीची मोजणी करण्यास सांगितले. परंतु उपसरपंचांनी मोजणी उधळली. मी माजी सैनिक असून माझ्या पिकावू जमिनीत अशा प्रकारे बेकायेदशीर बांधकाम केले आहे व त्याची दाद अधिकारी घेत नाहीत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांना माहिती देण्यात आली आहे. जमिनीची मोजणी उधळल्याचे त्यांचे म्हणणे खरे नाही. ही मोजणी त्यानी स्वतः करुन घेतली पाहिजे.

उपसरपंच (श्री.आनंदा विष्णु पाटील ) - शेतावरील घरांबाबतचा हा प्रश्न असून सांडपाणी निर्गत करण्यासाठी अन्य रहिवाशांनी अर्ज केल्यावर गटार काढून व्यवस्था केली. गटार अपीलकर्त्यांच्या जमिनीत नाही.

अपीलकर्त्यांची तक्रार प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीधर भूपाल शेटी
कुरणे तालीम जवळ, मु. पो. शिरोळ,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (गा.पं)
जिल्हा परिषद, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७७/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री. श्रीधर भूपाल शेटी<br>कुरणे तालीम जवळ, मु. पो. शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती शिरोळ, ता. शिरोळ,<br>जि. कोल्हापूर श्री.महालिंग रामचंद्र जाधव | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता-जिल्हाधिकाऱ्याकडे केलेल्या तक्रारीच्या संदर्भातील आदेशानुसार कार्यवाहीची माहिती दि. ७.३.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. योग्य कार्यवाही केली नाही. दि. ६.३.२०१० चा माहिती-मागणीचा अर्ज आहे. दि. १३/१/२०१० चा मूळ तक्रार अर्ज असून दि. १०.१.२०१० च्या पत्रान्वये संबंधितांना नोटीस दिल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले, हे कसे ?

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांचा माहिती-मागणीचा अर्ज दि. ६.३.२०१० चा आहे. दि. १०.१.२०१० रोजी संबंधितास नोटीस देण्यात आली होती व सन २००२ पासूनच्या प्रकरणाचा संदर्भ असल्यामुळे तक्रारअर्जापूर्वी झालेल्या कार्यवाहीची माहिती कळविली. संबंधित प्रकरण दिवाणी न्यायालयात दाखल असून त्यात पुढील कार्यवाही करता येत नसल्याचे अपीलकर्त्यास स्पष्ट केले आहे.

प्रशासकीय कार्यवाही व माहिती याची सरमिसळ अपीलकर्त्यांनी केली असून अपीलकर्त्यांची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तथापि माहिती- मागणीच्या अर्जावर स्पष्ट उत्तर विहित मुदतीत देणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर श्री.महालिंग रामचंद्र जाधव व अपिलीय प्राधिकारी श्री. श्रीधर भूपाल शेटी कुरणे तालीम जवळ, मु. पो. शिरोळ, ता. शिरोळ, जि. कोल्हापूरयांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. महादेव आप्पा मोरे
रा. बहिरेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत मौजे बहिरेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७०/२०१०/मोरे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. महादेव आप्पा मोरे
रा. बहिरेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर
यांचे प्रतिनिधी श्री. किरण निवृत्ती खटावकर

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत मौजे बहिरेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर श्री. प्रकाश खिरु पाटील

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - गायरानाच्या २० एकर जमिनीत सार्वजनिक वन विभागाने ३२ हजार झाडे लावली. हस्तांतर करताना त्यांची संख्या २७,०५० नमूद केली. त्यातील १६,०६४ झाडांचा लिलाव केला. १५ ऑगस्ट/ २६ जानेवारी रोजी गाव सभेच्या समोर विषय ठेवून वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देऊन लिलाव करणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्यामुळे ७-८ लाख रुपये अपेक्षित असलेले उत्पन्न प्रत्यक्षात १ लाखावर आले आहे. या बाबतच्या बयाणा रक्कमेच्या पावत्या दिल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यास सर्व कागदपत्रांच्या प्रती दिल्या आहेत. स्थानिक पातळीवर लिलाव करण्यात आल्यामुळे वृत्तपत्रात प्रसिध्दी दिली नाही. तसेच बयाणा रक्कम लगेच परत दिल्याने पावत्या केल्या नाहीत. तसेही अपीलकर्त्यास लेखी दिले आहे.

अपीलकर्त्यांनी मांडलेला विषय सार्वजनिक निधीच्या दृष्टीने महत्वाचा असला तरी त्याबाबतची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मारुती भाऊसाहेब जाधव
ता. राधानगरी, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बावडा रोड, कोल्हापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१
राधानगरी, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०२/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मारुती भाऊसाहेब जाधव
ता. राधानगरी, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बावडा रोड, कोल्हापूर श्री. सी.बी.भुरकुंडे

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा दुय्यम निबंधक, श्रेणी-१
राधानगरी, जि. कोल्हापूर श्री. एस. सी. मोरे

| | |
|---|---|
| | **विद्यमान जन माहिती अधिकारी** श्री. एस. वाय. धुमाळे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- मला जी जमीन खरेदी करावयाची आहे तिच्या मालक सदरी 'सरकार' अशी नोंद आहे. म्हणजेच या जमिनीच्या खरेदीबाबत काय केले पाहिजे, याचे मागदर्शन मागितले होते. ते मिळाले नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अशी जमीन खरेदीसाठी शासनाने निर्धारित केलेल्या कायद्याच्या प्रणालीची माहिती अपीलकर्त्यास दिली. त्याव्यतिरिक्त मार्गदर्शन करता येणार नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २८ जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गुरूनाथ मोतीलाल वमने
प्लॉट नं.९१, कलावतीनगर, एमआयडीसी, अक्कलकोट रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जुहू सुप्रीम शॉपिंग सेंटर, पहिला मजला, गुलमोहोर, क्रॉस रोड नं.९, विलेपार्ले(पश्चिम), मुंबई-४९ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जिल्हा परिषद आवार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११६५ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जिल्हा परिषद आवार, सोलापूर<br>श्री.पी.एम.झोंबाडे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.गुरूनाथ मोतीलाल वमने यानी केली असली तरी त्यांचा मूळ अर्ज प्राप्त झालेला नाही. महामंडळाचे तत्कालीन जिल्हा व्यवस्थापक श्री.बी.बी.पवार हे निलंबित असून अर्जाबाबत त्याना विचारणा केली. तसेच मूळ अर्जाची प्रत देण्याबाबत अपीलकर्त्यासही

कळविले. परंतु त्यानी ती परत पाठविली नाही. त्यामुळे माहिती देता आली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जिल्हा परिषद आवार, सोलापूर श्री.पी.एम.झोंबाडे यानी केले.

प्रस्तुत अपिलात उभय बाजूंतर्फे सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यांनी एप्रिल २००५ ते जानेवारी २००९ पर्यंतची विस्तृत स्वरूपाची माहिती विशिष्ट नमुन्यात मागितली आहे. महामंडळाच्या सोलापूर कार्यालयात भ्रष्टाचार झाल्याचे त्यांचे म्हणणे असून त्या अनुषंगाने ही माहिती मिळावी, असे त्यानी लेखी निवेदनात म्हटले आहे. परंतु अशा प्रकारे माहिती संकलित करून विशिष्ट नमुन्यात देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तसेच नियमावलीच्या स्वरूपाची अथवा त्याबाबतच्या अन्वयार्थाची मागणी 'माहिती' म्हणून करता येणार नाही. आवश्यक असल्यास अभिलेख अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती ते प्राप्त करून घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, जिल्हा परिषद आवार, सोलापूर यानी अपीलकर्त्यांना आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करू द्यावे व त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांची लेखी मागणी केल्यास योग्य ते शुल्क आकारून त्या प्रती द्याव्यात.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अब्दुल रज्जाक मुनिरूद्दीन शेख
ब्लॉक नं.३(अ), सिरतनगर, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व
मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक, वर्ग-१, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८० / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्री.सुशील नारखेडे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक, वर्ग-१, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर प्रतिनिधी श्री.व्ही.बी.येवले | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

निवृत्तीवेतन व मृत्यू उपदान रक्कम याबाबतची मागणी केली होती. परंतु रक्कम विलंबाने मिळाल्यामुळे व्याज देणे आवश्यक असूनही त्यानुसार पूर्तता झाली नाही व संबंधित कागदपत्रांच्या प्रतीही दिल्या गेल्या नाहीत. अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अब्दुल रज्जाक मुनिरूद्दीन शेख यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.शेख यानी ऑक्टोबर २००७ व एप्रिल २००८ मध्ये अर्ज केल्याचे म्हटले असून त्याच्या प्रती व त्यावरील कार्यवाहीची माहिती मागितली होती. तसेच विविध पत्राद्वारे याच संदर्भात तक्रार व मागण्या केल्या होत्या. सेवानिवृत्तीवेतन व मृत्यू उपदान विलंबाने मिळाल्यामुळे त्या रकमेवरील व्याज मिळावे, अशी त्यांची मागणी आहे. त्यांचे मूळ अर्ज अभिलेखात उपलब्ध नाहीत व व्याजाची अथवा मूळ तक्रारीच्या चौकशीची मागणी या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक, वर्ग-१, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.बी.येवले व अपिलीय प्राधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.सुशील नारखेडे यानी केले. त्यांचे प्रतिपादन रास्त आहे. मात्र संबंधित अभिलेखाचे अवलोकन अपीलकर्ता करू इच्छित असल्यास अभिलेख अवलोकन करू देऊन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती दिल्या जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.धर्मराज चंद्रकांत मळगे
७६५, दक्षिण कसबा, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद
अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई-२३ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नोडल अधिकारी, मौलाना आझाद
अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई-२३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५२ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापकीय संचालक, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई श्री.जफ्फार रझाक शेख<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा नोडल अधिकारी, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई श्री.विनायक रघुनाथ पाटोळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

या अपिलाची सुनावणी दि.१२.११.२०१० रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. सदर दिनांकास उभय घटकांपैकी कोणीही उपस्थित न राहिल्यामुळे दि.३०.६.२०११ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.धर्मराज चंद्रकांत मळगे यानी दि.२४.७.२००९ अशी तारीख माहिती-मागणीच्या अर्जावर नमूद केली असली, तरी त्यानंतर दिड महिन्याने प्रत्यक्ष अर्ज प्राप्त झाला. दि.६.१०.२००९ रोजी सर्व माहिती दिली व आयोगाकडे अपील केल्यानंतर पुन्हा रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नोडल अधिकारी, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई श्री.विनायक रघुनाथ पाटोळे यानी जावक बारनिशीतील नोंदी व दिलेली माहिती यांच्या छायांकित प्रतीसह केले.

अन्य व्यक्तीच्या कर्जाबाबतची, जामीनदाराच्या पगारपत्रक व छायाचित्रासह माहिती अपीलकर्त्यानी मागितल्याचे व जन माहिती अधिकारी तथा नोडल अधिकारी, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई यानी दिल्याचे कागदपत्रांवरून दिसून येते. वस्तुतः ही माहिती त्रयस्थ व्यक्तीच्या आर्थिक व्यवहारासंबंधी असल्यामुळे अशी माहिती देताना सार्वजनिक हिताचा संदर्भ आहे की नाही, हे तपासून संबंधित त्रयस्थ पक्षाला माहिती देण्याबाबत विचारणा करणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा नोडल अधिकारी, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ, मुंबई श्री.विनायक रघुनाथ पाटोळे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक श्रीधर पोरे
ई-९१, अक्षत पार्क, साई मंदिराशेजारी, जाधववाडी, ता.फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा,
ता. व जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, जिल्हा परिषद,
बांधकाम विभाग (उत्तर विभाग), सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२६५ / २०१० / सातारा<br>३८८+३८९ / २०११ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |
| **३. उपस्थित** | | |
| **अपीलकर्ता** श्री.अशोक श्रीधर पोरे<br>ई-९१, अक्षत पार्क, साई मंदिराशेजारी, जाधववाडी, ता.फलटण, जि.सातारा | | |
| **अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सातारा,<br>ता. व जि.सातारा प्रतिनिधी श्री.सी.एन.गार्डे | | |
| **जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, जिल्हा परिषद,<br>बांधकाम विभाग (उत्तर विभाग), सातारा श्री.लक्ष्मण आनंदराव कदम | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : तत्कालीन शाखा अभियंता श्री.सुनील श्रीधर पोरे यांच्या कार्यकाळात व कार्यक्षेत्रात केलेली कामे व त्यांची मालमत्ता याबाबतची माहिती मागितली होती. श्री.पोरे हे माझे सख्खे बंधू असून भ्रष्टाचारी मार्गाने त्यानी अलिशान बंगल्यासह कोट्यवधी रूपयांची मालमत्ता जमा केली असल्यामुळे ही माहिती मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : श्री.पोरे यांच्या कार्यकाळातील कामाची अंदाजपत्रके, मोजमाप पुस्तके यांच्या प्रती व अनुषंगिक माहिती दिली. परंतु मालमत्ता व दायित्त्व या संदर्भातील नोकरीला लागल्यापासूनची त्यांची माहिती कार्यालयाकडे नाही. तसेच ही माहिती अपीलकर्त्यास देऊ नये, असे पत्र त्यानी दिले. त्यामुळे अपीलकर्त्यास तसे कळविले. जन माहिती अधिकाऱ्यानी दिलेली माहिती योग्य असल्यामुळे प्रथम अपील निकाली काढले.

अपीलकर्ता श्री.पोरे यानी याच विषयाच्या अनुषंगाने तीन अपिले आयोगाकडे दाखल केली आहेत व तीनही अपिलामध्ये शाखा अभियंता असलेले त्यांचे बंधू यांच्या संदर्भातील माहिती मागितली आहे. व्यक्तिगत कारणासाठी ही माहिती मागितली असल्याचे सुनावणीदरम्यान त्यानी नमूद केले. अपीलकर्त्यांच्या माहिती-मागणीला कोणताही सार्वजनिक हिताचा संदर्भ नाही, हे त्यातून स्पष्ट होते. शाखा अभियंता यांच्या गोपनीय अहवालाच्या प्रती अपीलकर्त्यास नाकारण्याची, तसेच मालमत्ता व दायित्त्वाबाबतची माहिती संबंधित कार्यालयाकडे नसल्यामुळे न देण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,

नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. हणमंत सखाराम कोळी
मु. पो. पाटण, ता. पाटण, जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,
कराड उपविभाग, कराड, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वर कारकुन क्र. १,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१०२/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी,<br>कराड उपविभाग, कराड, जि. सातारा श्रीमती स्वाती देशमुख-पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा अव्वर कारकुन क्र. १,<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड, जि. सातारा सौ.एस.डी.पवार | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. हणमंत सखाराम कोळी यानी महादेव कोळी जातीचा दाखला मिळण्यासाठी प्रकरण दाखल केले होते. तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्यांनी छाननी करुन दाखला देता येणार नसल्याचे उत्तर दिले. दाखला न देण्याबाबतच्या माहितीच्या त्रुटींविषयीच्या शासन निर्णयाच्या प्रती पुरवाव्या, म्हणजे त्रुटी दूर करता येतील, अशी मागणी अपीलकर्ता श्री. हणमंत सखाराम कोळी यानी दि. १/९/२०१० च्या अर्जान्वये केली होती. दि. २९.९.२०१० च्या पत्रान्वये त्याना उत्तर दिले.

जातीचा दाखला न मिळण्याची सांगड माहितीशी घालण्याचा अपीलकर्त्यांचा प्रयत्न असून त्यानी नमूद केलेल्या त्रुटी या त्यानी दाखल केलेल्या कागदपत्रांसंदर्भातील आहेत. त्याबाबत कोणताही शासन निर्णय देता येणार नाही, हे त्रुटींवरुन स्पष्ट होते. तथापि नेमक्या शासन निर्णयाच्या प्रती मागितल्यास देता येतील. तसेच जात पडताळणीबाबत जात पडताळणी समितीकडे पुन्हा अर्ज दाखल करणे हा मार्ग त्याना उपलब्ध आहे. तसेही स्पष्ट केले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अव्वर कारकुन क्र. १, उपविभागीय अधिकारी कार्यालय, कराड, जि. सातारा सौ.एस.डी.पवार व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कराड उपविभाग, कराड, जि. सातारा श्रीमती स्वाती देशमुख-पाटील यांनी केले.

अपीलकर्ता श्री. हणमंत सखाराम कोळी यानी मागणीनुसार दाखला मिळण्यासाठी पुरावा म्हणून काही कागदपत्रे आयोगाकडे सादर केली असून त्या आधारे माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे म्हटले आहे. मात्र ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. सुनेत्रा तुषार भद्रे
रा. कुमार आर्केड, ५२, सदर बझार, सातारा ता. व जि. सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मख्याधिकारी,
सातारा नगरपरिषद, सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता (अतिक्रमण विभाग),
सातारा नगरपरिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३११३/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** सौ. सुनेत्रा तुषार भद्रे
रा. कुमार आर्केड, ५२, सदर बझार, सातारा, ता. व जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता (अतिक्रमण विभाग),
सातारा नगरपरिषद, सातारा श्री. पंढरीनाथ नामदेव साठे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - कोंडवाडयात आलेली जनावरे आली कोठून ? सोडली कोठे ? त्यांच्या चाऱ्याचा खर्च किती झाला ? या बाबतची खरी माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी देत नाहीत. जनावरे गायब केली जातात. त्यांचे नुसतेच वर्णन केले आहे, त्यांची छायाचित्रे नाहीत. त्यांना चारा घातलेला नाही व खर्च दाखविलेला आहे. चारा घातल्याचे पुरावे दिलेले नाहीत. दिलेली माहिती व नोंदवहीतील नोंदीत याबाबत तफावत आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी जनावरे पकडताना व सोडताना पंचनामा केलेला नाही. जीविताच्या संरक्षणाशी संबंधित असा हा विषय असल्यामुळे ४८ तासांत माहिती दिली जाणे आवश्यक असूनही दिली नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांचा दिनांक नसलेला अर्ज दि. २०/९/२०१० रोजी प्राप्त झ ाला. दि. २३/९/२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर व माहिती दिली. फोटो, पंचनामे आदिंची मागणी अपीलकर्त्यांनी मूळ अर्जात केलेली नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता माहिती जीवित-रक्षणाशी निगडित असून व त्यामुळे ती ४८ तासांत मिळावी, हे अपीलकर्त्यांचे प्रतिपादन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीशी सुसंगत नाही. प्राण्यांच्या रक्षणाबाबतची त्यांची आस्था उल्लेखनीय असली तरी त्यानी उपस्थित केलेले मुद्दे प्रशासकीय कार्यवाहीबाबतचे आहेत. अशी कार्यवाही करणे व केलेल्या कार्यवाहीची योग्यायोग्यता ठरविणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. महारुद्र कडाजी तिकुंडे
न्यू विकासनगर, संगमनगर, सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती सातारा, ता. व जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत खेड, ता. व जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२६४/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती सातारा, ता. व जि. सातारा श्री. सी. एन. गाडे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत खेड, ता. व जि. सातारा श्री. गोविंद भगवान माने

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. महारुद्र कडाजी तिकुंडे यानी ग्राम पंचायतीच्या 'सर्व सभांच्या रजिस्टरच्या सन २००५ ते आज अखेर' अशा प्रतींची मागणी केली होती. ते दारिद्रय रेषेखाली असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार त्याना निःशुल्क माहिती देणे आवश्यक असले तरी सुमारे ६ हजार पृष्ठांची माहिती निःशुल्क देणे ग्रामपंचायतीकडील उपलब्ध निधीत शक्य नसल्यामुळे अभिलेख अवलोकनास येण्याबाबत त्याना लेखी कळविले. त्याला त्यानी नकार दिला. अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही तोच निर्णय दिला. अपीलकर्ता माहितीपेक्षा त्रास देण्यासाठी वारंवार अशा प्रकारचे अर्ज करीत असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत खेड, ता. व जि. सातारा श्री. गोविंद भगवान माने यानी केले. अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती सातारा, ता. व जि. सातारा श्री. सी. एन. गाडे यानी त्याला दुजोरा दिला.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. प्रदिर्घ काळातील, ढोबळमानाने व सरसकट माहिती मागण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गणेश रामचंद्र जाफळे
मु.पो.वाळवा कोटभाग, जि.सांगली अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
भूमी अभिलेख कार्यालय, मार्केट यार्ड, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,
भूमी अभिलेख कार्यालय, वाळवा-इस्लामपूर, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१८७ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गणेश रामचंद्र जाफळे
मु.पो.वाळवा कोटभाग, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, भूमी अभिलेख कार्यालय,
मार्केट यार्ड, सांगली प्रतिनिधी श्री.अशोक दत्तात्रय कदम

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, भूमी अभिलेख कार्यालय,
वाळवा-इस्लामपूर, सांगली डॉ.सौ.वर्षा सुनिल सूर्यवंशी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मिळकतीची चौकशी करण्यापूर्वी त्या कोणाच्या नावे होत्या याची माहिती, तसेच संबंधित प्रकरणातील जाहीर नोटिशीची व आदेशाची प्रत मागितली होती. परंतु समाधानकारक माहिती मिळाली नाही. नोंदी चुकीच्या असल्यामुळे त्याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडील जाहीर नोटीस, जाहिरात, चौकशी अधिकाऱ्याचा आदेश या प्रती मिळालेल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्ता यानी मागितलेली ८-अ उताऱ्याची माहिती ग्रामपंचायतीकडे असते. जाहीर नोटीस, आदेश याबाबतचे अपीलकर्त्याच्या मागणीतील उल्लेख योग्य नसून अधिसूचना व आदेश असलेली चौकशी रजिस्टरची प्रत अपीलकर्त्यास पुरविली. सन १९७१ ते २०१० या कालावधीतील माहिती अपीलकर्त्यांनी मागितली असून अन्य विभागाकडील व बोध न होणारी माहिती वगळता सर्व माहिती देण्यात आली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबाबत योग्य कार्यवाही केली आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखाचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रविण मधुकर बडवे
व्दारा श्री. प्रविण एन. सावंत,
१२/७१८, हत्ती चौक, सातपुते गल्ली, इचलकरंजी अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे अप्पर चिटणीस वर्ग-१,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६४/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्रीमती सुनंदा गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हाधिकारी यांचे अप्पर चिटणीस वर्ग-१,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. अभिजीत नारायण पवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

तुकडे जोड व तुकडे बंदी कायद्याच्या तरतुदीप्रमाणे २० गुंठयापेक्षा कमी क्षेत्राची खरेदीपत्र नोंदविण्याच्या सूचना तहसीलदार, तलाठी याना देणारे परिपत्रक काढावे व स्वतःच्या नोंदणीकृत दस्ताप्रमाणे ७/१२ ला नाव दाखल करण्यासाठी आदेश द्यावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री. प्रविण मधुकर बडवे यानी केली होती. संबंधित अर्ज पुढील कार्यवाहीसाठी तहसीलदाराकडे पाठवून जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे अप्पर चिटणीस वर्ग-१,जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्री. गुरु बिराजदार यानी अपीलकर्त्यास कळविले. मात्र त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्रीमती सुनंदा गायकवाड यानी केले. त्यांचे प्रतिपादन व कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

प्रा. रमेश केशवराव वानखडे
अे-१३/३०३, प्लॅनेट मिलेनियम,
पिंपळे सौदागर, पुणे ४११ ०२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय,
४९१, एल्फिन्स्टन रोड, खडकी, पुणे ४११ ००३

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.प्राचार्य,
टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय,
४९१, एल्फिन्स्टन रोड, खडकी, पुणे ४११ ००३

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९१/२००९/पुणे + ८९०/२००९/पुणें |
| २ | सुनावणी दिनांक | दि. २७/६/२०११ + दि. ७/४/२०११ |
| | **समाविष्ट अन्य अपिले -** अपील क्र. १९४१/२०१०/पुणे, अपील क्र. २४५५/२०१०/पुणे अपील क्र. ७९६/२०११/पुणे | |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** प्रा. रमेश केशवराव वानखडे
अे-१३/३०३, प्लॅनेट मिलेनियम, पिंपळे सौदागर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य,
टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, ४९१, एल्फिन्स्टन रोड,
खडकी, पुणे डॉ. व्ही. पी. तुजारे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहा.प्राचार्य,<br>टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, ४९१, एलफिस्टन रोड,<br>खडकी, पुणे प्रा. अरुण पंढरीनाथ शेलार |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, खडकी, पुणे यांच्याकडे आपण मागितलेली कोणतीही माहिती पूर्णपणे व मुदतीत मिळाली नाही. तसेच अभिलेख अवलोकनासाठी दिले जात नाहीत. दिले जातात, तेव्हा काही कागदपत्रे आपल्यापासून दडवली जातात, अशी तक्रार अपीलकर्ता प्रा. रमेश केशवराव वानखडे यानी केली.

प्रा. रमेश केशवराव वानखडे हे सातत्याने एकाच विषयाच्या अनुषंगाने तीच तीच माहिती पुनःपुन्हा मागून अर्ज व अपिले करतात. तसेच एकाच विषयातील तपशिलासाठी विविध अर्ज करतात. वेळोवेळी उपलब्ध माहिती देऊनही त्यांचे समाधान होत नाही. त्याना माहिती देण्यासाठी कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा बराच वेळ खर्ची पडतो, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहा.प्राचार्य, टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, खडकी, पुणे प्रा. अरुण पंढरीनाथ शेलार व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, खडकी, पुणे डॉ. व्ही. पी. तुजारे यांनी केले.

प्रा.वानखडे याना अवलोकनासाठी हवे असलेले व महाविद्यालयात उपलब्ध असलेले सर्व अभिलेख उपलब्ध करुन देण्याचे मौखिक आदेश आयोगाने अपील क्र. ८९०/२००९/पुणे मध्ये दिले. दि. १/५/२०११ ते १५/५/२०११ या सुट्टीच्या कालावधीत सर्व अभिलेख दाखविणे सोयीचे होईल, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यानी ते मान्य केले. मात्र त्यानुसार सर्व तयारी ठेवली होती. परंतु अपीलकर्ता आले नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी अपील क्र. ८९१/२००९/पुणे च्या सुनावणी दरम्यान केले. मात्र त्याच वेळी आपण आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी परगावी असल्यामुळे अभिलेख अवलोकनासाठी उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले होते, असे प्रा. वानखडे यानी सांगितले. परंतु प्रा. वानखेडे हे दि. १२ मे २०११ रोजी पुण्यात परतले होते व दि. १३ मे २०११ ते १५ मे २०११ हा अभिलेख अवलोकनासाठी कळविलेला

कालावधी होता, असे जन माहिती अधिकारी  व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. या काळात आपल्याकडील कौटुंबिक कार्यामुळे आपण जाऊ शकलो नाही. मात्र जाऊनही काही कागदपत्रे दडविली जात असल्यामुळे व कागदपत्रे योग्यरीत्या तयार केलेली नसल्यामुळे अभिलेख अवलोकनातून माहिती मिळणार नाही, असा मुद्दा           प्रा. वानखडे यानी उपस्थित केला.

अभिलेख अवलोकन न करता शंका उपस्थित करण्याची अपीलकर्त्यांची कृती योग्य नाही. तसेच उपलब्ध अभिलेखाच्या प्रती दिल्या जाणे एवढाच भाग माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येतो. कागदपत्रांची सत्यासत्यता, कायदेशीरपणा, कगदपत्रे तयार करण्या- बाबतच्या तक्रारी याची तपासणी व त्या अनुषंगाने कार्यवाही ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता एकाच संस्थेकडे एकाच विषयाच्या अनुषंगाने सातत्याने अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करीत असून त्या संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे अपिले करीत असतात, असे दिसून येते. आयोगाने यापूर्वी त्यांच्या अपील क्र. १०९, १५४२ + २८१२, १९४१, १९५८, २०९६ + २३२० +३०९७ + ३०९२, २६४० अशा दहा अपिलांवर  आदेश दिले असून अपील क्र. ११२८, ११३०, २४४ + ६२८ + ६४ ८+ ६५१ + ८९२ + ८९३,  २९९ + ६५६ + ७१०, ११२४ + ११३१ अशी एकूण १३ अपिले ही राज्य मुख्य माहिती आयुक्तांकडे हस्तांतरित केली आहेत.

ज्यात कोणताही सार्वजनिक हिताचा विषय नसून केवळ वैयक्तिक स्वरुपाची बाब आहे, अशा एकाच संदर्भात एकाच संस्थेकडील माहिती-मागणीच्या विषयासाठी आयोगासह विविध यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती सातत्याने खर्ची घालणे योग्य नाही. हे लक्षात घेता उभय बाजूंनी  संदर्भित विषयाच्या सर्व अभिलेखाच्या अवलोकनाची प्रक्रिया एकदाच पूर्ण करुन अपीलकर्त्यास त्यातील हव्या असलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती देण्याची कार्यवाही करावी. अभिलेख अवलोकनाच्या तारखेबाबतचे उभयमान्य लेखी निवेदन संयुक्तरीत्या द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने दिले. सध्याचे महाविद्यालय प्रवेशाचे काम लक्षात घेता सुट्टीच्या दिवशी अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करुन देणे सोयीचे होईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी  व अपिलीय प्राधिकारी यांनी केले. परंतु कार्यालयीन कामकाजाच्या दिवशीच कागदपत्रे उपलब्ध व्हावीत, अशी मागणी प्रा. वानखडे यानी केली. त्यानुसार दि. ११/७/२०११ ते १४/७/२०११ यापैकी दोन दिवस दुपारी  १ ते ४ या वेळेत अभिलेख निरीक्षणासाठी उपलब्ध करुन

देण्याबाबत उभयमान्य झाल्याचे लेखी निवेदन अपीलकर्ता प्रा. रमेश केशवराव वानखडे, जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक श्री. अरुण पंढरीनाथ शेलार व अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य डॉ. विनायक पीटर तुजारे यांनी सादर केले.

आयोगाकडील प्रा. वानखडे यांच्या अपील क्र. १९४२, अपील क्र. २६४१, अपील क्र. १९४१/२०१०, अपील क्र. ७९६/२०११ या बाबतही हा निर्णय लागू असून याच विषया संदर्भातील त्यांच्या यापुढील अपिलांची दखल घेतली जाणार नाही, याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. इमतियाज महिबुब बागवान
२६६, गुरुवार पेठ, भाजी मार्केट, कराड
जि. सातारा ४१५ ११० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमि अभिलेख, सातारा यांचे कार्यालय,
ता. कराड, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अधीक्षक,
भूमि अभिलेख, सातारा यांचे कार्यालय,
ता. कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१००/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. इमतियाज महिबुब बागवान
२६६, गुरुवार पेठ, भाजी मार्केट, कराड, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमि अभिलेख, सातारा यांचे कार्यालय,
ता. कराड, जि. सातारा श्री. संभाजी कुंडलिक जाधव

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा उप अधीक्षक,<br>भूमि अभिलेख, सातारा यांचे कार्यालय,<br>ता. कराड, जि. सातारा श्री. दिगंबर नाथा भांदुर्गे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - कऱ्हाड येथील जुन्या मशिदीच्या जागेची मोजणी जिल्हाधिका-यांच्या आदेशाप्रमाणे भूमि अभिलेख कार्यालयाने केली. त्यानी उपविभागीय अधिकाऱ्यांना पाठविलेला पहिला नकाशा व अहवाल परत आला. सुधारणा करुन नकाशा व अहवाल भूमि अभिलेख कार्यालयाने जिल्हाधिकाऱ्यांना पुन्हा सादर केला. पहिल्या नकाशात अतिक्रमण झाल्याचे दिसत असून दुसऱ्या नकाशात अतिक्रमण झाले नसल्याचे दर्शविले आहे. पहिल्या नकाशाची प्रत मागितली असता दिली जात नाही. मोजणी नकाशाचे एकूण क्षेत्रफळही दिले नाही.

जन माहिती अधिकारी - उपविभागीय अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या अहवालासोबतच्या नकाशात व नंतरच्या नकाशात कोणताही फरक नाही. आताच्या नकाशात रस्ता निळसर रंगाने दर्शविला. तळटिपा देणे यासारख्या काही त्रुटी असल्याचे उपविभागीय अधिकाऱ्यांनी कळविले असून या त्रुटी दूर करुन नव्या नकाशात सुधारणा केली. त्याची प्रत देऊ केली असता अपीलकर्त्यांनी स्वीकारण्यास नकार दिला. क्षेत्रफळासाठी स्वतंत्र मिळकत पत्रिका होते. नकाशावरुन ते देता येणार नाही.

उपविभागीय अधिकाऱ्यांना सादर केलेल्या पहिल्या नकाशाची प्रत आपल्या कार्यालयात नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्त्यास हवी असलेली प्रत दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याच्या मागणीनुसार भूमि अभिलेख कार्यालयाने दि. ३०.६.२०१० रोजी उपविभागीय अधिकारी, कराड याना सादर केलेल्या संदर्भित नकाशाची प्रत उप विभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. ३० जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. ऋषिकेश अरुण कोळेकर
२५४९, बी वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत द. वडगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६५/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. ऋषिकेश अरुण कोळेकर
२५४९, बी वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर श्री. रविंद्र तात्याबा कांबळे

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत द. वडगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर श्री.रायसिंग गोरजी वळवी

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. सचिन दिनकर कारखेले

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- भारत निर्माण योजने अंतर्गत कामांबाबतची माहिती गटविकास अधिकाऱ्यांकडे मागितली होती. त्यानी अर्ज ग्रामसेवकाकडे वर्ग केला. या योजनेचे दप्तर अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांच्या ताब्यात असल्याने ग्रामपंचायतीला मिळालेले नाही. म्हणून माहिती देता येत नाही, असे तत्कालीन ग्रामसेवक यानी कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही समितीचे अध्यक्ष असलेल्या सरपंचानी माहिती दिली नाही.

जन माहिती अधिकारी - संबंधित योजनेचे दप्तर अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती यांचेकडे असते. सरपंच या समितीचे अध्यक्ष असून त्यानी दप्तराबाबत लेखी कळवून दप्तर दिलेले नाही व योजनेचे कामही अद्याप पूर्ण झालेले नाही.

अपिलीय प्राधिकारी - ७ दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलात दिले. सरपंचांना कळवूनही त्यानी दप्तर ग्रामपंचायतीकडे सुपूर्त केलेले नाही.

शासकीय निधीतून राबविल्या जाणाऱ्या योजनेसंदर्भातील कागदपत्रे ही सार्वजनिक कागदपत्रे आहेत. ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती ही शासकीय कर्मचाऱ्यांची नसली व सरपंच वा अन्य कोणीही त्याचे अध्यक्ष असले तरी ही कागदपत्रे शासनाच्या/ ग्रामपंचायतीच्या ताब्यात देणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (४) मधील तरतुदीनुसार अशा योजनांची माहिती संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने (कार्यालयाने/विभागाने) स्वयंस्फूर्तीने जाहीर करणे बंधनकारक आहे. त्यामुळे मागणी न करताही खर्चाच्या तपशिलासह त्याबाबतची सर्व कागदपत्रे नागरिकांसाठी उपलब्ध करुन दिली गेली पाहिजेत. परंतु तसे न करता ती कागदपत्रे ग्रामपंचायतीकडे सूपूर्त न करणे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५अन्वये मागणी करुनही उपलब्ध करुन न देणे हा या अधिनियमाचा भंग आहे. म्हणून सार्वजनिकरीत्या उपलब्ध असणे आवश्यक असलेली ही कागदपत्रे प्राप्त करुन घेण्यासाठी शासकीय स्तरावरुन संबंधितांविरुध्द कडक कारवाई केली जाणे आवश्यक आहे. ती वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीने भारत निर्माण योजने अंतर्गत केलेल्या कामाबाबतची कागदपत्रे त्वरित ग्रामपंचायतीकडे सुपूर्त न केल्यास अध्यक्ष, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांच्या विरुध्द गटविकास अधिकारी, पंचायत समिती, करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर यानी गुन्हा नोंदवून कडक कारवाई करावी व त्याबाबतचा अहवाल दि. ३०.७.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अजय जोतीराम नलवडे
७८७/क ३, बी वॉर्ड, प्लॉट नं. ६,
रामानंदनगर, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त क्र. २,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मिळकत व्यवस्थापक,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२९/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त क्र. २,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. संजय हिराप्पा हेरवाडे

**जन माहिती अधिकारी** तथा मिळकत व्यवस्थापक,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. रामचंद्र सदाशिव काटकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

क्रीडांगणासाठी संपादन केलेल्या क्षेत्राच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री. अजय जोतीराम नलवडे यानी दि. ३/२/२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेली माहिती दि. २५/२/२०१० च्या पत्रान्वये दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ऊर्वरित माहिती नगररचना विभागाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास पुरविली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. रामचंद्र सदाशिव काटकर व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी उप आयुक्त क्र. २, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. ओमप्रकाश दिवटे यांनी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. ईराण्णा कांताप्पा सिंहासने
७/८८०, वेताळ पेठ, तिसरी गल्ली,
इचलकरंजी, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८३१/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. ईराण्णा कांताप्पा सिंहासने
७/८८०, वेताळ पेठ, तिसरी गल्ली, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय हातकणंगले,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. समीर मा. शिंगटे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय हातकणंगले, ता. हातकणंगले,<br>जि. कोल्हापूर श्री. एस.बी.पाटील |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- मंडल अधिकाऱ्याच्या संदर्भातील माहिती, तसेच त्यांच्या सेवापुस्तकाची प्रत मागितली होती. ती मिळाली नाही.

अपिलीय प्राधिकारी - माहिती त्रयस्थ व्यक्तीशी निगडित होती. परंतु संबंधित मंडल अधिकाऱ्यांना विचारणा केली असता त्यानी माहिती देण्यात हरकत घेतली नाही, म्हणून जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली.

कर्मचाऱ्याच्या संपूर्ण सेवापुस्तकाची प्रत सार्वजनिक हिताच्या सबळ कारणाशिवाय त्रयस्थ व्यक्तीला जन माहिती अधिकाऱ्यांनी देऊ नये.

वरील बाबी लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय जानबा आंबेकर
मु. पो. हडलगे, नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत हडलगे, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८३३/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दत्तात्रय जानबा आंबेकर
मु. पो. हडलगे, नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

**विद्यमान अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री.पांडुरंग गणपती पाटील

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री.परिक्षित दिलीपराव यादव

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत हडलगे, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्रीमती गीता लक्ष्मण बुवा

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - ग्रामपंचायतीच्या सन २००६ ते २००९ या कालावधीतील ठरावांसह विविध स्वरुपाची माहिती मागितली होती. परंतु ती अपूर्ण मिळाली. चलनाने शुल्क भरल्यानंतरही पूर्ण माहिती न देता कोऱ्या कागदावर सहया घेऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी सुनावणीचा रोजनामा नंतर कळविला.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - आमच्या गावात झेरॉक्सची सोय नाही. त्यामुळे ६-७ किलोमिटर अंतरावरील नेसरी येथे जाऊन छायांकित प्रती काढाव्या लागतात. पहिल्या काढलेल्या प्रती नीट आल्या नाहीत. म्हणून पुन्हा एवढया विस्तृत माहितीच्या प्रती काढाव्या लागल्या. त्यामुळे माहिती देण्यास विलंब झाला. मात्र माहितीचे रजिस्टर्ड टपाल अपीलकर्त्यांनी स्वीकरले नाही. अपीलकर्त्यास आणखी माहिती हवी असल्यास ४-५ दिवसांत देता येईल. मात्र प्रत्येक प्रतीवर सही-शिक्का देणे शक्य नाही.

अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली असून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केलेली परिस्थिती लक्षात घेता विलंब क्षमापित करण्यात येत आहे. देऊ केलेली माहिती/रजिस्टर्ड टपाल नाकारण्याची अपीलकर्त्यांची कृती माहितीबाबतच्या त्यांच्या भूमिकेविषयी साशंकता निर्माण करते. माहितीच्या प्रत्येक प्रतीवर अधिकाऱ्यांचा सही-शिक्का देणे हे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. 'माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दिलेली माहिती' असा शिक्का या प्रतींवर असावा, तेवढे पुरेसे आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मारुती भैरु मातले
मु. पो. झुलपेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १२,
जुना राजवाडा, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८५/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मारुती भैरु मातले
मु. पो. झुलपेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. विनोद शिवदास वस्त्रे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने नोटिसा बजावलेल्या खातेदारांची नावे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन मिळाली नाहीत.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी निवाडा क्र. ३०८ बाबतची माहिती मागितली होती. ती त्याना दिली. त्यांच्या अर्जात नमूद केलेला इतर तपशील या निवाडयाशी सुसंगत नाही. म्हणून शोध घेतला असता संबंधित निवाडा क्र. ३०७ असल्याचे निष्पन्न झाले असून त्याची माहिती आता तयार केली आहे.

अपीलकर्त्यांनी स्वतः माहिती मागताना नेमका तपशील देणे आवश्यक आहे. तसा तो न दिल्यामुळे माहितीला विलंब झाल्याची अथवा माहिती न दिल्याची त्यांची तक्रार निरर्थक ठरते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाबुराव शंकर मोरे
तिरंगा कॉलनी, गल्ली नं. २,
जवाहरनगर, कबनूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (आय.आर.डी.पी.),
पंचायत समिती हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कबनूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७३/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. बाबुराव शंकर मोरे
तिरंगा कॉलनी, गल्ली नं. २, जवाहरनगर, कबनूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (आय.आर.डी.पी.),
पंचायत समिती हातकणंगले, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर श्री. राजेंद्र महादेव तळपे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कबनूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. सुखदेव मारुती कांबळे

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - रस्त्यावरील बेकायदेशीर पाण्याच्या टाकीबाबत ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत ठराव झाल्याची माहिती गटविकास अधिकाऱ्यांनी दिली. परंतु मासिक सभा झाली नसून याविषयी ठराव झालेला नाही, असे उत्तर जन माहिती अधिकारी यानी दिले.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी नमूद केलेल्या तारखेला ग्रामपंचायतीची मासिक सभा झालेली नाही, ग्रामसभा झाली. या सभेतील निर्णयाची प्रत अपीलकर्त्यांना दिली आहे. ग्रामपंचायतीच्या दप्तरातील नोंदी त्याना कधीही तपासता येतील.

अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्ता प्रथम अपिलाच्या सुनावणीला अनुपस्थित होते, म्हणून माहिती रजिस्टर्ड टपालाने पाठविण्याचे आदेश जन माहिती अधिकाऱ्याना दिले. त्या आदेशाची त्यानी पूर्तता केली.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. राजाराम महादेव ठाकरे
रा. मौजेवाडी, रत्नागिरी, ता. पन्हाळास, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख कोल्हापूर यांचे कार्यालय,
सोन्या मारुती चौक, जुना बुधवार पेठ, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, पन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५७५/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. राजाराम महादेव ठाकरे
रा. मौजेवाडी, रत्नागिरी, ता. पन्हाळास, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख कोल्हापूर यांचे कार्यालय, सोन्या मारुती चौक,
जुना बुधवार पेठ, कोल्हापूर श्री. हिरालाल शंकर मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमी अभिलेख, पन्हाळा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर श्री. रमेश अर्जुन डांगी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मोजणी नकाशाबाबतची माहिती मागितली होती. आमचे अतिक्रमण नसताना अतिक्रमण दाखविले आहे. सन १९९६ मधील मोजणी व सन २००८ मधील मोजणी यात फरक असून सन २००९ मध्ये झालेल्या मोजणीनुसार शेजाऱ्याने केलेले अतिक्रमण काढले गेले पाहिजे.

जन माहिती अधिकारी - एकदा फेरमोजणी केली असता पुन्हा मोजणी करण्यास सांगणे चुकीचे आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जागेवर जाऊन, नोटीस देऊन मोजणी करण्यात आली आहे. हद्द तपासताना अतिक्रमण आढळले असून तसा नकाशा दिला आहे. अतिक्रमण कोणाचे आहे, हे अपीलकर्त्यांनी नकाशा पाहिल्यास त्याना कळून येईल.

अपीलकर्त्यांची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सदानंद तुकाराम आमते
रा. कोथळी, ता. करवीर, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर भू- विकास बँक इमारत,
तिसरा मजला, हॉटेल पर्ल शेजारी, मध्यवर्ती एस.टी.स्टॅण्ड समोर, कोल्हापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कोलहापूर अधीन जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था कोल्हापूर यांचे कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५३/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर भू- विकास बँक इमारत,
तिसरा मजला, हॉटेल पर्ल शेजारी, मध्यवर्ती एस.टी.स्टॅण्ड समोर,
कोल्हापूर श्री. सचिन रावल

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, कोलहापूर अधीन जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था कोल्हापूर यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री. महेश शेलार

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

विभागीय सह निबंधकांनी दिलेल्या ओदशाप्रमाणे चौकशी करुन अहवालाची मागणी अपीलकर्ता श्री. सदानंद तुकाराम आमते यानी केली होती. विभागीय सह निबंधकांच्या पत्रावरील कार्यवाहीची माहिती दिली. संबंधित कागदपत्रांच्या छायाप्रतीसह सुस्पष्ट माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार दिले. त्यानुसार माहिती दिली. मूळ कागदपत्रातील सहया आपल्या नसल्याचे अपीलकर्त्यांचे म्हणणे आहे. परंतु ही बाब माहितीच्या अधिकारातील अभिप्रायाची नाही. हस्ताक्षर तज्ज्ञांकडून त्यानी त्याबाबतची शहानिशा करावी, असे त्याना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर अधीन जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था कोल्हापूर यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री. महेश शेलार व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर भू-विकास बँक इमारत, कोल्हापूर श्री. सचिन रावल यांनी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. धोंडीराम ज्ञानू पाटील
रि.स.नं.१२२/अ/१/ प्लॉट क्र. ३,
नृसिंह कॉलनी, रिंग रोड, फुलेवाडी, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
वडगांव नगरपरिषद, वडगाव ,ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
वडगांव नगरपरिषद, वडगाव ,ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५८/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. धोंडीराम ज्ञानू पाटील
रि.स.नं.१२२/अ/१/ प्लॉट क्र. ३, नृसिंह कॉलनी, रिंग रोड,
फुलेवाडी, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
वडगांव नगरपरिषद, वडगाव ,ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. राजन भालचंद्र ढवळे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,

| | | |
|---|---|---|
| | | वडगांव नगरपरिषद, वडगाव ,ता. हातकणंगले,<br>जि. कोल्हापूर श्री. रत्नदीप मा. पाटील |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - वडगाव नगरपरिषदेकडील रस्ता रुंदीकरण, बांधकाम परवाने, विकसन नकाशे, आरक्षण आदि बाबतची सन १९५२ ते आज अखेर अशी माहिती मागितली होती. ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - माहिती विहित मुदतीत टपालाने पाठविली. पुन्हा घरपोच दिली. तशी अपीलकर्त्यांच्या पत्नीची सहीची पोहच आहे. आता पुन्हा आवश्यक असल्यास माहिती आणली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. त्या बाबतची पूरक कागदपत्रे जनमाहिती अधिकारी यानी सादर केली असून माहिती मिळूनही न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता करीत असल्याचे दिसते. जन माहिती अधिकाऱ्यांनी सोबत आणलेली माहितीची प्रत अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास देता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विश्वनाथ विठ्ठल व्हनकोरे
तडवळकर गुरुजी वाडा, **अपीलकर्ता**
अशोक नगर, विजापूर रोड,
सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मिळकत व्यवस्थापक,
पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
आगरकरनगर, पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ लिपिक,
उप अभियंता (म्हाडा), गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
शिवाजीनगर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९०७/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.५.२०११ |
| **३.** | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता -** श्री.विश्वनाथ विठ्ठल व्हनकोरे<br>तडवळकर गुरुजी वाडा, अशोक नगर, विजापूर रोड, सोलापूर | |

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ लिपिक,<br>गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, शिवाजीनगर, सोलापूर<br>श्री.एस.एल.जाधव<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मिळकत व्यवस्थापक,<br>पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, आगरकरनगर, पुणे-४११ ००१<br>श्री.एस.जी.घोडे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** शासनाच्या सन १९८९ मधील काही परिपत्रकाच्या प्रती व म्हाडाच्या गाळेवाटपाच्या संदर्भातील माहिती अपूर्ण दिली.

अपीलकर्ता यानी आपण दारिद्रयरेषेखाली असल्याचे नमूद करुन तसा दाखला जोडला आहे. आपण संपादक असून भाडयाच्या जागेत राहतो. दरमहा १०००/- रुपये भाडे आहे. आपल्या वृत्तपत्राच्या लेटर हेडवर नमूद केलेले दोनही मोबाईल क्रमांक आपल्या स्वतःच्या मालकीचे आहेत. दारिद्रयरेषेखाली असल्याचा आपला दाखला सन २०११ मधील आहे, असे अपीलकर्त्यानी आयोगाच्या विचारणेवर नमूद केले.

**अपिलीय प्राधिकारी :-** तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, शिवाजीनगर, सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे यांची बदली झाली आहे. तसेच तत्कालीन सहाय्यक माहिती अधिकाऱ्याची त्याच काळात बदली झाली. त्यामुळे श्री.व्हनकोरे यांच्या अर्जावर विहित कालावधीत कार्यवाही होऊ शकली नाही. परंतु दि.३१.४.२०११ रोजी त्याना माहिती दिली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, शिवाजीनगर, सोलापूर श्री.एस.आर.परबतराव यानी विलंबाबाबतचा खुलासा आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, शिवाजीनगर, सोलापूर श्री.एस.आर.परबतराव यानी दि.१९.५.२०११ च्या पत्राद्वारे खुलासा सादर केला. तो मान्य करण्यात येत आहे. मात्र अद्यापही आपल्याला परिपूर्ण माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता यानी दि.२१.६.२०११ च्या पत्राद्वारे आयोगाकडे केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याच्या मागणीच्या संदर्भातील अभिलेख जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, शिवाजीनगर, सोलापूर श्री.एस.एल.जाधव यानी अपीलकर्त्यास अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावे व त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती कार्यालयीन निधीच्या उपलब्धतेनुसार निःशुल्क पुरवाव्या.

**पुणे.** **(विजय कुवळेकर )**
**दि :- २९ जून २०११** **राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.म.अेजाज चाँदसाब कनूल
११५, रविवार पेठ, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक),
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०६७ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक),<br>शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री.भाऊसाहेब सोनू साबळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

बी.एड. वेतनश्रेणी मिळण्याची अपीलकर्ता श्री.म.अेजाज चाँदसाब कनूल यांची मागणी असून त्या संदर्भात चार ते पाच अर्ज त्यानी केले आहेत. हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नसून प्रशासकीय कार्यवाहीचा आहे. तरीही संबंधित संस्थेला कार्यवाहीबाबत आदेश देण्यात आले आहेत व तसे अपीलकर्त्यास वेळोवेळी कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे श्री.भाऊसाहेब सोनू साबळे यानी केले. माहितीबाबत त्यानी केलेली कर्यवाही व प्रतिपादन रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नामदेव बापूराव पवार
३३/३४ जगदंबानगर, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर ड उपविभाग सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१२ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग, सोलापूर श्री.रविंद्र गोविंद कोलम

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर ड उपविभाग सोलापूर श्री.काशिनाथ शंकर बेळ्ळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन १९९२ मधील विद्युतीकरणाच्या अनुषंगाने अपीलकर्त्यांनी माहिती मागितली होती व आपल्या जागेतून विद्युतवाहिनी नेल्याची त्यांची तक्रार होती. त्यांच्यासमवेत प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करून वस्तुस्थितीची शहानिशा करून दिली आहे. त्यानी मागणी केलेली कागदपत्रांच्या जतनाचा कालावधी २० वर्षांचा आहे. उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती दिल्या आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर ड उपविभाग सोलापूर श्री.काशिनाथ शंकर बेळ्ळे व अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग, सोलापूर श्री.रविंद्र गोविंद कोलम यानी केले. माहितीबाबत त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.चिदानंद गुरलिंगप्पा परतबादी
मु.पो.करजगी, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री बसवराज माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, करजगी, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२४० / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.चिदानंद गुरलिंगप्पा परतबादी
मु.पो.करजगी, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर प्रतिनिधी श्री.एम.एस.मुजावर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री बसवराज माध्यमिक व उच्च माध्यमिक
प्रशाला, करजगी, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्री.के.पी.वाघ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : श्री बसवराज माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, करजगी, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर या शाळेत १५ ऑगस्ट २०१० रोजी केलेल्या स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाच्या स्थानिक केबलवरील थेट प्रसारणाची सीडी मागितली होती. परंतु ती मिळाली नाही. त्या भाषणामध्ये काही आक्षेपार्ह भाग असल्यामुळे सीडी मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी : कार्यक्रमाची सीडी आमच्याकडे नाही. कार्यक्रमाच्या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास दिल्या असून पुन्हा आयोगापुढे सादर करीत आहोत.

अपिलीय प्राधिकारी : कार्यक्रमाची सीडी शाळेने केलेली नाही व तसे अपीलकर्त्यास कळविलेले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता सीडीच्या स्वरूपात नसलेली माहिती अपीलकर्ता मागत आहेत. जन माहिती अधिकारी यानी त्याबाबत विहित मुदतीत उत्तर दिले असून कागदपत्रांच्या प्रती पुरविल्या आहेत. अपीलकर्त्याच्या अन्य तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाच्या नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.किसन रामा झांजे
मु.पो.कोर्टी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोर्टी,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४६ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.बाळू किसन झांजे
मु.पो.कोर्टी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर,
ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.उत्तम यशवंत साखरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोर्टी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर
श्री.संतोष श्रीमंत गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

दारिद्र्यरेषेखालील घरकुल लाभार्थींच्या यादीत आम्हाला घरकुल न देता अन्य व्यक्तींना दिले. त्याबाबतची माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्यांचे चिरंजीव श्री.बाळू किसन झांजे यानी केली.

अपीलकर्त्याची घरकुलाची मागणी असून त्यांची नावे सन १९९७-९८ च्या दारिद्र्यरेषेखालील यादीत आहेत. घरकुल वाटपाबाबतच्या नियमानुसार सन २००२-२००७ च्या दारिद्र्यरेषेखालील यादीत नाव असेल तरच घरकुल दिले जाते. त्याबाबतची सर्व माहिती अपीलकर्त्यास दिली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोर्टी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.संतोष श्रीमंत गायकवाड व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर, ता.पंढरपूर, जि.सोलापूर श्री.उत्तम यशवंत साखरे यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याची घरकुलाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नागेश कृष्णाहरी (कृष्णांत) आडकी
२१/२२, कुचननगर, सिलगारी घरासमोर, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नागेश कृष्णाहरी (कृष्णांत) आडकी
२१/२२, कुचननगर, सिलगारी घरासमोर, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मे १९८९ मधील टिपणी व अर्जावरील आदेश याची प्रत मागितली होती, ती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी : प्रतिनिधी : कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्यास कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतर कसून शोध घेऊनही कागदपत्रे प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा अपीलकर्त्यास कळविण्यात आले. संबंधित कागदपत्रे क वर्गीकरणामधील असून पाच वर्षे जतनाचा कालावधी आहे. त्यामुळे ते नष्ट केला असल्याची शक्यता असून वर्गीकरणाबाबत अपीलकर्त्यास कळविण्यात आले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २८ जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.एस.एम.इनामदार
अध्यक्ष, बहुजन एम्प्लॉइज फेडरेशन, जिल्हा शाखा, सोलापूर,
६३९, सदर बझार, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७५४ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.आबासाहेब मारूती सूर्यवंशी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.शिवाजी वामन चंदनशिवे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री.एस.एम.इनामदार हे संस्थेच्या नावाने अर्ज न करता संघटनेचे अध्यक्ष, म्हणून अर्ज करतात व ते या संघटनेचे पदाधिकारी नसल्याचे अधिकृत पत्र संबंधित संघटनेने दिलेले आहे. तरीही माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.शिवाजी वामन चंदनशिवे यानी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मुस्तफा हैदर हुंचाळकर
सलगर वस्ती, डोणगांव रोड, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, समाधान प्राथमिक मराठी विद्यालय,
समाधाननगर, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१७८ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मुस्तफा हैदर हुंचाळकर
सलगर वस्ती, डोणगांव रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.आबासाहेब मारूती सूर्यवंशी

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, समाधान प्राथमिक मराठी विद्यालय, समाधाननगर, सोलापूर श्री.एस.एल.काटमोरे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : समाधान प्राथमिक मराठी विद्यालय, समाधाननगर, सोलापूर या शाळेतील सन १९९९ ते २०१० या काळातील शिक्षकांच्या हजेरीपत्रकासह चार मुद्दयांची माहिती मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी यानी ती दिली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही.

तत्कालीन जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांनी अर्ज केला त्या काळात मुख्याध्यापक म्हणून माझी नेमणूक होती व मी रजेवर होतो. नंतर मी राजीनामा दिला.

विद्यमान जन माहिती अधिकारी : मी सहशिक्षक असून आता जानेवारी २०११ पासून माझ्याकडे मुख्याध्यापक पदाचा कार्यभार देण्यात आला आहे. संस्थेत वाद असल्यामुळे सर्व अभिलेख बंदिस्त होते. त्यामुळे अर्ज व अन्य कागदपत्रे मला उपलब्ध नसून माहितीबाबतची कार्यवाही करता येत नाही.

अपिलीय प्राधिकारी : संस्थेत वाद असल्यामुळे मुख्याध्यापक पद नियमित नाही. वेतनादि बाबी अडू नयेत, म्हणून सहीचे अधिकार दोघांना दिले आहेत. आठ दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यानी दिले होते. परंतु जन माहिती अधिकारी त्यानुसार कार्यवाही करू शकले नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) विद्यमान मुख्याध्यापकांनी संबंधित अभिलेख संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन अपीलकर्त्यास हवी असलेली माहिती द्यावी. मात्र स्वच्छतागृहांची छायाचित्रे काढून देणे यासारख्या मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शमसोद्दिन शेख हुसेन पटेल
घर नं.७८९, ग.ह.झोपडपट्टी नं.२, विजापूर नाका, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण संचालक (माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण
उपसंचालक, लातूर विभाग, लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१७४ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शमसोद्दिन शेख हुसेन पटेल
घर नं.७८९, ग.ह.झोपडपट्टी नं.२, विजापूर नाका, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण
उपसंचालक, लातूर विभाग, लातूर श्री.नजीरोद्दिन मो.इस्माईल शेख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : न्यू उर्दू हायस्कूल, तेर, ता.जि.उस्मानाबाद या प्रशालेची मान्यता मे १९९८ मध्ये काढण्यात आली असून कायम कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत शिक्षण उपसंचालक, लातूर यानी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद याना ऑक्टोबर २००४ व जानेवारी २००५ मध्ये दिलेल्या आदेशाची प्रत मागितली होती. परंतु ती मिळाली नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> : सन १९९७-९८ मधील हा विषय असून त्या काळात लातूर विभाग अस्तित्वात नव्हता. त्यामुळे शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद याना, तसेच शिक्षणधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यानाही कळविण्यात आले व तसे अपीलकर्त्यास कळविले. विभागणीमुळे या कार्यालयांकडून कागदपत्रांचा शोध घेण्यास विलंब लागला. माहिती सोबत आणली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर श्री.नजीरोद्दिन मो.इस्माईल शेख यानी नमूद केले. अपीलकर्ता यांची माहिती मिळाल्याची पोहोच त्यानी सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. ३० जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.इलियास मौलाना रामपुरे
३६, सरवदेनगर, मुळेगाव रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१८ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर
श्री.आबासाहेब मारूती सूर्यवंशी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर
श्री.शिवाजी वामन चंदनशिवे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.इलियास मौलाना रामपुरे यानी दोन-तीन अर्जांद्वारे विविध स्वरूपाची माहिती मागितली असून त्याना नेमकी कोणती माहिती हवी आहे, हे स्पष्ट होत नाही. अपिलाच्या सुनावणीला अथवा समक्ष बोलाविले असता ते येत नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.शिवाजी वामन चंदनशिवे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.आबासाहेब मारूती सूर्यवंशी यानी केले.

अपीलकर्त्याचे अर्ज पाहता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिपादन रास्त असल्याचे दिसून येते. अपीलकर्त्यानी नेमकेपणाने माहिती मागणे आवश्यक आहे. तसेच 'आदेश द्यावेत,' अशा स्वरूपाची अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय स्वरूपाची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संदिपान नामदेव जगदाळे
२६८, ज्ञानदीप नगर, मु.पो.जेऊर, ता.करमाळा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा,
ता.माढा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, परितेवाडी विविध कार्यकारी
सेवा सहकारी सोसायटी, परितेवाडी, ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १००३ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर श्री.अनिलकुमार द. खंडागळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.संदिपान नामदेव जगदाळे यानी परितेवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, परितेवाडी, ता.माढा, जि.सोलापूर या संस्थेकडे विशिष्ट नमुन्यात माहिती मागितली होती. संस्थेला शासनाकडून ५० टक्के रकमेपेक्षा कमी अनुदान मिळते. मात्र अपीलकर्ता व त्यांचे कुटुंबिय

एकाच प्रकारची माहिती सातत्याने मागत असून त्यांच्या कुटुंबामधील सहा-सात सभासदांना माहिती दिलेली आहे. त्यानी प्रथम अपील न करताच राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर श्री.अनिलकुमार द. खंडागळे यानी केले.

अपीलकर्त्यांनी विस्तृत स्वरूपाची सर्व सभासदांबद्दलची व विशिष्ट तक्त्यातील माहिती मागितली आहे. अशा प्रकारे माहिती संकलित करून देणे, तसेच संस्थेचे सचिव व अध्यक्ष यांच्या सहीने माहिती देणेही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. प्रथम अपील न करता आयोगाकडे अपील करण्याची अपीलकर्त्यांची कृती आक्षेपार्ह आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर यानी अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावे व त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांची लेखी मागणी केल्यास त्यानुसार योग्य ते शुल्क आकारून प्रती द्याव्यात.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नितीन प्रभाकर शेलार
द्वारा-बाळासाहेब भिसे
स.नं.२३६, माळवाडी, बडदे बंगल्याशेजारी, हडपसर, पुणे-४११०२८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र.४,
वानवडी, पुणे शहर, पुणे-४० उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
वानवडी विभाग, वानवडी, पुणे शहर, पुणे-४०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४९२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.नितीन प्रभाकर शेलार<br>द्वारा-बाळासाहेब भिसे<br>स.नं.२३६, माळवाडी, बडदे बंगल्याशेजारी, हडपसर, पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग,<br>वानवडी, पुणे शहर, पुणे प्रतिनिधी श्री.व्ही.बी.गोल्डे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : हडपसर पोलीस स्टेशनच्या हद्दीत भाड्याच्या मोटारी विकणाऱ्या टोळीबाबतची माहिती मागितली होती. परंतु न्यायालयाकडून ही माहिती घेण्यास जन माहिती अधिकारी यानी कळविले.

जन माहिती अधिकारी : संबंधित प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. त्यामुळे सर्व कागदपत्रे व माहिती न्यायालयात दाखल आहे. न्यायालयाकडून अपीलकर्त्यांनी ही माहिती घ्यावी, असे विहित मुदतीत कळविले व अपिलीय प्राधिकाऱ्यानीही ते मान्य केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले आहे. तथापि न्यायालयात दाखल केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग, वानवडी, पुणे शहर, पुणे यानी अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांकडून अर्धवट माहिती मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता यानी दि.२.५.२०११ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. मात्र दोषारोपपत्राची नक्कल जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्यास दिली असून त्यात सर्व तपशील नमूद असल्याचे दिसून येते. आरोपीची बँकेतील खाती इ. तपशील दोषारोपपत्रात नसल्यास तो तपशील शोधून देणे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक नाही. आवश्यक असल्यास अपीलकर्ता न्यायालयाकडून दाखल कागदपत्रांमधील माहिती प्राप्त करून घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिगंबर शंकर गिरमे
सि.स.नं.४२२, कसबा पेठ, पुणे-४११०११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी (गृह शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, (गृह शाखा),
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.दिगंबर शंकर गिरमे<br>सि.स.नं.४२२, कसबा पेठ, पुणे-४११०११<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, (गृह शाखा),<br>जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्रीमती शुभदा नितिन शिंदे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : मंत्रालयातील लोकशाही दिनात मे २००८ मध्ये दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मागितली होती. परंतु योग्य माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी : संबंधित अर्ज पोलीस आयुक्त कार्यालयाकडे देण्यात आला होता. त्यावरील कार्यवाही हा पोलीस खात्याच्या कक्षेतील भाग आहे. ती कागदपत्रे आमच्याकडे नसतात, तसे अपीलकर्त्यास कळविले.

पोलीस आयुक्तालयाला कळवून संबंधित अर्जावरील कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास द्यावी. मात्र अनेक गृहितावर आधारित विचारणा अपीलकर्त्यानी केली असून खुलासा, स्पष्टीकरण याचीही मागणी केली आहे. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, (गृह शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यानी दि.२५.७.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. वॉल्टर सल्ढाना एस.जे.
प्रेसिडेन्ट एल.आर.सी.बी. २००८,
सेंट व्हिंसेंट स्ट्रीट, पुणे ४११ ००१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण),
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
सेंट व्हिंसेंट कॉलेज ऑफ कॉमर्स, रात्र महाविद्यालय,
सेंट व्हिंसेंट स्ट्रीट, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. वॉल्टर सल्ढाना एस.जे.
प्रेसिडेन्ट एल.आर.सी.बी. २००८, सेंट व्हिंसेंट स्ट्रीट, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण),
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे डॉ. न.मा.कडे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,<br>सेंट व्हिंसेंट कॉलेज ऑफ कॉमर्स, रात्र महाविद्यालय,<br>सेंट व्हिंसेंट स्ट्रीट, पुणे डॉ. अनिल बबनराव अडसुळे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - सेंट व्हिंसेंट रात्र महाविद्यालय, पुणे या महाविद्यालयाकडे ८ मुद्दयांची माहिती मागितली होती. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही परिपूर्ण माहिती महाविद्यालय देत नाही. तसेच बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्यांबाबतची माहिती व सेवापुस्तकांच्या प्रती दिल्या जात नाहीत. मात्र या कर्मचाऱ्यांना संस्थेत पुन्हा कामावर घेतलेले आहे.

जन माहिती अधिकारी- संस्थेच्या व्यवस्थापनाशी असलेल्या वैयक्तिक मतभेदातून संस्थेच्या कार्यात अडचणी निर्माण करण्यासाठी अपीलकर्ता माहितीच्या अधिकाराचा वापर करीत आहेत. अर्जात त्यानी नियमांचा वापर, तसेच स्पष्टीकरण, अन्वयार्थ अशा स्वरुपाची विचारणा केली आहे. तरी सेवापुस्तकाची प्रत वगळता सर्व माहिती दिली. पुनःपुन्हा ते या स्वरुपाचे अर्ज करीत असतात व संस्थेने त्याना उत्तरेही दिली आहेत.

अपिलीय प्राधिकारी - जन माहिती अधिका-यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले असून माहितीही दिली आहे. अन्य कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांच्या प्रती त्रयस्थ व्यक्तीला देता येणार नाहीत.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी अनेक मुद्दयांमध्ये स्पष्टीकरण, खुलासा, अन्वयार्थ अशा स्वरुपाची विचारणा केली असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करता येत नाही. तरीही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत योग्य कार्यवाही केली आहे. अन्य कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांच्या प्रती

अपीलकर्त्यास देण्याची प्रस्तुत अपिलातील मागणी कोणत्याही प्रकारे सार्वजनिक हिताशी संबंधित नाही. फार तर सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठाची प्रत अपीलकर्त्यास प्राप्त करुन घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. ज्ञानोबा हनुमंत घोणे
'श्रमिक', भोर एस.टी.स्टॅण्ड जवळ,
मु. पो. ता. भोर, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५७५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. ज्ञानोबा हनुमंत घोणे
'श्रमिक', भोर एस.टी.स्टॅण्ड जवळ, मु. पो. ता. भोर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री. अनिल पवार

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री. उदयसिंह भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - पुणे जिल्हयातील बहुसंख्य अंशकालीन कर्मचा-यांनी ३ ते ४ वर्षे काम केलेले आहे. त्यांना शासकीय सेवेत कायम करण्यात यावे. सातारा व गोंदिया जिल्हयातील अंशकालीन कर्मचाऱ्यांना अशा प्रकारे कायम स्वरुपात नियुक्त्या देण्यात आलेल्या आहेत.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्ता श्री. ज्ञानोबा हनुमंत घोणे यांचा अर्ज नमूद दिनांकाला प्राप्त झाला नाही. तसेच मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असूनही संबंधित कार्यालयीन कर्मचा-यांच्या याद्या आदि सर्व कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. सातारा जिल्हयात झालेली भरती, अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने शासनाने वेळोवेळी काढलेले शासन निर्णय आदि माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यांना उपलब्ध करुन दिली. सर्व अभिलेखांचे अवलोकन त्यानी केलेले आहे.

अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार थेट भरती करता येणार नाही. हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याचा विचार करता येणार नाही. सर्व अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी त्यानी करावी. त्या देण्यात येतील.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्ता श्री. ज्ञानोबा हनुमंत घोणे यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तथापि त्यानी मांडलेला विषय सार्वजनिक हिताच्या संदर्भातील असल्याचे लक्षात घेता संदर्भित अभिलेख त्याना अवलोकनासाठी उपलब्ध करुन देऊन ५० प्रतींपर्यंतची माहिती निःशुल्क देण्याची कार्यवाही जन माहिती अधिकारी यानी करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. सुनिता कांताराम फुलसुंदर
फलॅट नं. २०२, सर्व्हे नं. ६७/१ बी, अपीलकर्ता
प्लॉट नं. १७, इंद्रायणी विहार, विद्यानगर, पुणे- ३२.

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
कामायनी विद्यामंदिर, निगडी, सर्व्हे नं. २४,
प्राधिकरण, निगडी, पुणे - ४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७१५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** सौ. सुनिता कांताराम फुलसुंदर
फलॅट नं. २०२, सर्व्हे नं. ६७/१ बी,
प्लॉट नं. १७, इंद्रायणी विहार, विद्यानगर, पुणे- ३२.

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे यांचे वतीने श्री. नंदकुमार फुले

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,<br>कामायनी विद्यामंदिर, निगडी, सर्व्हे नं. २४,<br>प्राधिकरण, निगडी, पुणे सौ. सुजाता गुरुगोविंद आंबे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - एका मुख्याध्यापकाचा पगारफरक बेकायदेशीरपणे काढण्यात आला असून त्याबाबतच्या आधारभूत शासन निर्णयांची योग्य माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी-अपीलकर्त्यांनी मूळ अर्जात अन्य व्यक्तीच्या पगार फरकाबाबतच्या माहितीची मागणी व तक्रार केलेली नाही. त्यांच्या मूळ अर्जानुसार मुद्देनिहाय उत्तर विहित मुदतीत दिले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी पगारफरकाबाबतचे स्पष्टीकरणही दिले.

काढलेला पगारफरक कायदेशीर की बेकायदेशीर, ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही. तसेच मूळ अर्जाव्यतिरिक्त माहितीची मागणी अपिलात करता येणार नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रामदास गोविंद शेंडगे
बालचित्रवाणी राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था,
आगरकर मार्ग, पुणे ४११ ००४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी पतसंस्था पुणे शहर (१), स.नं.५८२/डी,
गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ४११ ०३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४४५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रामदास गोविंद शेंडगे
बालचित्रवाणी राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, आगरकर मार्ग, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांचे प्रतिनिधी
श्री. विजयसिंह गवळी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी पतसंस्था पुणे शहर (१), स.नं.५८२/डी,
गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे श्री. किरण सोनवणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - बालचित्रवाणी पगारदार सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, आगरकर मार्ग, पुणे या पतसंस्थेविषयीची माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती संस्था स्तरावरील असून आमच्या कार्यालयाच्या स्तरावर उपलब्ध नसल्यामुळे अपीलकर्त्यास विहित मुदतीत तसे कळविले. तसेच अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती सहकार खात्याला सादर करणे संबंधित संस्थांवर बंधनकारक नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार नागरी सहकारी पतसंस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तसेच मूळ अर्जात नसलेली मागणी नंतर त्याच अर्जाचा भाग म्हणून करता येणार नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास हनुमंतराव मडिगेरी
अभिषेक, प्लॉट नं.जी-४८/१० अे, सेक्टर नं.१, साई चौक,
इंद्रायणीनगर, पुणे-४११०३९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभाग अधिकारी, क प्रभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, भोसरी, पुणे-४११०२६ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, क प्रभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, भोसरी, पुणे-४११०२६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री.विलास हनुमंतराव मडिगेरी
अभिषेक, प्लॉट नं.जी-४८/१० अे, सेक्टर नं.१, साई चौक,
इंद्रायणीनगर, पुणे-४११०३९

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभाग अधिकारी, क प्रभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
भोसरी, पुणे श्री.बी.जी.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, क प्रभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
भोसरी, पुणे विद्यमान-श्री.ए.जी.भोसले, तत्कालीन-श्री.एस.जे.वाळके

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : प्रभाग अधिकारी यांच्यावर वेतन, इंधन, वाहन चालक इ. बाबीवर होणाऱ्या खर्चाची तरतूद व मंजूरी याबाबतची सन २००७-२००८ व २००८-२००९ या काळातील माहिती मागितली होती. प्रथम अपिलानंतर व तीही उत्तराच्या स्वरूपात माहिती मिळाली. त्याबाबतच्या पुराव्याची कागदपत्रे व मूळ कागदपत्रांच्या प्रतींच्या स्वरूपात ती माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्ता यानी मागणी केली त्या स्वरूपात तरतुदी असत नाहीत, एकत्रित तरतूद असते. त्यामुळे झालेल्या खर्चाची मुद्देनिहाय माहिती दिली. तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांच्या स्थानांतरणामुळे ती देण्यास विलंब झाला.

अपिलीय प्राधिकारी : आस्थापनाखर्च एकत्रितच नमूद केला जातो, अपीलकर्त्यांना हव्या तशा प्रकारे विषयनिहाय तरतूद कागदोपत्री नसते. त्यामुळे तशी कागदपत्रे देणे शक्य नाही. आवश्यक असल्यास सर्व संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करून देता येतील.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. मात्र जन माहिती अधिकाऱ्यांचे स्थलांतरण इ. कारणामुळे माहिती देण्यास विलंब होऊ नये, याची समज जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, क प्रभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, भोसरी, पुणे श्री.ए.जी.भोसले व अपिलीय प्राधिकारी तथा प्रभाग अधिकारी, क प्रभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, भोसरी, पुणे श्री.बी.जी.पवार यांना देण्यात येत आहे.

अपीलकर्त्यांना आवश्यक असल्यास संचिका अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती सःशुल्क प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामदास मसाजी बनसोडे
अजमेरा, मासूळकर कॉलनी, घर नं.डब्ल्यूबी/४/०९/१०२,
पहिला मजला, पिंपरी, पुणे-१८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक
बांधकाम मंडळ, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक (प्रशासकीय), सार्वजनिक
बांधकाम मंडळ, मध्यवर्ती इमारत, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५२८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामदास मसाजी बनसोडे
अजमेरा, मासूळकर कॉलनी, घर नं.डब्ल्यूबी/४/०९/१०२,
पहिला मजला, पिंपरी, पुणे-१८

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
मध्यवर्ती इमारत, पुणे श्री.सुभाष रामराव थोरवे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यालयीन अधीक्षक (प्रशासकीय), सार्वजनिक बांधकाम मंडळ,
मध्यवर्ती इमारत, पुणे श्री.बाळासाहेब भगवान कर्चे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : सार्वजनिक बांधकाम मंडळात अधीक्षक म्हणून नेमणूक व पदोन्नती देताना श्री.पी.आर.आढारी यानी जातीचे खोटे प्रमाणपत्र देऊन शासनाची फसवणूक केली आहे. त्याबद्दल कारवाई करावी व वेतनाची वसुली करावी, अशी मागणी केली हाती. तसेच त्या अनुषंगाने श्री.आढारी यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत, वेतन प्रमाणपत्र इ. माहिती मागितली होती. जात पडताळणी न करताच त्याना पदोन्नती दिली असल्यामुळे ही सर्व माहिती मिळणे आवश्यक आहे. परंतु जन माहिती अधिकारी यानी ती दिली नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्ता यांचा दि.१८.६.२०१० रोजीचा अर्ज दि.२१.६.२०१० राजी प्राप्त झाला. दि.१६.७.२०१० च्या पत्रान्वये त्याना मुद्देनिहाय उत्तर दिले. त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र.१ ची माहिती दिली. मु.क्र.२,३,४,५ व ७ ही व्यक्तिगत स्वरूपाची माहिती असल्याच्या कारणावरून देता येत नसल्याचे कळविले. मु.क्र.६ व ९ मध्ये त्यानी प्रशासकीय कार्यवाहीची व स्पष्टीकरणाची माहिती मागितली असल्यामुळे ती बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये येत नसल्याचे कळविले. श्री.आढारी यांचे जात वैधता प्रमाणपत्र आमच्या कार्यालयात नव्हते. त्यांची बदली झाली असल्यामुळे ते त्यांच्याकडून मागवून घेऊन त्याची प्रत अपीलकर्त्यांना पाठविली.

श्री.आढारी यांचे मूळ जात पडताळणी प्रमाणपत्र अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी श्री.बनसोडे यानी केली. शुक्रवार, दि.८.४.२०११ रोजी ते अवलोकनासाठी उपलब्ध करून देता येईल, अशी तयारी अपिलीय प्राधिकारी सहाय्यक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मध्यवर्ती इमारत, पुणे यानी दर्शविली. त्यानुसार त्या दिवशी श्री.बनसोडे यानी या मूळ प्रमाणपत्राचे अवलोकन करावे, त्याच वेळी श्री.आढारी यांच्या वेतनाबाबतच्या तपशिलाची प्रत श्री.बनसोडे याना पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपीलकर्त्यांच्या अर्जातील अन्य मुद्दयांबाबत जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाच्या आदेशानुसार श्री.आढारी यांचे मूळ जात वैधता प्रमाणपत्र पाहण्यास व वेतनाच्या तपशिलाची छायाप्रत घेण्यास दि.८.४.२०११ रोजी श्री.बनसोडे उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे मूळ जात वैधता प्रमाणपत्र श्री.आढारी याना परत करण्यात आल्याचे दि.११.४.२०११ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यानी आयोगास कळविले. भ्रष्टाचाराची तक्रार करून अवलोकनासाठी मागितलेली कागदपत्रे पाहण्यास न जाण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नसून माहिती मागण्याच्या त्यांच्या भूमिकेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पोपट भिमराव जाधव
मु.पो.चिणके, ता.सांगोला, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, मा.शिवाजीराव (बापू) शेंडगे,
प्राथमिक आश्रमशाळा व कै.सौ.द्रौपदी धडस, माध्यमिक आश्रमशाळा, आश्रमशाळा
सिध्देवाडी, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०९१ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.१.२०११ |
| **३. उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.पोपट भिमराव जाधव<br>मु.पो.चिणके, ता.सांगोला, जि.सोलापूर | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मा.शिवाजीराव (बापू) शेंडगे प्राथमिक आश्रमशाळा व कै.सौ.द्रौपदी धडस माध्यमिक आश्रमशाळा, सिध्देवाडी, ता.मिरज, जि.सांगली आश्रमशाळेतील प्रारंभापासूनच्या हजेरीपत्रकाच्या प्रतींची मागणी दि.८.१०.२००९ च्या अर्जाद्वारे केली होती. सन १९९१ ते २०१० या कालावधीतील ही माहिती असून जन माहिती अधिकारी यानी १४ महिन्यानी माहिती दिली. तीही सन १९९९ पासूनची व

९२ प्रतींमध्ये दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यानीही वारंवार लेखी व तोंडी सूचना देऊनही जन माहिती अधिकाऱ्यानी दि.२३.१२.२०१० रोजी माहिती दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.पोपट भिमराव जाधव यानी केली.

शालांत परीक्षेविषयीच्या कामकाजामुळे सुनावणीला उपस्थित राहता येत नसल्याचे व दि.२३.१२.२०१० रोजी रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली असल्याचे जन माहिती अधिकारी यानी लेखी निवेदनाद्वारे कळविले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मा.शिवाजीराव (बापू) शेंडगे प्राथमिक आश्रमशाळा व कै.सौ.द्रौपदी धडस माध्यमिक आश्रमशाळा, सिध्देवाडी, ता.मिरज, जि.सांगली सौ.प्रभावती बाळासाहेब धडस या प्राथमिक व माध्यमिक अशा दोन्ही आश्रमशाळेच्या जन माहिती अधिकाऱ्याकडून माहिती देण्यास झालेल्या विलंबाबातचा खुलासा व शास्तीबाबतचे म्हणणे व अपिलीय प्राधिकाऱ्यानी केलेल्या कार्यवाहीबाबतचा खुलासाही आयोगाने मागविला.

मुख्याध्यापकांनी माहिती न दिल्यामुळे श्री.जाधव यानी केलेल्या अपिलानुसार माहिती देण्याबाबत मुख्याध्यापकांना दि.२६.५.२०१० च्या पत्रान्वये कळविले होते. दि.१०.६.२०१० पूर्वी अपीलकर्त्यांना माहिती दिली नाही, तर दंडात्मक कारवाई होईल, याची जाणीव या पत्रात दिली होती. परंत तरीही त्यानी या मुदतीत माहिती दिली नाही. दि.२३.१२.२०१० रोजी माहिती दिल्याचे त्यानी कळविले, असा लेखी खुलासा अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली श्री.दिपक घाटे यानी दि.१.२.२०११ च्या पत्रान्वये केला.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मा.शिवाजीराव (बापू) शेंडगे प्राथमिक आश्रमशाळा व कै.सौ.द्रौपदी धडस माध्यमिक आश्रमशाळा, सिध्देवाडी, ता.मिरज, जि.सांगली सौ.प्रभावती बाळासाहेब धडस यानी दि.१७.६.२०११ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. अपीलकर्त्यास दि.२३.१२.२०१० रोजी माहिती दिली असल्याचे दि.६.१.२०११ व दि.१५.१.२०११ रोजी आयोगाला कळविल्याचे त्यानी नमूद केले आहे. तसेच शालेय कामकाज व मागणी केलेल्या कागदपत्रांचा कालावधी यामुळे पूर्तता करण्याकरीता विलंब झालेला आहे. शाळेकडे उपलब्ध असणारी माहिती देण्यात आली आहे, माहिती देण्यास टाळाटाळ झालेली नाही, असे त्यानी खुलाशात म्हटले आहे. परंतु विलंबाचे कोणतेही समर्थनीय स्पष्टीकरण त्यानी दिलेले नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार दि.८.१०.२००९ च्या अर्जाला दि.७.११.२००९ पर्यंत उत्तर देणे आवश्यक होते. परंतु

दि.२३.१२.२०१० रोजी त्यानी माहिती दिली आहे. सुमारे वीस वर्षांच्या काळातील माहिती अपीलकर्त्यांनी मागितली आहे. हे लक्षात घेतले तरी ती देण्यास तेरा महिन्यांहून अधिक विलंब होणे समर्थनीय नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, मा.शिवाजीराव (बापू) शेंडगे प्राथमिक आश्रमशाळा व कै.सौ.द्रौपदी धडस माध्यमिक आश्रमशाळा, सिध्देवाडी, ता.मिरज, जि.सांगली सौ.प्रभावती बाळासाहेब धडस यानी माहिती देण्यास तेरा महिन्यांहून अधिक विलंब केला आहे. त्यामुळे त्याना रूपये २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. त्यांच्याकडून ही शास्ती ऑगस्ट २०११, सप्टेंबर ०११, ऑक्टोबर २०११, नोव्हेंबर २०११ व डिसेंबर २०११ या महिन्यात देय होणाऱ्या जुलै २०११, ऑगस्ट २०११, सप्टेंबर २०११, ऑक्टोबर २०११, नोव्हेंबर २०११ या महिन्यांच्या वेतनातून पाच हप्त्यात वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सांगली यानी करुन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २८ जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रणजीत संपतराव जाधवराव
फ्लॅट नं. १२, बिल्डिंग डी-१६, सुंदर गार्डन,
माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे ४११ ०५१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७२५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. रणजीत संपतराव जाधवराव
फ्लॅट नं. १२, बिल्डिंग डी-१६, सुंदर गार्डन,
माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे ४११ ०५१

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे श्री. दिलीप भोरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> - अनधिकृतपणे सुरु असलेल्या माध्यमिक शाळांबाबतची सन २००५-२००६ ते २०१०-२०११ या कालावधीतील माहिती व त्या अनुषंगाने कायदेशीर कार्यवाहीबाबतची नियमावली मागितली होती. १० महिने होऊनही माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.

<u>जन माहिती अधिकारी</u> - अपीलकर्त्यांचा अर्ज दि. १४/६/२०१० चा असून तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. के. एन. चौधरी यानी दि. १८.८.२०१० ला उत्तर देऊन यु.पी.सी.ने माहिती पाठविली आहे. ती मला मिळाली नसल्याचे अपीलकर्ता आता सांगत आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. के. एन. चौधरी यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार ३० दिवसांच्या विहित मुदतीत माहिती न पाठविता ३५ दिवस विलंबाने पाठविली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. के. एन. चौधरी यानी याबाबतचा खुलासा शास्ती विषयीच्या म्हणण्यासह ३ दिवसांत सादर करावा. पाठविलेल्या माहितीची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. मात्र सार्वजनिकरीत्या प्रसिध्द असलेली नियमावली ही माहिती जन माहिती अधिकाऱ्यांच्याच कक्षेतील असल्याचे मानता येणार नाही. ती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तसेच खुलासा, स्पष्टीकरण, कारणे या स्वरुपाची मागणी उपरोक्त माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अधिनियमातील तरतुदीनुसार 'माहिती' ठरत नाही.

आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. के. एन. चौधरी यानी अद्यापपर्यंत कोणताही खुलासा आयोगाला सादर केला नाही. याचा अर्थ विलंब व शास्ती याबाबत त्याना काहीही म्हणावयाचे नाही. या स्थितीत ते शास्तीस पात्र ठरतात

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. के. एन. चौधरी यानी विहित मुदतीत माहिती न देता ३५ दिवस विलंबाने दिली आहे. ३५ दिवसांच्या विलंबाबद्दल त्याना (३५ x २५०) रु. ८,७५०/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री. चौधरी यांच्या जुलै २०११ व ऑगस्ट २०११, च्या अनुक्रमे ऑगस्ट २०११ व सप्टेंबर २०११ मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यानी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विनायक शंकर जोरकर
११९७ /२, रामनारायण बंगला, ज्ञानेश्वर पादुका चौक, शिवाजीनगर, पुणे-५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.१,
पुणे महानगरपालिका, घोले रोड, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी, घोले रोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, घोले रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८१० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विनायक शंकर जोरकर
११९७ /२, रामनारायण बंगला, ज्ञानेश्वर पादुका चौक, शिवाजीनगर, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.१,
पुणे महानगरपालिका, घोले रोड, पुणे श्री.विजय भालचंद्र दहिभाते

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी, घोले रोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, घोले रोड, पुणे श्री.विजय लांडगे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : निवासी झोपडपट्टीधारक म्हणून १२ व्यक्तींनी दाखल केलेल्या शिधापत्रिका बनावट आहेत. त्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती व माहिती अद्याप मिळाली नाही. सात झ ोपडपट्टीधारकानी विभागीय आयुक्तांकडे दाखल केलेल्या अपिलाबाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडून वेळेत मिळाली नाही. त्यामुळे तेथे आमच्या विरुध्द निकाल लागला.

<u>जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी</u> : अपीलकर्ता यानी मागणी केलेल्या प्रकरणातील सर्व संचिका त्याना अवलोकनासाठी उपलब्ध करून दिल्या. परंतु त्याना हवी असलेली माहिती त्यात मिळाली नाही. कोणतीही माहिती नाकारलेली नाही. विभागीय आयुक्तांकडे दाखल केलेल्या अपिलाच्या संदर्भातील माहिती न मिळाल्याचे ते म्हणत आहेत. परंतु त्यांच्या मूळ अर्जात या विषयाचा उल्लेख नाही व नंतरही त्यानी तशी स्पष्ट मागणी केलेली नाही. विभागीय आयुक्तांकडील दाखल असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्याना हव्या असल्यास त्यानी विभागीय आयुक्त कार्यालयाकडे मागणी करावी लागेल.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही व त्यांचे प्रतिपादन रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दत्तात्रय अंकुश सायकर
मु. पो. पुनावळे, कृष्णाई निवास,ता. मुळशी, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत आखरवाडी, ता. खेड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१९९/२०१०/सायकर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती खेड, ता. खेड, जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. के.बी.नेहरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत आखरवाडी, ता. खेड, जि. पुणे श्री. के.डी.कोतवाल

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय अंकुश सायकर यानी केलेला माहिती मागणीचा अर्ज आमच्या कार्यालयाला मिळाला नाही. एकाच स्वरुपाची माहिती मागणारा अर्ज तालुक्यातील सर्व ग्रामसेवकांकडे त्यानी पाठविला होता. अर्ज न मिळाल्यामुळे माहिती पाठविली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार माहिती संकलित करुन त्यांच्याकडे दिली. सोबतही आणली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत आखरवाडी, ता. खेड, जि. पुणे श्री. के.डी.कोतवाल यानी केले. माहितीच्या प्रती त्यानी सादर केल्या. ही माहिती अपीलकर्त्यास टपालाने निःशुल्क पाठविण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ. शरदकुमार पन्नालाल कांकलिया
रा. पंचम, प्लॉट नं. १६, स.नं.८८/२, सि.स.नं. १३६३, अपीलकर्ता
गंगा सोसायटी, सहकारनगर नं. २, पर्वती, पुणे ४११ ००९

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
विभागीय कार्यालय क्र. ३, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ०३०.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम नियंत्रण, उप आयुक्त विभागीय कार्यालय क्र. ३,
टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ०३०.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** डॉ. शरदकुमार पन्नालाल कांकलिया
रा. पंचम, प्लॉट नं. १६, स.नं.८८/२, सि.स.नं. १३६३, गंगा सोसायटी,
सहकारनगर नं. २, पर्वती, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
विभागीय कार्यालय क्र. ३, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सतीश श्रीपाद भोसरेकर

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,<br>बांधकाम नियंत्रण, उप आयुक्त विभागीय कार्यालय क्र. ३,<br>टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रमेश रोहिदास वाघमारे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता-सन १९८३ मधील काही बांधकामांच्या संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध होत नसल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी यानी दिले. अभिलेख वर्गवारीनुसार कायम स्वरुपाच्या जतनाची ही कागदपत्रे असून बांधकामाच्या नकाशाची प्रमाणित प्रत मिळणे आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी - अभिलेख शाखेकडून माहिती मागविली असता संबंधित संचिका उपलब्ध होत नसल्याचे त्यानी कळविले.

अपिलीय प्राधिकारी - कायम स्वरुपी जतनाचे हे अभिलेख असून उपलब्ध होत नसल्यामुळे अपीलकर्त्यांनी उपलब्ध करुन दिलेला नकाशा प्रमाणित करुन दिला जाईल.

अपीलकर्त्यांना संबंधित नकाशाची प्रत प्रमाणित करुन द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. १३/४/२०११ रोजी नकाशाची सर्टिफाईड प्रत मिळाली असून काहीही तक्रार राहिलेली नाही, असे अपीलकर्त्यांचे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय क्र. ३, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सतीश श्रीपाद भोसरेकर यानी दि. २१/४/२०११ च्या अहवालासोबत सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ,पुणे**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. वसंत सदाशिव समगीर
मु. पो. वडकीनाला, (सकाळ प्रेस जवळ), ता. हवेली, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी अधिकारी,
पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित,
स्वारगेट, शंकरशेठ रोड, पुणे - ३७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. आगार व्यवस्थापक,
पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित,
स्वारगेट, शंकरशेठ रोड, पुणे - ३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७१६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. वसंत सदाशिव समगीर
मु. पो. वडकीनाला, (सकाळ प्रेस जवळ), ता. हवेली, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी अधिकारी,
पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित,
स्वारगेट, शंकरशेठ रोड, पुणे श्री. त्रिंबक श्रीपाद धारुरकर

**जन माहिती अधिकारी** तथा सहा. आगार व्यवस्थापक,
पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित,
स्वारगेट, शंकरशेठ रोड, पुणे श्री. नितीन रामचंद्र घोगरे

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - एप्रिल २०१० व मे - २०१० मधील माझी काही रजा बेकायदेशीरपणे नामंजूर व बिनपगारी केली. त्याबाबतचा खुलासा मिळाला नाही. तसेच त्या महिन्यातील सर्व कर्मचाऱ्यांच्या रजेबाबतची माहिती अपूर्ण दिली.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांच्या दि. १९.६.२०१० च्या मूळ अर्जानुसार अर्ज संबंधितांकडे वर्ग करुन दि. ३०.६.२०११ रोजी माहिती देण्यात आली. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्याना हव्या असलेल्या मुद्दयांचे स्पष्टीकरणही समक्ष दिले. दोन सेवकांबाबतची माहिती मिळण्याची मागणी केल्यानुसार तीही त्वरित उपलब्ध करुन दिली. सर्व कर्मचाऱ्यांच्या रजेबाबतची माहिती संकलित करुन द्यावी लागली.

अपीलकर्ता यानी मूळ अर्जात अनेक बाबींचा खुलासा, स्पष्टीकरण, कारणे यांची विचारणा केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार ती 'माहिती' ठरत नाही. तसेच सर्व कर्मचाऱ्यांच्या रजेचा तपशील त्यानी मूळ अर्जात मागितलेला नाही. नंतर अपिलात वा अन्य पत्रव्यवहारात त्याच अर्जाचा भाग म्हणून अतिरिक्त माहितीची मागणी करता येणार नाही. तथापि अपिलीय प्राधिकारी यानी तयारी दर्शविल्यानुसार संकलित करुन ११ कर्मचाऱ्यांची एप्रिल २०१० मधील रजेची माहिती अपीलकर्त्यांना पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २८ जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिलीप यशवंत राजगुरव
प्लॉट नं. २८, राजगुरव कॉलनी, अपीलकर्ता
तळेगाव दाभाडे स्टेशन, तास. मावळ,
जि. पुणे ४१० ५०७

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती पडताळणी समिती क्र. ३,
पुणे विभाग, पुणे, पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे - ३७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी,
विभागीय जाती पडताळणी समिती क्र. ३,
पुणे विभाग, पुणे, पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे - ३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१४८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४/२/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती पडताळणी समिती क्र. ३, पुणे विभाग, पुणे,
पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे श्री. भिमराव धोंडीबा खंडाते

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी,<br>विभागीय जाती पडताळणी समिती क्र. ३, पुणे विभाग, पुणे,<br>पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे श्रीमती मनिषा दे. फुले |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - पुणे जिल्हयातील मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय विद्यार्थी व अन्य संबंधित विद्यार्थ्यांना द्यावयाच्या जात पडताळणी प्रमाणपत्रांसंदर्भात मागितलेली माहिती विहित मुदतीत मिळाली नाही. अनेक विद्यार्थ्यांची प्रकरणे कार्यालयामधून गहाळ झाल्याच्या तक्रारी आहेत. तसेच अनेकांना वेळेत प्रमाणपत्रे मिळाली नसल्याच्या तक्रारी आहेत. निःशुल्क माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी देऊनही जन माहिती अधिकाऱ्यानी अपुरी माहिती दिली.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज केला होता. तो आमच्या कार्यालयाला उशिरा प्राप्त झाला. अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती नियमावलीची, तसेच स्पष्टीकरणात्मक स्वरुपाची आहे. तरीही अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. मध्यंतरीच्या काळात मी रजेवर होते. त्यामुळे त्या काळात माहिती देता आली नाही.

अपिलीय प्राधिकारी - जाती पडताळणीच्या संदर्भात आमच्या कार्यालयावर कार्यालयीन कामाचा प्रचंड ताण असून २० पैकी ६ पदे रिक्त आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांकडे एकापेक्षा जास्त कार्यभार आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांनी ‘कामबंद आंदोलना’बाबतही कळविले होते. तसेच अपीलकर्त्यांची माहितीची मागणी सरसकट स्वरुपाची आहे. आलेले एकूण अर्ज, त्यावरील कार्यवाही अशा स्वरुपाची विस्तृत माहिती संकलित करुन देणे शक्य नाही. प्रथम अपील स्वीकारुन ते मुदतीत निदर्शनास न आणणाऱ्या प्रमुख लिपिक श्रीमती आर. व्ही. क्षीरसागर यांच्यावर प्रशासकीय कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

अपीलकर्त्यांची मागणी विस्तृत स्वरुपाची आहे. नियमावली, स्पष्टीकरण, अन्वयार्थ अशा बाबी वगळता ऊर्वरित माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

प्रस्तुत अपिलातील मागणीसाठीच अपीलकर्त्याने अन्य अपील आयोगाकडे केले असून त्याचा अपील क्र. २७०८ आहे. त्याच्या सुनावणीला अपीलकर्ता उपस्थित नव्हते. त्या बाबतही वरील निर्णय लागू आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हिराबाई राजाराम शिंदे
स.नं.२/३, सह्याद्रिनगर, धनकवडी, पुणे-४११०४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१),
स.नं.५८२/डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे-४११०३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हिराबाई राजाराम शिंदे प्रतिनिधी श्रीमत शां.रा.शिंदे
स.नं.२/३, सह्याद्रिनगर, धनकवडी, पुणे-४११०४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी श्री.विजयसिंह गवळी

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), स.नं.५८२/डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे श्री.किरण सोनवणे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता प्रतिनिधी</u> : सत्यवादी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, पुणे या संस्थेच्या संदर्भात चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, पुणे यानी दिले होते. या अहवालाची प्रत माझ्या आईने मागितली होती. भूखंड गायब झाल्याचे हे प्रकरण असून माहिती मिळालेली नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> : संबंधित संस्थेने तपासणीसाठी दप्तर उपलब्ध करून दिलेले नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार संस्थेच्या अध्यक्षांकडे वेळोवेळी दप्तराची मागणी करूनही त्यानी दप्तर न दिल्यामुळे चौकशी करता आलेली नाही. तसे अपीलकर्त्यांना कळविले. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ८० अन्वये कारवाई करून दप्तर उपलब्ध करून देण्याबाबत तहसीलदार तथा दंडाधिकारी, हवेली याना कळविले असून त्यानी पोलीस निरीक्षक, कोथरूड पोलीस स्टेशन याना सूचना दिलेल्या आहेत. मात्र अद्यापही दप्तर उपलब्ध झालेले नाही. ते उपलब्ध झाल्यानंतर चौकशी करून सादर केल्या जाणाऱ्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यांना देण्यात येईल.

याच आशयाचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), स.नं.५८२/डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे श्री.किरण सोनवणे यानी दि.१.४.२०११ रोजी सादर केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) संबंधित प्रकरणात पोलीस निरीक्षक, कोथरूड पोलीस स्टेशन, पुणे-३८ यानी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तहसीलदार तथा दंडाधिकारी, हवेली, पुणे-१ यानी मागवावा व दि.२५.७.२०११ पर्यंत त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय भगवान बनसोडे
मु.पो.पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
बारामती, ता.बारामती, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री शरद विविध कार्यकारी सेवा
संस्था मर्यादित, पाहुणेवाडी, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४५७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय भगवान बनसोडे तर्फे श्री.विठ्ठल बापू भापकर
मु.पो.पिंपळी, ता.बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बारामती,
ता.बारामती, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री शरद विविध कार्यकारी सेवा संस्था मर्यादित,
पाहुणेवाडी, ता.बारामती, जि.पुणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता प्रतिनिधी</u> : अपीलकर्ता श्री.संजय भगवान बनसोडे यानी माझ्या कर्जमाफी संदर्भात माहिती मागितली होती. कर्जमाफी होऊन मला (शेतकऱ्याला) नवीन पिक कर्ज का दिले जात नाही, याची माहिती मिळाली नाही. विषय माझ्याशी संबंधित असल्यामुळे अपीलकर्ता म्हणून माझ्या नावाची नोंद घ्यावी.

<u>जन माहिती अधिकारी</u> : अपील अन्य व्यक्तीचे असून आवश्यक माहिती दिलेली आहे. आमच्या संस्थेला शासनाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष अर्थसहाय्य नाही. त्यामुळे माहिती अधिकाराचा कायदा लागू होत नाही. तरीही श्री.भापकर याना माहिती दिली आहे.

'श्री शरद विविध कार्यकारी सेवा संस्था मर्यादित,' या संस्थेला शासनाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कोणतेही अर्थसहाय्य नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ मधील तरतुदीनुसार ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत नसल्यामुळे उक्त अधिनियम संस्थेला लागू होत नाही. तसेच आधी अन्य व्यक्तीच्या नावे अर्ज व अपील करणे व नंतर संबंधित त्रयस्थ व्यक्तीने स्वत:चे अपील असल्याचे नोंदविण्याची मागणी करणे हे नियमबाह्य आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. २८ जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.सुजाता साईनाथ चंद्रावळे
सह्याद्री साल रोड, खटकाळी, मु.पो.घोडेगांव, ता.आंबेगाव, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी), पंचायत समिती,
आंबेगांव, ता.आंबेगाव, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत गंगापूर बु.,
ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७८१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.सुजाता साईनाथ चंद्रावळे
सह्याद्री साल रोड, खटकाळी, मु.पो.घोडेगांव, ता.आंबेगाव, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी), पंचायत समिती,
आंबेगांव, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.चंद्रकांत रघुनाथ बांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत गंगापूर बु.,
ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.गणेश हरीशचंद्र थोरात

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : ग्रामपंचायत हद्दीतील जागेची नोंद व गावातील आजाराच्या साथीत शाळेच्या विद्यार्थ्यांवर झालेला परिणाम याबाबतची माहिती अद्याप परिपूर्ण मिळालेली नाही. ग्रामपंचायतीची मतदार यादी फक्त मिळाली. गावातील पाणी दूषित झाल्याची माहितीही निरंक असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यानी कळविले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : सन १९८८ ते २०१० या कालावधीतील माहिती अपीलकर्त्यांनी विविध मुद्दे उपस्थित करून मागितली. ग्रामपंचायत दप्तरात असलेली माहिती देऊन ऊर्वरित माहिती निरंक असल्याचे कळविले आहे. तत्कालीन ग्रामसेवकानी त्वरित माहिती तयार करून कळविले होते. परंतु अपीलकर्त्यानी माहिती नेली नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता मतदार यादीसारखी सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली व योग्य ते शुल्क भरून स्वतंत्रपणे प्राप्त होणारी माहिती माहितीच्या अधिकारात मागण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. तसेच अभिलेखानुसार माहिती मिळू शकते. स्पष्टीकरण, अभिप्राय अशा स्वरूपाची विचारणा माहिती म्हणून करता येणार नाही याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.माणकचंद लक्ष्मण बाहेती
हरिहर अपार्टमेंट, ७२८/ब, सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.३,
पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी, कसबा-विश्रामबागवाडा,
क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |
| **३.** | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री.माणकचंद लक्ष्मण बाहेती
हरिहर अपार्टमेंट, ७२८/ब, सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, विभागीय कार्यालय क्र.३,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.सुरेश नरसिंहराव जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी, कसबा-विश्रामबागवाडा,
क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगपालिका, पुणे श्री.सुनिल भालचंद्र केसरी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : विद्युत अभियंत्याबद्दल केलेल्या तक्रारीवरील कार्यवाही, भूमिगत वीज वाहिनीत रस्त्याचे नुकसान झालेली ठिकाणे व रस्त्याचे डांबरीकरण आदीबद्दलची माहिती विचारली असता दिशाभूल करणारी उत्तरे दिली. केलेली कार्यवाही दूरध्वनीवरून सांगितली. एका रस्त्यावरील दिवे लवकर सुरू झाले, अन्य रस्त्यावरील दिवे उशिरापर्यंत सुरू होते. याबद्दलही तक्रारी केल्या होत्या. वेळोवेळी केलेल्या अशा तक्रारींची योग्य दखल घेतली जात नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्ता विविध स्वरूपाच्या तक्रारी लेखी व दूरध्वनीद्वारे सातत्याने करीत असतात. या तक्रारीवर त्या त्या वेळी उत्तर दिले जाते. त्यांच्या दूरध्वनीवरील तक्रारींचीही नोंद घेऊन वेळोवेळी त्याना माहिती देण्यात आली व येते. भूमिगत वीजवाहिन्या टाकल्यानंतर राडारोडा न उचलल्याबद्दलच्या तक्रारीनुसार प्रत्यक्ष पाहणी करून त्यांच्या शंकांचे निरसन केले. अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रतीही पुरविल्या.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता श्री.बाहेती यांनी दैनंदिन तक्रारीबाबत माहिती मागितल्याचे व कार्यवाहीची अपेक्षा केल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी त्याबाबत माहिती देण्याविषयी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांची भूमिका सार्वजनिक हिताची असली तरी दैनंदिन स्वरूपातील तक्रारीवरील प्रत्यक्ष किंवा पाहणी करून माहिती देण्याची अपेक्षा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती'च्या व्याख्येत पूर्ण होऊ शकत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजी मधुकर चव्हाण
मु.पो.रेडणी, ता.इंदापूर, **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण भवन,
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालय,
लाखेवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७०९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.संभाजी मधुकर चव्हाण
मु.पो.रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालय, लाखेवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे
श्री.दिपक विठ्ठल कदम

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण भवन, पुणे-४११ ००१
श्रीमती विद्या.र.शिंदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालय, लाखेवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे या शाळेतील एप्रिल १९९९ ते जून १९९९ या कालावधीतील शिक्षकांचे पगार पत्रक व हजेरीपत्रक याची प्रत मागितली असता ती माहिती संस्थेकडे असल्याचे कळविल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालय, लाखेवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.दिपक विठ्ठल कदम सांगतात. परंतु त्यांचे पत्र मला मिळालेले नाही.

**जन माहिती अधिकारी :-** अपीलकर्त्याच्या दि.३०.६.२०१० रोजीच्या अर्जाला दि.१५.७.२०१० रोजी उत्तर दिले. त्याची प्रत सादर करत आहे. अंतर्गत वादाच्या अनुषंगाने सर्व दप्तर संस्थने ताब्यात घेतले असून ते मला प्राप्त होत नसल्यामुळे त्यातील माहिती देता येत नाही.

संबंधित कागदपत्रांच्या प्रती सादर करण्याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या.र.शिंदे यानी आयोगाचे निर्देश संस्थेला कळवावे व संस्थेकडून या प्रती मागवून घेऊन अपीलकर्त्यास पुरवाव्यात, असे मौखिक आदेश सुनावणीच्या वेळी आयोगाने दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१.अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या.र.शिंदे यानी दि.२५.७.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ.आय.ए.तडवी
आबेदा इनामदार वरिष्ठ कला, वाणिज्य, **अपीलकर्ता**
विज्ञान महाविद्यालय, कॅम्प, पुणे-४११ ००१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मौलाना आझाद वरिष्ठ कला,
वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद-४३१ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
मौलाना आझाद वरिष्ठ कला,
वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद-४३१ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६६५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** डॉ.आय.ए.तडवी
आबेदा इनामदार वरिष्ठ कला, वाणिज्य,
विज्ञान महाविद्यालय, कॅम्प, पुणे-४११ ००१

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
डॉ.मकदूम फारुकी मौलाना आझाद वरिष्ठ कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय,
औरंगाबाद-४३१ ००१
श्री.एस.ए.खान

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा डॉ.मकदूम फारुकी मौलाना आझाद वरिष्ठ कला,<br>वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद-४३१ ००१<br>डॉ.एन.ए.शुकूर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** डॉ.मकदूम फारुकी मौलाना आझाद वरिष्ठ कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयात आयोजित विषयासाठी औरंगाबाद येथे दि.२७.४.२००९ रोजी माझी मुलाखत झाली होती. त्या अनुषंगाने उपस्थित उमेदवारांचा तपशील, निवड समितीचा अहवाल आदी बाबतची माहिती मागितली होती. ती मिळाली नाही.

**जन माहिती अधिकारी :-** अपीलकर्त्यास यु.पी.सी. ने माहिती पाठविली. संबंधित कागदपत्रे विद्यापीठाला सादर करण्यात आली आहेत. आताही माहिती सोबत आणली आहे.

पाठविलेल्या उत्तरासह सर्व कागदपत्रे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डॉ.मकदूम फारुकी मौलाना आझाद वरिष्ठ कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद श्री.एस.ए.खान यानी आयोगापुढे सादर केली.

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, डॉ.मकदूम फारुकी मौलाना आझाद वरिष्ठ कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद श्री.एस.ए.खान यानी यापूर्वी माहिती दिली असली तरी सोबत आणलेली माहिती अपीलकर्त्यास पुरविण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र सदाशिवराव यादव
१५०/३, मोहनवाडी, आळंदी रोड, **अपीलकर्ता**
येरवडा, पुणे-४११ ००६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
५ फायनान्स रोड, बी.जे.मेडिकल लेडीज हॉस्टेल समोर,
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक,
हवेली क्र.८, जे.जे.कॉम्प्लेक्स, विश्रांतवाडी,
पुणे-४११ ०१५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६६८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.८.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.रविंद्र सदाशिवराव यादव
१५०/३, मोहनवाडी, आळंदी रोड, येरवडा, पुणे-४११ ००६

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक,
हवेली क्र.८, जे.जे.कॉम्प्लेक्स, विश्रांतवाडी, पुणे-४११ ०१५
श्री.रविंद्र काशिराम पाटील

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
५ फायनान्स रोड, बी.जे.मेडिकल लेडीज हॉस्टेल समोर, पुणे-४११ ००१
श्री.संजीव देशमुख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** मिळकतीवरील बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी झालेले दस्त रद्द करण्याच्या कारवाईबाबतची माहिती मागितली होती. परंतु संबंधित प्रकरणात कोठे व केव्हा तक्रार दाखल करणार, तसेच त्यासंदर्भातील अधिकाऱ्यांची नावे, शासन निर्णयाच्या प्रती इ. माहिती मिळाली नाही.

**जन माहिती अधिकारी :-** अपीलकर्त्याच्या दि.१६.६.२०१० रोजीच्या अर्जाला दि.२.७.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर दिले. अपीलकर्त्यानी दस्तांच्या खरेखोटेपणाबद्दल कायदेशीर अन्वयार्थाची व स्पष्टीकरणाची विचारणा केली असून या बाबी न्यायालयाच्या कक्षेतील आहेत, असे स्पष्ट केले. याच संदर्भात अपीलकर्त्याच्या आयोगापुढील अपील क्र.३२ मधील आदेशानुसार तपशीलवार माहिती पुरविली असून वेळोवेळी त्यांच्या पत्रांना उत्तरे दिली आहेत. नोंदणी केलेले दस्तऐवज रद्द करण्याची त्यांची मुख्य मागणी असून ते अधिकार आमच्या विभागाला नाहीत, असेही अपीलकर्त्यास स्पष्ट केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.८, पुणे श्री.रविंद्र काशिराम पाटील यानी अपीलकर्त्यास माहिती दिली आहे. अन्य मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.** **(विजय कुवळेकर )**

**दि :- २९ जून २०११** **राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विजय विनायक जगताप
सर्व्हे नं.२६, मायावती निवास बोपोडी, पुणे ४११०२० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे शहर,
मध्यवर्ती इमारत, पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथापरिमंडळ अधिकारी फ विभाग,
शिवाजीनगर, धान्य गोदाम, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१८२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजय विनायक जगताप
सर्व्हे नं.२६, मायावती निवास बोपोडी, पुणे ४११०२०

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे शहर,
मध्यवर्ती इमारत, पुणे श्रीमती वैशाली चेतन चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी फ विभाग,
शिवाजीनगर, धान्य गोदाम, पुणे श्रीमती वैशाली वाघमारे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : श्री.व्ही.जी.पवार यांच्या नावे असलेल्या रेशन दुकानाबाबतची पाच वर्षांची माहिती मागितली असता एकाच वर्षाची दिली. त्यांच्या परवान्यावर अन्य व्यक्ती दुकान चालवीत असून त्यातील गैरप्रकारांमुळे माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी : अन्य परवानाधारकाने काम थांबविल्यामुळे शिधापत्रिकाधारकांची गैरसोय होऊ नये म्हणून शेजारच्या दुकानाला संबंधित विभाग जोडण्यात आला आहे. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे त्याबाबत कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व माहिती अपीलकर्त्याना दिली.

माहिती तत्परतेने दिली जाण्याबाबत अधिक दक्षता घेणे आवश्यक असल्याची समज जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी फ विभाग, शिवाजीनगर, धान्य गोदाम, पुणे श्रीमती वैशाली वाघमारे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्ञानेश्वर सिद्राम इटकल
आनंदनगर, चिंचवड, पुणे-१९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी,
पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडल अधिकारी अ विभाग, निगडी,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७८० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.ज्ञानेश्वर सिद्राम इटकल<br>आनंदनगर, चिंचवड, पुणे-१९<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे श्री.डी.बी.जवंजाळ<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडल अधिकारी अ विभाग, निगडी, पुणे श्रीमती एल.डी.शेख | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : स्वस्त धान्य देकानाच्या संदर्भातील क वर्गातील शिधापत्रिकाबाबतची माहिती मागितली होती. एकूण १५ मुद्दयांपैकी तीन मुद्दयाची माहिती मिळाली नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी रूजू झाल्यापासूनची ही माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती करावी.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यांनी अर्जात कोठेही कालावधी नमूद केलेला नाही. तसेच अनेक मुद्दयांमध्ये भाष्य करून तक्रारी केल्या आहेत. या स्वरूपाचे अर्ज ते सातत्याने करीत असून मार्च २०१० ते नोव्हेंबर २०१० या कालावधीत त्यांचे एकूण सहा अर्ज कार्यालयात दाखल आहेत. श्री.इटकल हे दारिद्र्यरेषेखालील असल्यामुळे ११६५ पृष्ठांची माहिती आजपर्यंत त्यांना निःशुल्क देण्यात आली आहे. दि.३१.८.२०१० चा त्यांचा अर्ज दि.१.९.२०१० रोजी प्राप्त झाला. दि.४.९.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर व ७४८ पृष्ठांच्या प्रती पुरविल्या. तशी त्यांची पोहोच आहे. मात्र कार्यालयाकडील निधी लक्षात घेता सातत्याने एवढ्या मोठ्या प्रमाणावर निःशुल्क प्रती देणे शक्य नाही.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यांनी नेमका कालावधी नमूद न करता विस्तृत माहिती मागितली असून २००६-२००७ मध्ये झालेल्या अपात्र शिधापत्रिकाधारकांच्या मोहिमेसह सर्व माहिती देण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यानी अन्नधान्य वितरण अधिकाऱ्याकडे सादर केलेल्या तपासणी अहवालाच्या प्रती जन माहिती अधिकाऱ्यांकडे असतात. परंतु त्यांच्या स्तरावरून त्या न मिळाल्यास आमच्या कार्यालयाकडून त्या प्रती देता येतील. अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकनासाठीही कळविले होते.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी भाष्य, तक्रारी, प्रशासकीय कार्यवाहीची मागणी यासह माहिती मागणीची सांगड घातली आहे. तसेच नेमका कालावधी नाूद न करता विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली आहे. दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना माहिती निःशुल्क देण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये आहे. मात्र संबंधित

कार्यालयाकडील अनुदानाच्या मर्यादेत शक्य होईल तेवढी माहिती नि:शुल्क देण्याची जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची कृती योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कारभारी सहादू चौधरी
रक्षकनगर, फेज-२, बी-३/१०१, खराडी,
चंदननगर, पुणे-४११०१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय,
पुणे-४११००१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५१७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कारभारी सहादू चौधरी
रक्षकनगर, फेज-२, बी-३/१०१,
खराडी, चंदननगर, पुणे-४११०१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय,
पुणे डॉ.रेणू भारद्वाज

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,<br>ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे प्रतिनिधी श्री.सलीम महंमदहनीफ हुंडेकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदलीसंदर्भातील पत्रव्यवहाराच्या प्रती मागितल्या होत्या. अन्य कर्मचाऱ्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणणारा विषय असल्यामुळे ४८ तासांच्या आत माहिती देण्याची मागणी केली होती. परंतु जन माहिती अधिकाऱ्यानी चालढकल करून विलंब केला. हीच माहिती अन्य कार्यालयाकडून मात्र मिळाली.

जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदलीसंदर्भात अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे यानी लिहिलेले गोपनीय स्वरूपाचे पत्र होते. त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित अशी माहिती होती व ४८ तासात माहिती देण्यासारखा जीवित रक्षणाचा संबंध त्यात नव्हता. तसे अपीलकर्त्यास त्वरित कळविले.

अपिलीय प्राधिकारी : संबंधित पत्र खाजगी व गोपनीय असल्याचा अभिप्राय तत्कालीन अपिलीय प्राधिकारी यानी दिल्याचे दिसून येते. मात्र पत्राची प्रत देण्याचे आदेश मी अपिलाच्या निर्णयात दिले.

अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे यानी अन्य कर्मचाऱ्याच्या / अधिकाऱ्याच्या बदलीसंदर्भात संबंधित विभागाच्या सचिवाना लिहिलेले पत्र ही त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती ठरू शकत नाही. तसेच संबंधित पत्र हे वैयक्तिक व गोपनीय स्वरूपाचे नसून अधिकृत कार्यालयीन पत्र आहे. त्यामुळे ती माहिती देणे आवश्यक आहे. मात्र जीवित रक्षणाशी संबंधित माहिती ४८ तासात देण्याची माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूद प्रस्तुत मागणीबाबत लागू होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे यानी बदलीसंदर्भात विभागाच्या सचिवाना लिहिलेल्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास पुरविण्यात यावी.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाबुराव नारायण काटे
उजनी जलविद्युत विभाग, **अपीलकर्ता**
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
भिमा कालवा मंडळ, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
भिमा कालवा मंडळ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.५.२०११ |
| | अन्य समाविष्ट अपील | ३१०/२०११/पुणे |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,<br>भिमा कालवा मंडळ, सोलापूर<br>श्री.उदयकुमार दिगंबर पतकी<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,<br>भिमा कालवा मंडळ, सोलापूर<br>श्री.र.प्र.लांडेकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## **विवेचन**

उप कार्यकारी अभियंता श्री.ब.ल.बायस याना अदा करण्यात आलेले वेतन व भत्ते याबाबत अपीलकर्ता श्री.बाबुराव नारायण काटे यानी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ऑक्टोबर २००२ ते जून २००५ या कालावधीतील माहिती अपीलकर्ता श्री.बाबुराव नारायण काटे यानी मागितली होती. संबंधित प्रकरणातील चौकशी अद्याप चालू असून ती पूर्ण होईपर्यंत माहिती देता येणार नाही, असे अपीलकर्त्यांना वेळोवेळी कळविले आहे. तसेच देय माहितीही दिली आहे. केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने श्री.काटे सातत्याने याच विषयाबाबत विविध स्वरुपाचे आरोप करुन अर्ज, अपिले व अन्य पत्रव्यवहार करीत असतात. याच संदर्भातील त्यांची अपिले आयोगाने यापूर्वी निकाली काढलेली आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, भिमा कालवा मंडळ, सोलापूर श्री.उदयकुमार दिगंबर पतकी यानी पूरक कागदपत्रांसह केले.

एकाच विषयासंबंधात तीच तीच माहिती मागण्यासाठी अपीलकर्ता सातत्याने अर्ज व अपिले करीत असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, भिमा कालवा मंडळ, सोलापूर श्री.उदयकुमार दिगंबर पतकी यांचे प्रतिपादन रास्त आहे. अपीलकर्त्याचा या कृतीमागील उद्देश विचारात घेतला नाही, तरी व्यक्तिगत स्वरुपाच्या विषयासाठी आयोगासह सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती वारंवार खर्ची घालणे योग्य नाही, म्हणून याच विषयासंदर्भातील याच माहितीच्या मागणीसाठी अपीलकर्त्यांनी यापुढे अपिले केल्यास आयोग त्यांची दखल घेणार नाही. याच संदर्भातील अपीलकर्त्याच्या आयोगाकडे दाखल असलेल्या अपील क्र.३१०/२०११/पुणे मध्येही हाच निर्णय लागू राहील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश श्रावण बडेकर
खरबडे प्लॉट, पारवे वस्ती, बार्शी रोड, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मेडीकल डायरेक्टर, माधव स्मृती रूग्णालय,
माढा रोड, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विश्वस्त, माधव स्मृती रूग्णालय,
माढा रोड, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६९ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश श्रावण बडेकर
खरबडे प्लॉट, पारवे वस्ती, बार्शी रोड, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मेडीकल डायरेक्टर, माधव स्मृती रूग्णालय,
माढा रोड, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.शैलेश मायभटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

माधव स्मृती रूग्णालय, माढा रोड, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर या रूग्णालयाबाबतची माहिती न मिळाल्याबाबतची तक्रार अपीलकर्ता श्री.सुरेश श्रावण बडेकर यानी केली.

परंतु हे रूग्णालय पूर्णतः खाजगी असून शासनाचे कोणत्याही स्वरूपाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आर्थिक सहाय्य मिळाले नसून सन २००९ पासून रूग्णालय बंद आहे, असे मेडिकल डायरेक्टर, माधव स्मृती रूग्णालय, माढा रोड, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.शैलेश मायभटे यानी नमूद केले. तसेच संस्थेचे विश्वस्त श्री.प्रकाश तुळपुळे यानीही याच आशयाचे लेखी निवेदन दि.२९.६.२०११ रोजी आयोगाला सादर केले. ते लक्षात घेता उपरोक्त संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.आप्पासाहेब परदेशी मठ
वाणी, प्लॉट नं.१, आगळगांव रोड, बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,
बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१६१ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.आप्पासाहेब परदेशी मठ<br>वाणी, प्लॉट नं.१, आगळगांव रोड, बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,<br>बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर श्री.दशरथ ज्ञानेश्वर काळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : बार्शी तालुक्यातील रॉकेल पुरवठ्याबाबत जानेवारी २००९ ते जुलै २०१० या काळातील दुकाननिहाय माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यानी शुल्क कळविले. परंतु चलन मंजूर करून न दिल्यामुळे शुल्क भरले नाही. माहिती अद्याप मिळाली नाही.

अपिलीय प्राधिकारी : अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरूपाची आहे. त्याबाबतचे शुल्क त्याना कळविले, परंतु शुल्क चलनाने शासनाकडे भरले जाते. छायांकित प्रतीसाठी कार्यालयाकडे अनुदान उपलब्ध नसल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अनुदान मागितले. तसेच कार्यालयाकडे अनुदान नसल्यास संबंधितांना अभिलेख अवलोकन करू देऊन तेथेच माहिती द्यावी, अतिरिक्त अनुदानाची मागणी करू नये, असे शासनाचे परिपत्रक आहे. त्याचीही माहिती अपीलकर्त्यास दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरूपाची आहे. अनुदानाबाबतची जन माहिती अधिकारी यानी नमूद केलेली अडचण रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अभिलेखाचे अवलोकन करून आवश्यक असलेल्या कागदपत्रांची मागणी अपीलकर्ता यानी करावी व प्रतिपृष्ठ रूपये दोन प्रमाणे होणाऱ्या शुल्काच्या रकमेतून छायांकित प्रतींचा खर्च घेऊन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, बार्शी, ता.बार्शी जि.सोलापूर यानी चलनाने शासनाकडे जमा करावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भाऊसाहेब एकनाथ वीर
मल्लिकार्जुन देवळाजवळ, मु.पो.ता.बार्शी, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था
मर्यादित, शेलगांव(क), ता.करमाळा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३१ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भाऊसाहेब एकनाथ वीर
मल्लिकार्जुन देवळाजवळ, मु.पो.ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा,
ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.एस.बी.शिरसेटवार

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित,
शेलगांव(क), ता.करमाळा, जि.सोलापूर श्री.छगन सुंबट पमाघन

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता : समाईक जमीन असूनही भावाला कर्ज दिले व मला दिले जात नाही. म्हणून त्याबाबतच्या कार्यपध्दतीची माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी : अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून त्याची पोहोच आहे. आणेवारी झालेली नसल्यामुळे अपीलकर्त्यास कर्जवाटप करता येत नसल्याचे नमूद करून सर्व बाबी स्पष्ट केल्या आहेत. सन १९९९ पूर्वीचे त्यांच्या भावाच्या अर्जाबाबतचे अभिलेख उपलब्ध नाहीत. परंतु भावालाही आणेवारीअभावी आता कर्जवाटप केले जात नाही.

अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून त्यांचे अन्य मुद्दे व मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रा.ज.कांबळे
शाकुंतल, प्लॉट नं.५५, कोनार्कनगर, विजापूर रोड, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पत्र पेटी क्र.५१५, औरंगाबाद उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पत्र पेटी क्र.५१५, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३७ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पत्र पेटी क्र.५१५, औरंगाबाद श्री.देवानंद घनश्याम पाझारे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पत्र पेटी क्र.५१५, औरंगाबाद श्री.अर्जुन रामजी सरोदे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रा.ज.कांबळे यानी मागितलेली माहिती देण्यात आली असून, त्यानी प्रथम अपील केलेले नाही. दुय्यम सेवापुस्तक तयार करून देण्याची त्यांची मागणी असून ती माहितीचा

अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पत्र पेटी क्र.५१५, औरंगाबाद श्री.अर्जुन रामजी सरोदे व अपिलीय प्राधिकारी तथा अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पत्र पेटी क्र.५१५, औरंगाबाद श्री.देवानंद घनश्याम पाझारे यानी केले.

जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि अपीलकर्त्याच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ ची माहिती 'वैयक्तिक' असल्यामुळे नाकारण्याचा त्यांचा निर्णय अयोग्य आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन कामकाजासंबंधीची माहिती वैयक्तिक स्वरूपाची मानता येणार नाही. ती नागरिकांना दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) 'कार्यालयीन अधीक्षक, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), विभाग उस्मानाबाद यांचे पत्र क्र.आ/२८८९/दु.से.पु., दि.८.११.२००५ च्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतच्या पत्रव्यवहाराच्या प्रती व लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळाअंतर्गत कार्यरत असलेल्या कार्यकारी अभियंता यांच्या जानेवारी २००५ पासून मंजूर करण्यात आलेल्या प्रवास, दैनंदिनीच्या मंजूर आदेशाच्या प्रती' ही माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पत्र पेटी क्र.५१५, औरंगाबाद यानी अपीलकर्त्यास १५ दिवसांत निःशुल्क पुरवावी व अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.काशिनाथ जनार्दन काळे
११५०, रविवार पेठ, जनार्दन निवास, **अपीलकर्ता**
पुणे-४११ ००२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर सचिव,
मिरा-भाईंदर महानगरपालिका, स्व.इंदिरा भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम),
ता. व जि.ठाणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा उपसचिव,
मिरा-भाईंदर महानगरपालिका, स्व.इंदिरा भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम),
ता. व जि.ठाणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१५४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.काशिनाथ जनार्दन काळे
११५०, रविवार पेठ, जनार्दन निवास, पुणे-४११ ००२

**जन माहिती अधिकारी** तथा उपसचिव,
मिरा-भाईंदर महानगरपालिका, स्व.इंदिरा भवन,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम), ता. व जि.ठाणे
श्री.वासुदेव वि.शिरवळकर

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा नगर सचिव,<br>मिरा-भाईंदर महानगरपालिका, स्व.इंदिरा भवन,<br>छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम), ता. व जि.ठाणे<br>श्री.हरेश लक्ष्मण पाटील |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** आमचा एक भाडेकरु पुण्यातील खोली कुलुपबंद करुन त्यांच्या मुले, सुना व नातवांडांसह १५ वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून भाईंदरला कायमचे वास्तव करुन आहेत. म्हणून त्यांचा पत्ता देऊन मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या सन १९९७ व सन २००२ च्या मतदार यादीत त्यांची नावे असल्याची प्रत मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी तथा उपसचिव, मिरा-भाईंदर महानगरपालिका, श्री.वासुदेव वि.शिरवळकर यानी मतदार यादी दिली नाही.

**जन माहिती अधिकारी :-** अपीलकर्त्यांना उत्तर दिले.

मतदार यादी हा सार्वजनिकत्या उपलब्ध असलेला अभिलेख आहे. ती पुरविणे जन माहिती अधिकारी तथा उपसचिव, मिरा-भाईंदर महानगरपालिका, ता. व जि.ठाणे यांच्यावर बंधनकारक नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिगंबर चिमाजी कदम
मु.पो.बेलसर, ता.पुरंदर, **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक, पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग सासवड,
ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१८५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.दिगंबर चिमाजी कदम
मु.पो.बेलसर, ता.पुरंदर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे
श्री.एस.पी.दराडे

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>एकात्मिकृत घटक, पुणे-४११ ००१<br>श्री.ए.एस.खैरे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** मौजे बेलसर, ता.पुरंदर, जि.पुणे येथे गेल्या ५ वर्षांत झालेल्या सर्व विकास कामांची संपूर्ण माहिती मागितली होती. ती अपुरी मिळाली. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक, पुणे श्री.ए.एस.खैरे यानी आदेश दिल्यानंतरही परिपूर्ण माहिती मिळाली नाही.

**जन माहिती अधिकारी :-** अपीलकर्त्याच्या दि.१०.५.२०१० रोजीच्या अर्जाला दि.१९.५.२०१० च्या पत्रान्वये उत्तर देऊन माहिती पुरविली. केवळ २ वर्षांची माहिती असून ती चुकीची व दिशाभूल करणारी आहे, अशी तक्रार अपीलकर्ता यानी केली. अपीलकर्त्यानी दि.३१.५.२०१० च्या पत्रान्वये आणखी काही मुद्दे उपस्थित केले व काही माहिती विशिष्ट नमुन्यात मागणारे पत्र दि.१.६.२०१० रोजी पाठविले. त्यानुसार दि.९.६.२०१० च्या पत्रान्वये तक्त्यात पुन्हा माहिती पुरविली. अशा स्वरुपाचा बराच पत्रव्यवहार अपीलकर्त्यानी केला असून वेळोवेळी उत्तरे देऊन माहिती पुरविली आहे. ५ वर्षांची माहिती त्यानी मागितली असली तरी आधीच्या दोन वर्षांत कामे झालेली नसल्यामुळे तसे कळवून ऊर्वरित ३ वर्षांची माहिती सर्व कागदपत्रांच्या प्रतींसह दिली.

**अपिलीय प्राधिकारी :-** अपीलकर्त्यानी वेळोवेळी मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती पत्रव्यवहारातून मागितली असून त्या त्या वेळी ती देण्यात आली. कोणतीही माहिती नाकारलेली नाही. त्याना हव्या असल्यास अभिलेखांचे अवलोकन करता येईल.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. विशिष्ट नमुन्यात/तक्त्यामध्ये माहिती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर

बंधनकारक नाही. तसेच मूळ अर्जाव्यतिरिक्तची माहिती त्याच अर्जाचा भाग म्हणून अन्य पत्रव्यवहाराद्वारे अथवा अपिलात मागता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश दादु कांबळे
मु.पो.सुगांव, ता.इंदापूर, **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१४६ /२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.रमेश दादु कांबळे
मु.पो.सुगांव, ता.इंदापूर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे
श्री.बी.जी.मोरे

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,<br>तहसील कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे<br>श्री.ना.प्र.पाटील |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** गॅस एजन्सीकडील ग्राहकांची यादी व गॅस सिलेंडर पुरवठयाबाबतच्या तक्रारीवरील कार्यवाहीचा खुलासा मिळाला नाही.

**जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी :-** संबंधित गॅस एजन्सीला कळवून मुद्देनिहाय उत्तर अपीलकर्त्याला दिले. खुलासे व कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. गॅस ग्राहाकांची यादी मोठी असल्यामुळे सी.डी. मध्ये देऊ केली असता अपीलकर्त्याने घेतली नाही. लिखित स्वरुपातच यादी देण्याचा त्यांचा आग्रह आहे.

माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.बी.जी.मोरे यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. सी.डी. मध्ये माहिती न घेण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय हनुमंत सावंत
मु.चिंचोली, पो.देहुरोड,
ता.हवेली, जि.पुणे-४१२ १०१ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा लोकमान्य हॉस्पिटल,
टिळक रोड, प्राधिकरण,
निगडी, पुणे-४११ ०४४

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
लोकमान्य हॉस्पिटल,
टिळक रोड, प्राधिकरण,
निगडी, पुणे-४११ ०४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१५३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.संजय हनुमंत सावंत
मु.चिंचोली, पो.देहुरोड, ता.हवेली, जि.पुणे-४१२ १०१

**जन माहिती अधिकारी** तथा लोकमान्य हॉस्पिटल,
टिळक रोड, प्राधिकरण, निगडी, पुणे-४११ ०४४
श्री.रमेश नारायण शिवळे

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा लोकमान्य हॉस्पिटल,<br>टिळक रोड, प्राधिकरण, निगडी, पुणे-४११ ०४४<br>श्रीमती स्नहेल सचिन भिकुले |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

'लोकमान्य हॉस्पिटल'कडे माहिती मागितली असता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे कळवून हॉस्पिटलने माहिती नाकारली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.संजय हनुमंत सावंत यानी केली.

लोकमान्य हॉस्पिटलला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरुपात शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य मिळत नसून हे हॉस्पिटल चालविणाऱ्या न्यासाला शासनाकडून कोणताही निधी मिळत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५, कलम २ मधील तरतुदीनुसार हे हॉस्पिटल 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही व म्हणून हा अधिनियम त्याला लागू होत नाही. अपीलकर्त्यांना तसे कळवूनही गैरहेतूने त्यानी अपील दाखल केले आहे, असे प्रतिपादन लोकमान्य हॉस्पिटल चे प्रतिनिधी श्री.रमेश नारायण शिवळे व श्रीमती स्नेहल सचिन भिकुले यांनी केले.

लोकमान्य हॉस्पिटलच्या प्रतिनिधींनी केलेले निवेदन लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ त्याना लागू होत नाही व त्यामुळे त्यानी अपीलकर्त्यास दिलेले उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.** **(विजय कुवळेकर )**

**दि :- २९ जून २०११** **राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती निलम लक्ष्मण जगताप
सी १०/६, संभाजीनगर, अप्पर धनकवडी, **अपीलकर्ता**
धनकवडी, पुणे-४११ ०४३

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा उप संचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्रीमती निलम लक्ष्मण जगताप
सी १०/६, संभाजीनगर, अप्पर धनकवडी,
धनकवडी, पुणे-४११ ०४३

**जन माहिती अधिकारी** तथा उप संचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे
श्री.के.एच.थिटे

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक,

| | |
|---|---|
| | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,<br>सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे<br>श्री.एच.आय.शिंदे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

**विवेचन**

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** अनेक आरोप असलेल्या कर्मचाऱ्यालाही पुनर्नियुक्ती देण्यात येत असल्यामुळे करारपध्दतीने अशी नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांबाबतची माहिती मागितली होती. ती जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे श्री.के.एच.थिटे यानी दिली नाही.

**जन माहिती अधिकारी :-** अपीलकर्त्यांनी पुनर्नियुक्तीच्या अनुषंगाने काही कर्मचाऱ्यांच्या संदर्भात स्पष्टीकरणात्मक विचारणा केली होती. त्या अनुषंगाने त्याना माहिती दिली. अभिलेखानुसार माहिती देण्यात आली असल्यामुळे त्यांच्या प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यात आली नाही. मात्र त्यानंतर ७ महिन्यांनी त्यानी आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. स्पष्टीकरण, खुलासा अभिप्राय अशा स्वरुपाची विचारणा अपीलकर्त्यांनी केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार ती 'माहिती' ठरत नाही. मात्र अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यानी अपिलाचा निर्णय विहित मुदतीत देणे आवश्यक असल्याची समज अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे श्री.एच.आय.शिंदे याना देण्यात येत आहे. अपीलकर्त्यांनीही उपरोक्त अधिनियमातील तरतुदींनुसार विहित मुदतीतच अपील केले पाहिजे, याची समज अपीलकर्त्या श्रीमती निलम लक्ष्मण जगताप याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे.
दि :- २९ जून २०११

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अरूण शिवाजीराव काळे
कारागृह कर्मचारी निवासस्थान क्र.२३/४०, नागपूर चाळ, येरवड, पुणे-४११००६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनियंत्रक, वैधमापन शास्त्र, अन्न, नागरी पुरवठा,
ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे कार्यालय,
शासकीय कुटीर क्र.७, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नियंत्रक, वैधमापन शास्त्र, अन्न, नागरी पुरवठा,
ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे कार्यालय,
शासकीय कुटीर क्र.७, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४०१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.४.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अरूण शिवाजीराव काळे
कारागृह कर्मचारी निवासस्थान क्र.२३/४०, नागपूर चाळ, येरवड, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नियंत्रक, वैधमापन शास्त्र, अन्न, नागरी पुरवठा,
ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई याचे कार्यालय, शासकीय कुटीर क्र.७,
फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुंबई श्री.श्रीकृष्ण विष्णू आपटे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोरील सुनावणीत खालीलप्रमाणे निवेदन केले :

<u>अपीलकर्ता</u> : वैधमापन शास्त्र यंत्रणेतील रिक्त पदांसाठीची परीक्षा मराठी भाषेतून घेण्यात येईल असे जाहीर केलेले असताना इंग्रजीतून परीक्षा घेतली गेली. तसे करण्याबाबतच्या शासन आदेशाची प्रत जन माहिती अधिकाऱ्यानी दिली नाही. अन्य मुद्दयाचे स्पष्टीकरणही दिलेल्या माहितीतून होत नाही.

<u>जन माहिती अधिकारी</u> : अपीलकर्त्यांच्या दि.११.३.२०१० च्या अर्जात दोन मुद्दे होते. दोन्ही मुद्दयाचे उत्तर तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यानी दि.९.४.२०१० च्या पत्रान्वये दिले. दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान न झाल्यामुळे आठ मुद्दे उपस्थित करणारे अपील त्यानी केले. त्यातील त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतीही त्याना दिल्या. त्यांच्या मागणीनुसार खुलासा, स्पष्टीकरण देता येणार नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकाऱ्यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले आहे. मूळ अर्जाव्यतिरिक्तचे मुद्दे उपस्थित करून कागदपत्रांची व स्पष्टीकरण, खुलासा, अभिप्राय, अशा स्वरूपाची मागणी अपीलकर्ता यानी अपिलात केली आहे. विहित प्रक्रियेनुसार हे योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २८ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विलास दत्तात्रय बारवकर
रा. विद्याधाम सोसायटी, चाकण, ता. खेड, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपजिल्हाधिकारी,
पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे - १

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार
(गृह शाखा), पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे - १

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विलास दत्तात्रय बारवकर
रा. विद्याधाम सोसायटी, चाकण, ता. खेड, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार
(गृह शाखा), पुणे जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्रीमती शुभदा नितीन शिंदे

| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - दि. २८/५/१९९९ रोजी झालेल्या लकी ड्रॉची माहिती मागितली असता दि. १८/५/२०११ च्या लकी ड्रॉची माहिती दिली जाते. मागितलेल्या तारखेनुसार योग्य माहिती दिली जात नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्ता या एकाच विषयाबाबत सातत्याने अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करीत असून पोलिस आदि अन्य विभागांकडूनही एकाच माहितीची मागणी करीत आले आहेत. अ.क्र. १५६४/पुणे मध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार पुन्हा अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून वेळोवेळी त्यांच्या मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रतीही पुरविण्यात आल्या आहेत. तसेच संबंधित प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याची माहितीही देण्यात आली आहे.

एकाच विषयाबाबत एकाच माहितीसाठी अपीलकर्ता विविध विभागांकडे वेगवेगळे अर्ज/ अपिले करीत असून त्याना वेळोवेळी माहिती देण्यात आली असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. आयोगाने या पूर्वी अपीलकर्त्यांच्या याच विषयातील अपिल क्र. १५६४/पुणे प्रकरणी आदेश दिले आहेत. या संदर्भात त्याच विषयाची पुनरावृत्ती करुन सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिनेश प्रकाश कावेडिया
६६९, रविवार पेठ, पुणे-४११००२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिनेश प्रकाश कावेडिया
६६९, रविवार पेठ, पुणे-४११००२

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे
श्री.अजय एस.चंदनवाले

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे
श्री.रमेश एन.जगताप

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दिनेश प्रकाश कावेडिया यानी पत्नीला झालेल्या दुखापतीच्या संदर्भातील प्रमाणपत्राची मागणी केली होती. परंतु न्यायवैद्यकीय स्वरूपाचे हे प्रकरण असल्यामुळे संबंधित व्यक्ती व पोलीस यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणालाही वैद्यकीय प्रमाणपत्राची प्रत दिली जात नाही. याच मागणीसाठी अपीलकर्ता यानी केलेले अपील क्र.३७३ / २०१० /पुणे आयोगाने, दि.२५.५.२०१० रोजी अमान्य केले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे श्री.रमेश एन.जगताप व अपिलीय प्राधिकारी तथा अधिष्ठाता, ससून सर्वोपचार रूग्णालय, पुणे श्री.अजय एस.चंदनवाले यानी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असून अपील क्र.३७३/२०१० /पुणे मधील निर्णय प्रस्तुत अपिलातही लागू आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विश्वास भांबुरकर
बी-७२, सॅटेलाईट सेंटर, वस्त्रापूर, अहमदाबाद-३८००१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मुळशी, मुळशी तहसीलदार कार्यालय,
ता.मुळशी, जि.पुणे उत्तरवादी

**(१)जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी,
मुळशी तहसीलदार कार्यालय, ता.मुळशी, जि.पुणे

**(२)जन माहिती अधिकारी** तथा जमिन संकलन लिपीक,
मुळशी तहसीलदार कार्यालय, ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७२९ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.६.२०११ |

**३. उपस्थित**

**(१)जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी,
मुळशी तहसीलदार कार्यालय, ता.मुळशी, जि.पुणे श्रीमती तृप्ती कोलते-पाटील

**(२)जन माहिती अधिकारी** तथा जमिन संकलन लिपीक,
मुळशी तहसीलदार कार्यालय, ता.मुळशी, जि.पुणे श्री.एस.डी.टेकाळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.विश्वास भांबुरकर यानी मौजे वाकड, ता.मुळशी येथील क्षेत्रावरील शैक्षणिक प्रयोजनासाठीच्या अकृषिक परवानगीबाबतची माहिती दि.९.६.२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. दि.३.७.२००९ च्या पत्रान्वये संबंधिताना जागेबाबतच्या बिनशेती आदेशाची प्रत पाठविली. अन्य माहिती नगररचना विभागाकडून प्राप्त करून घेण्याबाबत त्याच पत्रात कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी, मुळशी तहसीलदार कार्यालय, ता.मुळशी, जि.पुणे श्रीमती तृप्ती कोलते-पाटील यांनी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि माहितीच्या अन्य मुद्दयांसाठी अपीलकर्त्याचा अर्ज नगररचना विभागाकडे त्यानी वर्ग करावयास हवा होता. मात्र अपेक्षेप्रमाणे माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मुळशी, मुळशी तहसीलदार कार्यालय, ता.मुळशी, जि.पुणे यांच्यावर भारती दंडविधान संहितेनुसार कार्यवाही करण्याची अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यानी मागणी केलेल्या 'बिल्डिंग प्लॅन मंजुरी क्र.रेखांकन/रातरा/बी/पी/ स.नं.८५/५ब/ताथवडे/मुळशी / २३, / ससंपु /२४२, दि.७.२.२००१' या कागदपत्रांच्या प्रतींसाठी अपीलकर्त्यांचा अर्ज जन माहिती अधिकारी यानी सहाय्यक संचालक, नगररचना, पुणे यांच्याकडे त्वरित वर्ग करावा. सहाय्यक संचालक, नगररचना, पुणे यानी दि.२५.७.२०११ पर्यंत अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क द्यावी.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कांतीलाल एकनाथ देवकर
मौजे देवकरवाडी, ता.दौंड, **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा कृषि अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१५६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित** | |

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा कृषि अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे-४११ ००१

| | |
|---|---|
| | श्री.राजेंद्र खं.डुंबरे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

पुणे जिल्हापरिषदेच्या कृषि विभागाकडून दौंड पंचायत समितीने सन २००१ पासून आजतागायत केलेल्या कृषि साहित्यांची इत्यंभूत माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.कांतीलाल एकनाथ देवकर यानी केली होती. पंचायत समिती दौंड, जि.पुणे यांच्याशी संबंधित माहिती असल्यामुळे अर्ज त्या गटविकास अधिकाऱ्यांकडे वर्ग केला. त्यानी कळविलेले शुल्क अपीलकर्त्यानी भरले नाही. शुल्क भरुन घेऊन माहिती द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यानी दिला. 'माहिती तयार आहे, घेऊन जावी किंवा कार्यालयातील अभिलेखांची पाहणी करावी', असे कळवूनही अपीलकर्त्यांनी त्यानुसार पूर्तता केली नाही, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा जिल्हा कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे श्री.राजेंद्र खं.डुंबरे, तत्कालीन श्री.ए.आर.गुजर व श्री.डी.डी.अडसूळ यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास माहिती आवश्यक असल्यास शुल्क भरुन प्राप्त करुन घेता येईल.

माहिती अन्य 'सार्वजनिक प्राधिकरणा'कडील असल्यास एकाच प्राधिकरणाकडे ५ दिवसांत अर्ज वर्ग करणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार बंधनकारक आहे, याची समज जन माहिती अधिकाऱ्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.** **(विजय कुवळेकर )**

**दि :- २९ जून २०११** **राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रुस्तोम फिरोज अंकलेसारिया
द्वारा श्रीमती तनाज एस.लोंढे
१२३२, जाफरिन लेन, न्यू पुना कोलड्रिंक हाऊस जवळ, **अपीलकर्ता**
कॅम्प, पुणे-४११ ००१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी,
'ड' विभाग, शिवाजीनगर, धान्य गोदाम,
पुणे-४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१८९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी,
'ड' विभाग, शिवाजीनगर, धान्य गोदाम, पुणे-४११ ००५
श्रीमती आशा शंकर होळकर

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-४११ ००१<br>श्रीमती वैशाली चेतन चव्हाण |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

'माझ्या वडिलांनी वयाच्या ६९ व्या वर्षी पुर्नविवाह केला, मला बेकायदेशीरपणे अटक केली. शिधापत्रिकेतून माझे नाव कमी केले, त्याचा दाखला मी मागितला होता. जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, 'ड' विभाग, पुणे यानी तो दिला नाही', अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रुस्तोम फिरोज अंकलेसारिया यानी राज्य माहिती आयोकडील अपिलात केली आहे.

कुटुंबप्रमुखांच्या अर्जाप्रमाणे शिधापत्रिकेत व्यक्तींच्या कमी/जास्त च्या नोंदी केल्या जातात. सप्टेंबर २००८ मध्ये अपीलकर्त्याचे नाव कमी करुन तसा दाखला कुटुंबप्रमुखांना दिला असल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. संबंधित रजिस्टरच्या छायाप्रतीसह अपीलकर्त्यास तसे कळविले. आपला मुलगा खोटारडा असून त्याला तो दाखला दिला, असे प्रतिज्ञापत्र त्याच्या वडिलांनी दिले असून अपीलकर्त्याचा नव्या शिधापत्रिकेसाठीचा अर्ज घेऊन नवी शिधापत्रिका दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, 'ड' विभाग, पुणे श्रीमती आशा शंकर होळकर व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे श्रीमती वैशाली चेतन चव्हाण यांनी केले. त्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिकंदर अहमद शेख
लोणीकाळभोर, द्वारा शेख चाळ, **अपीलकर्ता**
पाषाणकर बाग, ता.हवेली, जि.पुणे-४१२ २०१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ,
खडकमाळ आळी, पुणे-४११ ००२

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ,
खडकमाळ आळी, पुणे-४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१८६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.शिकंदर अहमद शेख
लोणीकाळभोर, द्वारा शेख चाळ,
पाषाणकर बाग, ता.हवेली, जि.पुणे-४१२ २०१

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ,

|  |  |
|---|---|
|  | खडकमाळ आळी, पुणे-४११ ००२<br>श्री.रणजित भोसले |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** नवरंग सहकारी गृहनिर्माण संस्थेने बिनशेती सारा सन १९८१ पासून भरलेला नाही. त्याबाबतची माहिती मागितली होती. ही वसुली अद्याप झालेली नाही', असे लेखी निवेदन अपीलकर्ता श्री.शिकंदर अहमद शेख यानी सादर केले.

**जन माहिती अधिकारी :-** अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि संबंधित संस्थेकडून बिनशेती महसूल वसूल करण्याबाबत संबंधित अधिकारी पातळीवरुन कार्यवाही करण्यात येत आहे.

नवरंग सहकारी गृहनिर्माण सोसायटीकडून बिनशेती महसूल वसूल करण्याबाबत सुनावणी घेऊन तलाठी व अन्य संबंधितांना आदेश देण्यात आले आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली, पुणे श्री.एस.शिर्क यांचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली, पुणे श्री.रणजित भोसले यानी सादर केले.

अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तरीही सार्वजनिक हिताच्या विषयाच्या अनुषंगाने अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय हवेली, पुणे श्री.एस.शिर्के यानी केलेली कार्यवाही उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.** **(विजय कुवळेकर )**
**दि :- २९ जून २०११** **राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश महादेव पवार
आंबेगांव गावठाण, पो.घोडेगांव, **अपीलकर्ता**
ता.आंबेगांव, जि.पुणे-४१२ ४०८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१४९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** महेश महादेव पवार
आंबेगांव गावठाण, पो.घोडेगांव,
ता.आंबेगांव, जि.पुणे-४१२ ४०८

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
पुणे-४११ ००१

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय आवार,<br>पुणे-४११ ००१ |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** येरवडा कारागृह मुद्रणालयाच्या आस्थापनेवर प्रकल्पग्रस्त मजूर म्हणून मला सेवेत घेतले नाही. त्याबाबतची माहितीही अपुरी दिली.

**अपिलीय प्राधिकारी :-** अपीलकर्ता यानी या विषयासंदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे केलेले अपील प्रलंबित आहे. त्यांची नेमणूक का करता येत नाही, याबाबतचा शासकीय परिपत्रकासह सर्व तपशील पुरवूनही ते त्याबाबतीत आकारण अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करीत आहेत.

शासकीय सेवेत नेमणूक देण्याची अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यानी अपीलकर्त्यास माहिती दिली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राहुल दिगंबर कदम
मु.पो.बेलसर, ता.पुरंदर, **अपीलकर्ता**
जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय पुरंदर,
ता.पुरंदर, जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय पुरंदर,
ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१२२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.राहुल दिगंबर कदम
मु.पो.बेलसर, ता.पुरंदर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे
यांचे प्रतिनिधी श्री.पी.आर.कोकटे, लिपिक

| | |
|---|---|
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,<br>तहसील कार्यालय पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे<br>यांचे प्रतिनिधी श्री.पी.आर.कोकटे, लिपिक |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** कुळकायदा कलम ८४ क अन्वये शेतजमिनीचे हस्तांतरण/संपादनाबाबतची सन जानेवारी १९४८ ते मे २०१० या काळातील पुरंदर तालुक्यातील माहिती विशिष्ट तक्त्यामध्ये मागितली होती. गाव नमुना १ ड मध्ये ही नोंद असते. प्रथम अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे यानी माहिती दिली.

**जन माहिती अधिकारी :-** अपीलकर्त्याचा दि.२६.५.२०१० रोजीचा अर्ज दि.२९.५.२०१० रोजी प्राप्त झाला. दि.२८.६.२०१० च्या पत्रान्वये उत्तर देऊन शुल्क कळविले. कुळकायदा शाखेकडील रजिस्टरची माहिती घेऊन जाण्यास कळविले होते. सन १९४८ ते २०१० या कालावधीतील माहिती संकलित करुन देणे आवश्यक होते. ४० तलाठ्यांकडून १०१ गावांची माहिती संकलित करुन तलाठी दप्तरातील नमुना १ ड बाबतची माहिती दि.१७.६.२०११ रोजी दिली.

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय पुरंदर, ता.पुरंदर, जि.पुणे यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि अपीलकर्त्यास पाठविलेल्या पत्राची नोंद असलेल्या जावक बारनिशीची छायांकित प्रत त्यानी सादर केलेली नाही. ती सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्ञानेश्वर विश्वनाथ वाळुंज
मु.नांदुर, पो.कळंब, **अपीलकर्ता**
ता.आंबेगांव, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
पुणे-४११ ०११

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१,
नारायणगांव, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२२१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.ज्ञानेश्वर विश्वनाथ वाळुंज
मु.नांदुर, पो.कळंब, ता.आंबेगांव, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगांव, ता.जुन्नर, जि.पुणे
श्री.या.शि.खताळ

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे-४११ ०११

| | | |
|---|---|---|
| | श्री.भा.चं.कुंजीर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** कुकडी पाटबंधारे प्रकल्पासंदर्भातील सन २००५ ते २०१० या काळातील विविध स्वरुपाची माहिती ४ अर्जांद्वारे मागितली होती. ती न मिळाल्यामुळे अपील केले. परंतु जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगांव, जि.पुणे श्री.या.शि.खताळ व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे श्री.भा.चं.कुंजीर यांच्या पातळीवरुन माहिती मिळाली नाही.

**जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी :-** अपीलकर्ता यानी दि.१६.९.२०१० रोजी केलेले ४ अर्ज दि.२०.९.२०१० रोजी प्राप्त झाले व दि.१६.१०.२०१० च्या पत्रान्वये त्याना शुल्क कळविले. ते त्यानी भरले नाही. म्हणून माहिती दिली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीला दूरध्वनीवरुन कळवून व लेखी सूचना देऊनही ते आले नाहीत. शुल्क भरल्यास माहिती देता येईल.

चार अर्जांवर एकत्रित अपील करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. प्रत्येक अर्जासाठी स्वंतत्र अपील केले पाहिजे. तसेच अपीलकर्त्यास माहिती हवी असल्यास जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगांव, जि.पुणे यानी विहित मुदतीत कळविलेले शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी लागेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गेनबा भिकू गायकवाड
मु.पो.वाडेबोल्हाई,
ता.हवेली, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण भवन,
पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
सुंदरबाई मराठे विद्यालय, खराडी,
पुणे-४११ ०१४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२१५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.गेनबा भिकू गायकवाड
मु.पो.वाडेबोल्हाई, ता.हवेली, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
सुंदरबाई मराठे विद्यालय, खराडी, पुणे-४११ ०१४
श्री.भागवत मच्छिंद्र जालिंदर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, यशवंतराव चव्हाण भवन, पुणे-४११ ००१
यांचे प्रतिनिधी श्री.पी.व्ही.पाटील, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),

| | |
|---|---|
| | जिल्हा परिषद, पुणे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** सुंदरबाई मराठे विद्यालय या शाळेतील शिक्षकांच्या संदर्भात मागितलेली माहिती अपूर्ण मिळाली. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यानी १५ दिवसांची मुदत देऊनही जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सुंदरबाई मराठे विद्यालय, खराडी, पुणे यानी पूर्तता केली नाही.

**जन माहिती अधिकारी :-** अपीलकर्त्याने मागणी केल्याप्रमाणे 'सेवायोजना यादी' अशा स्वरुपाची यादी शाळेकडे नसते. नावे, पदे याची यादी व पगारबिलाची प्रत, नेमणूक आदेशांच्या प्रती इ. माहिती दिली. रोस्टरची प्रत शाळेकडे नसते, ती एकत्रित अशी संस्थेकडे असते.

**अपिलीय प्राधिकारी :-** अपीलकर्त्याने 'शाळेला मान्यता मिळाल्यापासून'ची सरसकट माहिती मागितली आहे तरीही ती देण्याचा प्रयत्न केला आहे.

अपीलकर्त्याने नेमक्या कालावधीतील व नेमकी माहिती मागणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

१.अपील निकाली काढण्यात येत आहे.

२.अपीलकर्त्याने माहितीची नेमकेपणाने मागणी करावी व तशी मागणी त्यानी केल्यास जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सुंदरबाई मराठे विद्यालय, खराडी, पुणे श्री.भागवत मच्छिंद्र जालिंदर यानी योग्य ते शुल्क आकारुन १० दिवसांत ती पुरवावी.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संभाजी मधुकर चव्हाण
मु.पो.रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, इंदापूर, तहसील कार्यालय, इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, निरवांगी, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२१४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संभाजी मधुकर चव्हाण
मु.पो.रेडणी, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, इंदापूर, तहसील कार्यालय, इंदापूर,
ता.इंदापूर, जि.पुणे श्री.नागेश प्र.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, निरवांगी, ता.इंदापूर, जि.पुणे
श्री.एस.आर.रणमोडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या मागणीनुसार एका खातेदाराचा ७/१२ उतारा मिळाला नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.संभाजी मधुकर चव्हाण यानी केली.

अपीलकर्ता यानी मूळ अर्जात श्री.योगीनाथ जगन्नाथ कांबळे यांच्या ७/१२ उताऱ्याची मागणी केली असून प्रथम अपिलात श्री.योगीराज जगन्नाथ कांबळे, असे नाव दिले आहे. प्रत्यक्षात अशा नावाने ७/१२ सदरी नोंद नसल्यामुळे उतारा दिला नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, निरवांगी, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.एस.आर.रणमोडे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, इंदापूर, तहसील कार्यालय, इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.नागेश प्र.पाटील यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २९ जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र एकनाथ वाघचौरे
८/११/ब, कुलस्वामिनी निवास, **अपीलकर्ता**
शिवनगर, सुतारवाडी,
जि.पुणे-४११ ०२१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
नेहरु शिक्षण संस्था, पुणे द्वारा संभाजी
६९९/२ अ, पहिला मजला,
झांबरे इस्टेट, मुकुंदनगर, पुणे-४११ ०३७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सेक्रेटरी,
नेहरु शिक्षण संस्था, पुणे द्वारा संभाजी
६९९/२ अ, पहिला मजला,
झांबरे इस्टेट, मुकुंदनगर, पुणे-४११ ०३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२१३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.राजेंद्र एकनाथ वाघचौरे
८/११/ब, कुलस्वामिनी निवास,
शिवनगर, सुतारवाडी,
जि.पुणे-४११ ०२१

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सेक्रेटरी,<br>नेहरु शिक्षण संस्था, पुणे द्वारा संभाजी<br>६९९/२ अ, पहिला मजला, झांबरे इस्टेट, मुकुंदनगर, पुणे-४११ ०३७<br>श्री.संदीप महादेव घाटे<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,<br>नेहरु शिक्षण संस्था, पुणे द्वारा संभाजी<br>६९९/२ अ, पहिला मजला, झांबरे इस्टेट, मुकुंदनगर, पुणे-४११ ०३७<br>श्री.संभाजीराव रामचंद्र कुंजीर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता यांचा माहिती मागणारा अर्ज व प्रथम अपील अर्ज आम्हांला मिळाले नाही. आयोगाकडील सुनावणीच्या सूचनेनंतर त्याबाबत कळले. अपीलकर्त्यांनी अर्जाची प्रत पुरविल्यास देय माहिती देण्यात येईल, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सेक्रेटरी, नेहरु शिक्षण संस्था, पुणे श्री.संदीप महादेव घाटे व अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, नेहरु शिक्षण संस्था, पुणे श्री.संभाजीराव रामचंद्र कुंजीर यांनी केले. ते लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. अपीलकर्ता श्री.राजेंद्र एकनाथ वाघचौरे यानी मूळ माहिती-मागणी अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी तथा सेक्रेटरी, नेहरु शिक्षण संस्था, पुणे याना सादर करावी व जन माहिती अधिकारी तथा सेक्रेटरी, नेहरु शिक्षण संस्था, पुणे श्री.संदीप महादेव घाटे यानी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार माहिती देण्याबाबत कार्यवाही करावी.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

ॲड.दौलत वि.मोरे
मु.पिंपरेखुर्द, पो.निरा, **अपीलकर्ता**
ता.पुरंदर, जि.पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (महसूल),
पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय,
विधानभवन, पुणे-४११ ००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यासन अधिकारी क्र.४,
आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय,
विधानभवन, पुणे-४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१५१/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.६.२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता -** ॲड.दौलत वि.मोरे<br>मु.पिंपरेखुर्द, पो.निरा,<br>ता.पुरंदर, जि.पुणे | |

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा कार्यासन अधिकारी क्र.४,<br>आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय,<br>विधानभवन, पुणे-४११ ००१<br>श्री.एन.एस.झुंजार<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (महसूल),<br>पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, विधानभवन, पुणे-४११ ००१<br>श्री.सुभाष रा.धर्माधिकारी |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :-

**अपीलकर्ता :-** जमीन मालकावर अन्याय झाल्याबाबत केलेल्या तक्रारीनुसार चौकशी करणे आवश्यक असताना दोन महिने होऊनही कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्याबाबत माहिती विचारली असता तक्रार अर्ज भू-संपादन शाखेकडे पाठविला असल्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी क्र.४, आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, पुणे श्री.एन.एस.झुंजार यानी कळविले. तक्रार अर्जात कुळाबद्दलचा मुद्दा उपस्थित नसताना अर्ज भू-संपादन शाखेकडे पाठविण्याची जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी क्र.४, आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, पुणे श्री.एन.एस.झुंजार यानी दिलेली कृती चुकीची आहे, व त्यामुळे ती माहिती चुकीची ठरते. त्यांचा बेकायदेशीर निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (महसूल), पुणे विभाग, पुणे श्री.सुभाष रा.धर्माधिकारी यानी मूळ तक्रार अर्जाची दखल न घेता कायम केला. त्यामुळे मूळ तक्रार अर्जावर फेरचौकशी करुन माहिती दिली पाहिजे.

**जन माहिती अधिकारी :-** अपीलकर्ता ॲड.दौलत वि.मोरे याचा तक्रार अर्ज कुळकायदा शाखेकडे पाठविला, तसेच जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडूनही याबाबतची माहिती मागविली. तसे अपीलकर्त्यास कळविले.

**अपिलीय प्राधिकारी :-** कुळ व मालक यात वाद असून तक्रार अर्जाची चौकशी करणे हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडून चौकशीचा अहवाल यावयाचा आहे. अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास हव्या असल्यास देता येतील.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास अपीलकर्त्यास उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार त्या प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- २९ जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.देवेंद्र आनंदराव भिलारे
मु.पो.लासुर्णे, ता.कोरेगांव, **अपीलकर्ता**
जि.सातारा-४१५ ५०१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
जिल्हा परिषद (बांधकाम), उप-विभाग, कोरेगांव,
जि.सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**
जिल्हा परिषद (बांधकाम), उप-विभाग, कोरेगांव,
जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०१९/२०१०/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | २९.६.२०११ |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**<br>जिल्हा परिषद, उप-विभाग, कोरेगांव, जि.सातारा<br>श्री.सुरेश भरमाजी बांडगी | |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जुना लासुर्णे फाटा ते लासुर्णे गांव (पाण्याची टाकी) या अंतरातील रस्त्याबाबतची माहिती | |

**विवेचन**

'माझ्या माहिती-मागणी अर्जानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन माझ्या शंकांचे निवारण केले आहे व मला आवश्यक ती कागदपत्रे मिळाली असल्याने अपील निकाली काढावे', असे अपीलकर्ता यांचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उप-विभाग, कोरेगांव, जि.सातारा श्री.सुरेश भरमाजी बांडगी यानी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.उत्तम एच.भंडारे
मिनाक्षी चित्रमंदिरा समोर, **अपीलकर्ता**
पलुस, ता.पलुस, जि.सांगली

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५१/२०१०/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.उत्तम एच. भंडारे यांच्या सेवाविषयक बाबी संदर्भात | |

**विवेचन**

'थकित असणारा २० दिवसांचा पगार देण्याचे लेखी दिले असल्यामुळे माझी काही एक तक्रार राहिलेली नाही. अपील निकाली काढण्यात यावे', असे अपीलकर्ता श्री.उत्तम एच.भंडारे यांचे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली यानी दि.२७.६.२०११ च्या पत्रान्वये आयोगास सादर केले. अपीलकर्ता याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी

(माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली श्री.पी.जी.साठे याची प्रशासकीय कार्यवाही करण्याची कृती उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३० जून २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सिध्दार्थशंकर अमरनाथ शर्मा
सी- ३०१, अनुराग को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी,
महात्मा सोसायटी जवळ, कोथरुड, पुणे ४११ ०३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपप्राचार्य,
आय.एल.एस.विधी महाविद्यालय, लॉ कॉलेज रस्ता, पुणे ४११ ००४

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पर्यवेक्षक,
आय.एल.एस.विधी महाविद्यालय, लॉ कॉलेज रस्ता, पुणे ४११ ००४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८०८/२०१०/पुणे, ८०९/२०१०/पुणे, ८१०/२०१०/पुणे, ८११/२०१०/ पुणे, ८१२/२०१०/पुणे, ८१३/२०१०/पुणे, ८१४/२०१०/पुणे, ८१५/२०१०/पुणे, ८१६/२०१०/पुणे, ८१७/२०१०/पुणे, ८१८/२०१०/पुणे, ८१९/२०१०/पुणे, २७७३/२०१०/पुणे, २७७४/२०१०/पुणे, २७७५/२०१०/पुणे, २७७६/२०१०/पुणे २०७७/२०१०/पुणे |
| २ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जांची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सिध्दार्थशंकर अमरनाथ शर्मा यानी आय.एल.एस.विधी महाविद्यालय, लॉ कॉलेजच्या संदर्भातील शुल्क, काही व्यक्तींची नेमणूक, परीक्षेस बसू न दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी इ.

स्वरुपाची मागणी विविध अर्जाद्वारे केली असून महाविद्यालय कोणतीही माहिती नीट देत नाही, माहिती योग्य व मुदतीत मिळाली नाही, अतिरिक्त शुल्क आकारले इ. कारणांवरुन आयोगाकडे अपील क्र. ८०८/२०१०/पुणे, ८०९/२०१०/पुणे, ८१०/२०१०/पुणे, ८११/२०१०/पुणे, ८१२/२०१०/पुणे, ८१३/२०१०/पुणे, ८१४/२०१०/पुणे, ८१५/२०१०/पुणे, ८१६/२०१०/पुणे, ८१७/२०१०/पुणे, ८१८/२०१०/पुणे, ८१९/२०१०/पुणे, २७७३/२०१०/पुणे, २७७४/२०१०/पुणे, २७७५/२०१०/पुणे, २७७६/२०१०/पुणे, २०७७/२०१०/पुणे अशी एकूण १७ अपिले केली आहेत.

श्री. सिध्दार्थशंकर अमरनाथ शर्मा हे या महाविद्यालयात विद्यार्थी होते. परंतु गैरवर्तणुकीमुळे योग्य ती चौकशी करुन त्यांचे नाव महाविद्यालयाच्या पटावरुन काढून टाकण्यात आले. तसेच पुरेशा हजेरी अभावी महाविद्यालयाने त्याना सन २००८-०९ च्या परीक्षेस बसण्यास परवानगी नाकारली होती. त्यामुळे संस्थेला त्रास देण्याच्या हेतूने ते माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करीत आहेत. सातत्याने विस्तृत स्वरुपाची तपशीलवार माहिती ते मागत असतात. त्यामुळे एकाच व्यक्तीसाठी सातत्याने यंत्रणा राबवावी लागते, असे महाविद्यालयाचे म्हणणे आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता उपरोक्त सर्व अपिलांमध्ये जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले आहे.

याच अपीलकर्त्यांच्या याच संस्थेकडील माहिती-मागणीबाबतच्या अपील क्र. ७४५/२००९/पुणे, ७६५/२००९/पुणे, ७८९/२००९/पुणे, व ७९०/२००९/पुणे वर आयोगाने यापूर्वी आदेश दिले आहेत.

अपीलकर्ता सातत्याने मोठया प्रमाणावर आय.एल.एस.विधी महाविद्यालय या एकाच महाविद्यालयाकडे/ संस्थेकडे विविध स्वरुपाची माहिती मागणारे अर्ज व त्या अनुषंगाने अपिले करीत असल्याचे दिसते. तसेच अपीलकर्त्यांची माहितीची मागणी पूर्णतः व्यक्तिगत स्वरुपाच्या पातळीवरील असल्याचे व त्यात सार्वजनिक हिताचा भाग नसल्याचे दिसून येते. अशा अर्ज व अपिलांमुळे सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती अकारण खर्ची पडते. तसेच एकाच व्यक्तीच्या एवढया मोठया प्रमाणावरील अपिलांच्या परिणामी अन्य अपीलकर्त्यांना क्रमवारीच्या दृष्टीने अधिक लांबणीवर पडावे लागते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा लाभ सर्वसामान्य नागरिकांना तत्परतेने मिळण्यात ते अडसर ठरु शकते. माहितीच्या अधिकाराचा अशा प्रकारचा वापर हा योग्य, जबाबदार व कायद्याचे गांभीर्य राखणारा म्हणता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या मूलभूत उद्दिष्टांशीही सुसंगत नाही. तो अशा प्रकारच्या वापरामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची प्रतिमा संबंधित

संस्था व नागरिक यांच्या लेखी डागाळू शकते व या कायद्याबद्दल गांभीर्य असणाऱ्या यंत्रणांमध्ये त्याबद्दल आणि जे गांभीर्याने, व्यापक समाजहितासाठी या कायद्याचा वापर करतात त्यांच्याबद्दलही अकारण गैरसमज निर्माण होऊ शकतो, तसे होणे व्यापक सार्वजनिक हिताच्या व या कायद्याच्या जनहितकारी अंमलबजावणीच्या दृष्टीने मारक आहे. म्हणून अशा प्रकारचा वापर स्वागतार्ह ठरत नाही, त्याला प्रोत्साहन मिळता कामा नये, सबब आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दादासाहेब किसन जगदाळे
गोदाई निवास, राज गार्डन सोसायटी समोर,
जाधवनगर, वडगाव बुद्रुक, पुणे ४११ ०४१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक मंडळ,
स.नं. ८३२-ए, फा.प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००१.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहसचिव,
महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक मंडळ,
स.नं. ८३२-ए, फा.प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११ ००१.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८८३/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दादासाहेब किसन जगदाळे
गोदाई निवास, राज गार्डन सोसायटी समोर,जाधवनगर, वडगाव बुद्रुक, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक मंडळ,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे श्री. शहाजी हरिभाऊ ढेकणे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहसचिव,<br>महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक मंडळ,<br>भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे श्री. गंगाधर कलप्पा भोसल |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता- महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक मंडळाने किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमाची सुधारित आवृत्ती सन १९९१ मध्ये प्रकाशित केली. एन.सी.इ.आर.टी. च्या सन १९८६ मधील अभ्यासक्रमावर नवा अभ्यासक्रम आधारित असून मूळ अभ्यासक्रमाची प्रत देण्याची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी -मार्च १९९१ मध्ये प्रसिध्द केलेल्या अभ्यासक्रमाची प्रत देऊ केली असता ती आपल्याकडे असल्याचे अपीलकर्त्यांनी सांगितले . एन.सी.इ.आर.टी. च्या सन १९८६ च्या अभ्यासक्रमाची प्रत मंडळाकडे नाही. एन.सी.इ.आर.टी. तयार केलेल्या अभ्यासक्रमानुसार प्रत्येक राज्य शासन स्वतंत्रपणे निर्णय घेते. अपीलकर्त्याना हवी असलेली प्रत एन.सी.इ.आर.टी. कडेच मागावी लागेल. मंडळानेही त्याबाबत एन.सी.इ.आर.टी. कडे पत्रव्यवहार केला आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकारी यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.यशवंत रघुनाथ राहिंज
श्री निवास शितोळेनगर, गणेश मंदीर, मेन रोड
जुनी सांगवी, पुणे ४११ ००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,पिंपरी चिंचवड, महानगरपालिका, पुणे ४११ ०१८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
एच.ए.स्कूल (प्राथमिक/ पूर्व प्राथमिक),
पिंपरी, पुणे ४११ ०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६८०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री.यशवंत रघुनाथ राहिंज
श्री निवास शितोळेनगर, गणेश मंदीर, मेन रोड जुनी सांगवी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
शिक्षण मंडळ,पिंपरी चिंचवड, महानगरपालिका, पुणे श्री. विष्णु जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
एच.ए.स्कूल (प्राथमिक/ पूर्व प्राथमिक), पिंपरी, पुणे श्रीमती अंजली जयंत डोंगरे

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - हिंदुस्थान अँटिबायोटिक्सच्या शाळेने सन १९८९ मध्ये खरेदी केलेले फर्निचर, अंदाजे १९७५ ते १९७८ सालात केलेल्या जुन्या नादुरुस्त वाद्याची खरेदी, नवीन सभागृहाचे बांधकाम इ. संदर्भात मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही. १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. परंतु तरीही माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - सन १९७५ ते १९९० या काळातील माहिती अपीलकर्त्यांनी मागितली आहे. शाळेची जागा हिंदुस्थान ॲटिबायोटिक्स कंपनीच्या मालकीची असून नूतनीकरण, फर्निचर खरेदी, बाधकाम आदि सर्व बाबी कंपनीतर्फे केल्या जातात. शाळेला शासनाचे अनुदान नाही. सर्व सोयीसुविधा कंपनी पुरविते व डेक्कन एज्युकेशन सोसायटी ही शाळा चालविते. तरीही अपीलकर्त्यानी मागितलेली माहिती जुन्या दप्तरात शोध घेण्याचा प्रयत्न केला असता उपलब्ध झाली नाही. तसे अपीलकर्त्यांना विहित मुदतीत कळविले.

अपिलीय प्राधिकारी - जन माहिती अधिकाऱ्यांचे निवेदन वस्तुस्थितीनुसार आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. ३० जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुधाकर तुकाराम बोराटे
सावतामाळीनगर, रिया आईस्क्रिम शेजारी,
मु. पो. ता. इंदापूर, जि. पुणे ४१३ ०१५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषी विस्तार अधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत जंक्शन, ता. इंदापूर , जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६४६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सुधाकर तुकाराम बोराटे
सावतामाळीनगर, रिया आईस्क्रिम शेजारी,
मु. पो. ता. इंदापूर, जि. पुणे ४१३ ०१५

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषी विस्तार अधिकारी,
पंचायत समिती इंदापूर, ता.इंदापूर, जि. पुणे श्री. ए. के. फडतरे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत जंक्शन, ता. इंदापूर , जि. पुणे श्री. निवृत्ती भिकू गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - ग्रामपंचायत निधी, बांधकामाला दिलेला परवाना आदि संदर्भातील दि. १/४/२०१७ ते ३१/३/२०१० पर्यंतची माहिती मागितली होती. परंतु अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिली.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्याचा मूळ अर्ज ग्रामपंचायतीला मिळालेला नाही. प्रथम अपिलाबाबत कळल्यानंतर तसे कळविले. तसेच अपीलकर्त्याकडे मागणी केली असता त्यानी अर्ज दिला नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांकडील अर्जानुसार माहिती दिली. ३ वर्षांच्या काळातील व 'बांधकाम परवाने, सर्व बांधकाम याची माहिती' अशा स्वरुपाची माहिती त्यानी मागितली असून कार्यालयीन कामातून अशा प्रकारे माहिती शोधून संकलित करुन देता येणार नाही.

तत्कालीन अपिलीय प्राधिकारी - ७ दिवसांत माहिती देण्याचे आदेश जन माहिती अधिकारी याना दिले. त्यानुसार त्यानी माहिती दिली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यानी विस्तृत स्वरुपात व सरसकट माहिती मागितली आहे. आवश्यक असल्यास त्याना अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मदनगोपाल गोविंदाराम बिहाणी
फ्लॅट नं. ५, सी विंग,सेजल पार्क, केशवनगर,
चिंचवडगांव, पुणे ४११ ०३३. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख, अहमदनगर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अधीक्षक,
भूमी अभिलेख, राहुरी, जि. अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२२०/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. मदनगोपाल गोविंदाराम बिहाणी
फ्लॅट नं. ५, सी विंग,सेजल पार्क, केशवनगर, चिंचवडगांव, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमी अभिलेख, अहमदनगर श्री. धनाजीराव काशीनाथ धायगुडे

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा उप अधीक्षक,
भूमी अभिलेख, राहुरी, जि. अहमदनगर श्री. दिलीप पुंडलिक चौधरी

| | |
|---|---|
| | **तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. सारीपुत्र शंकरराव तेळगोटे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता-मिळकत क्र. १३०६ कोणत्या कागदपत्रांच्या आधारे नगर भूमापन क्र.२७ मध्ये समाविष्ट केला, याची माहिती वारंवार स्मरणपत्रे देऊनही मिळत नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी माहिती देण्याचे आदेश दिलेले आहेत. ८ महिने होऊनही योग्य माहिती न देता शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्यास कळविले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी - अपीलकर्त्यांच्या दि. ५/६/२०१० च्या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. २५/६/२०१० च्या पत्रानुसार उत्तर देऊन कागदपत्रांच्या नकला प्राप्त करुन घेण्याबाबत रजिस्टर्ड पोस्टाने कळविले. परंतु शुल्क भरुन प्रत न घेता पुन्हा तशीच विचारणा त्यानी पत्राद्वारे केली. नगर भूमापन कामकाजाच्या वेळी मिळकत क्रमांक १३०६ अस्तित्वात नव्हता. कारण हा मिळकत क्रमांक १९७२ पूर्वी राहुरी बु ाा या गावाला ग्रामपंचायत असतानाचा आहे. त्यानंतर नगरपालिका अस्तित्वात आली. नगरपालिका मिळकतीचे कागदपत्र नगर भूमापन योजनेत ग्राहय धरण्यात आले. राहुरी बु ाा ता. राहुरी या गावात सन १९९४ च्या दरम्यान नगर भूमापन योजना मान्य झाली. त्यामुळे जागेवरील परिस्थिती व नगरपालिकेचा पुरावा गृहित धरुन तत्कालीन चौकशी अधिका-यांनी कार्यवाही केली. याबाबतची सर्व माहिती अपीलकर्त्यांना दिली असून संबंधित प्रकरणी दिवाणी न्यायालयात दावा सुरु आहे. सर्व परिस्थिती माहिती असताना अपीलकर्ता कोणतीही माहीत प्राप्त करुन न घेता मालकी हक्काबाबत आपल्याला हवा तसा निर्णय लावून घेण्यासाठी अशा प्रकारचे अर्ज, अपिले व पत्रव्यवहार करीत आलेले आहेत.

याच आशयाचा संपूर्ण तपशील देणारे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यानी सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून माहिती न मिळाल्याची त्यांची तक्रार दखलपात्र नाही. कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास नियमानुसार योग्य ते शुल्क भरुन ते प्राप्त करुन घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. ३० जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. वासुदेव जगय्या नराळ
९४/२३९, जोडभावी पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (प्रशासन),
वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिव्हिल लाईन, जी.पी.ओ.समोर, नागपूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२४२/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८/३/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. वासुदेव जगय्या नराळ
९४/२३९, जोडभावी पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (प्रशासन),
वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिव्हिल लाईन,
जी.पी.ओ.समोर, नागपूर श्री. प्रशांत लक्ष्मण शहापूरकर

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सोलापूर, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर श्री. अ. सु. काझी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - यशवंत सहकारी सूत गिरणी, सोलापूर व सोलापूर विणकर सहकारी सूत गिरणी, सोलापूर या दोन सहकारी सूत गिरण्या सप्टेंबर २००० मध्ये बंद पडल्या. त्यानंतर नियुक्त झालेले प्रशासक यानी उचललेली रक्कम, आर्थिक बाबीविषयीच्या नोंदीतील त्रुटी इ. विषयी वस्तुस्थिती नमूद करुन स्पष्टीकरण मागितले होते. दिलेली माहिती संशयास्पद असल्याचे नमूद करुनही अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी दि. ६/५/२०१० च्या अर्जात २३ मुद्दे मांडलेले आहेत. प्रशासकीय कार्यवाहीबाबतचे आक्षेप, तक्रारी, आरोप अशा स्वरुपाचे भाष्य करुन अनेक मुद्दयांचे स्पष्टीकरण त्यानी मागितले आहे. तरीही दि. ३१/५/२०१० च्या पत्रानुसार त्याना मुद्देनिहाय उत्तर दिले. सीडी मध्ये माहिती मिळण्याची त्यांची मागणी असली तरी अशा स्वरुपात मागणी उपलब्ध नाही व तयार करुन देणे शक्य नाही. उपलब्ध असलेली सर्व माहिती दिली असून कायदेशीर बाबींवरील अभिप्राय अथवा आरोपांबाबतचे स्पष्टीकरण माहितीच्या अधिकारात देता येणार नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्त्यांनी विविध संदर्भ नमूद करुन प्रशासकीय कार्यवाहीविषयीचे आक्षेप/आरोप नोंदविले आहेत व अवसायकांच्या आर्थिक व्यवहारासंबंधी प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच अवसायकांचे नियुक्तीपत्रक शंकास्पद असल्याचे नमुद करुन त्यांच्या सर्व व्यवहाराच्या चौकशीची/मागणी केली आहे. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत. उक्त अधिनियमाच्या कलम (२) मधील 'माहिती' च्या संज्ञेत देय ठरणारी माहितीच त्यानी मागणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी भिकोबा जाधव
लक्ष्मीकृपा, फ्लॅट नं. ५३, पद्मादर्शन सोसायटी,
पुणे-सातारा रस्ता, पुणे ४११ ००९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक वनसंरक्षक (भवका),
पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००९
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लेखापाल,
वन संरक्षक, पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ००९

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शिवाजी भिकोबा जाधव
लक्ष्मीकृपा, फ्लॅट नं. ५३, पद्मादर्शन सोसायटी, पुणे-सातारा रस्ता, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक वनसंरक्षक (भवका),
पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड, पुणे श्री. पोपट बाळाजी भालेकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लेखापाल,
वन संरक्षक, पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड,
पुणे श्री.नागेश आनंदराव शिंदे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मौजे सांबरेवाडी, ता. हवेली, जि. पुणे येथील जमीन वन विभागाने संपादित केली. अशी जमीन संपादित करताना अधिसूचना प्रसिध्द करुन नोटीस द्यावी लागते. तसे काहीही न करता वन विभागाचे नाव ७/१२ ला लागलेले आहे. त्या अधिसूचनेची प्रत मागितली होती. योग्य कायदेशीर कार्यपध्दती न अवलंबिता व आमचे क्षेत्र संपादनासाठी पात्र नसताना वन विभागाने त्यात आमचा समावेश करुन आमच्यासारख्या अल्प भूधारकाला उपजिविकेच्या साधनांपासून वंचित केले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर जरुर ती दुरुस्ती करुन आमची जमीन आम्हाला परत मिळावी.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी याच मुद्दयासंदर्भात वेळोवेळी विविध प्रकारचे अर्ज व पत्रव्यवहार केले असून त्या त्या वेळी उत्तरे दिली. तसेच दि. २५/६/२०१० चा अर्ज दि. २९/६/२०१० रोजी प्राप्त झाला. मागितलेल्या माहितीचा विषय सिंहगड कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे दि. ३०.६.२०१० रोजी अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला. दि. ५/८/२०१० रोजी माहिती दिली. सन १९५६-५७ साली दिलेल्या नोटिसा असून सन १९७५ मध्ये जमीन संपादित केली आहे. त्या कागदपत्रांच्या आधारे आम्ही दिलेली नोटीस व कार्यवाही उच्च न्यायालयाने ग्राहय मानली आहे. ७/१२ उताराऱ्यावर महसूल खात्याने नोंद घेतली आहे. जुनी माहिती असल्यामुळे शोध घेऊन उत्तर देण्यास विलंब झाला.

अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र त्याबाबतची माहिती उक्त अधिनियमानुसार विहित मुदतीत दिली जाणे आवश्यक आहे, याची समज जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल, वन संरक्षक, पुणे वन विभाग, पुणे श्री.नागेश आनंदराव शिंदे व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक (भवका), पुणे वन विभाग, पुणे श्री. पोपट बाळाजी भालेकर यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. नंदकुमार भालचंद्र भोंडवे
रा.एम.आय.डी.सी.पाईप लाईन रोड, रावेत, ता. हवेली, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
सेक्टर क्र. २४, निगडी, पुणे ४११ ०४४

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
सेक्टर क्र. २४, निगडी, पुणे ४११ ०४४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९५७/२०१०/पुण |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
सेक्टर क्र. २४, निगडी, पुणे श्री. सुहास दिवसे

**जन माहिती अधिकारी** तथा
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
सेक्टर क्र. २४, निगडी, पुणे श्री. एस. पी. उमाप

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पिंपरी-चिंचवड महानगर विकास प्राधिकरणाच्या चिखली येथील भूसंपादनाबाबत द्यावयाच्या परतावा जमिनीसंबंधी सन १९९६ ते २०१० या काळातील विस्तृत माहिती अपीलकर्ता श्री. नंदकुमार भालचंद्र भोंडवे यानी मागितली होती. भूखंड वाटपाबाबत अपीलकर्त्यांचा तक्रार असून त्यानी जमीन मालकाशी काही व्यवहार केलेले आहेत. त्याबाबत दिवाणी न्यायालयात दावा दाखल आहे. त्या अनुषंगाने दिवाणी स्वरुपाचे मुद्दे त्यानी उपस्थित केले आहेत. अशा मुद्दयांबाबत कायदेशीर अन्वयार्थ अथवा भाष्य माहितीच्या अधिकारात विचारता येणार नाही. अपीलकर्त्यांच्या दि. २१.८.२०१० च्या अर्जाला दि. १५.९.२०१० च्या पत्रान्वये उत्तर देऊन शुल्क कळविले व शुल्क भरल्यानंतर त्याना संबंधित कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या. कोणतीही माहिती नाकारलेली नाही. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती ते प्राप्त करुन घेऊ शकतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर क्र. २४, निगडी, पुणे श्री. एस. पी. उमाप व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, सेक्टर क्र. २४, निगडी, पुणे श्री. सुहास दिवसे यानी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहिती बाबत केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिगंबर वामन गोरडे
संतकृपा हौसिंग सोसायटी, म्हेत्रेवस्ती (चिखली), ता. हवेली, जि. पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
श्रीमती गोदावरी हिंदी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,
मुंबई- पुणे रोड, चिंचवड, पुणे - १९

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८८२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |
| **३.** | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री. दिगंबर वामन गोरडे
संतकृपा हौसिंग सोसायटी, म्हेत्रेवस्ती (चिखली), ता. हवेली, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
श्रीमती गोदावरी हिंदी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,
मुंबई- पुणे रोड, चिंचवड, पुणे श्री. आर. आर. मिश्रा

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता-श्रीमती गोदावरी हिंदी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, चिंचवड, पुणे यांच्याकडील बांधकामाचा नकाशा, मंजुरीची प्रत, शिक्षक भरती इ. बाबींची सन १९८८ पासूनची माहिती मागितली होती. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी शुल्क कळविले. माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - व्यक्तिशः येऊन माहिती घेणार असल्याचे अपीलकर्त्यांनी अर्जात नमूद केले होते. आमची माहिती तयार होती. ते न आल्यामुळे उपलब्ध माहिती टपालाने पाठविली. नवीन इमारत संस्थेने बांधलेली नाही. त्यामुळे बांधकामाचा नकाशा वगैरे माहिती देता आली नाही. सध्या पत्र्याच्या शेडमध्ये शाळा चालू आहे. तसेच या स्वरुपाची माहिती संस्थेकडे असते, महाविद्यालयाकडे नसते.

व्यक्तिशः येणार असल्याचे अपीलकर्त्याने अर्जात नमूद केले असले तरी माहिती तयार असल्याचे त्याना कळविणे आवश्यक आहे. अपीलकर्त्यांनी भरलेले शुल्क रु. २६/- त्याना परत करावे. संस्थेकडील माहिती अपीलकर्त्यांनी संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यास शुल्काची रोख रक्कम दि. २७/६/२०११ रोजी परत केल्याचे अपीलकर्त्याच्या पोच पावतीसह जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, श्रीमती गोदावरी हिंदी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मुंबई- पुणे रोड, चिंचवड, पुणे श्री. आर. आर. मिश्रा यानी दि. २८/६/२०११ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. असिन कुमार मुखर्जी
साउथ समाज स्ट्रीट, थपडखाना,
राँची ८३४ ००१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ४११ ००७

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे ४११ ००७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०१४/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे श्रीमती अरुणा वि. चव्हाण

**जन माहिती अधिकारी** सौ. मेघना रा. सावंत-भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

अपीलकर्ता श्री. असिन कुमार मुखर्जी यानी एका विद्यार्थ्याच्या ऑक्टोबर २००९ मध्ये झ ालेल्या अभियांत्रिकी परीक्षेच्या एका विषयाच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत मागितली होती. परंतु संबंधित विद्यार्थी वगळता अन्य व्यक्तींना अशी प्रत देता येत नसल्याचे त्याना विहित मुदतीत कळविले. त्याबाबतच्या विद्यापीठाच्या अध्यादेशाची प्रतही त्याना पाठविली. संबंधित विद्यार्थी हा आपला मुलगा असल्याचे त्यानी नंतर कळविले. परंतु तरीही विद्यापीठाच्या नियमानुसार संबंधित व्यक्तीच विशिष्ट मुदतीत उत्तरपत्रिकेची प्रत मागू शकते. परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून उत्तरपत्रिका ६ महिनेच जतन केल्या जातात, त्यामुळे देणे शक्य नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहा.कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे श्रीमती अरुणा वि. चव्हाण यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. काशिनाथ जनार्दन काळे
११५०, रविवार पेठ, जनार्दन निवास, पुणे ४११ ००२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव,
आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ लिपिक,
निवडणूक विभाग, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३११९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. काशिनाथ जनार्दन काळे<br>११५०, रविवार पेठ, जनार्दन निवास, पुणे ४११ ००२<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ लिपिक,<br>निवडणूक विभाग, औरंगाबाद महानगरपालिका,<br>औरंगाबाद श्री. आबेद अलिखान | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - आमचा एक भाडेकरु भाडयाची खोली बंद करुन औरंगाबादला गेली कित्येक वर्षे कायमचे वास्तव्य करुन रहात आहे. त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांची नावे असलेल्या मागील दोन निवडणूक मतदार याद्या मागितल्या होत्या. परंतु विहित मुदतीत माहिती मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांनी मतदार यादीचा क्रमांक आदि तपशील दिलेला नव्हता. तसेच त्यांच्या मागणीचा बोध होत नव्हता. त्यामुळे विचारणा केली. तसेच त्यानी नमूद केलेल्या प्रभागात संबंधितांची नावे नव्हती. अन्य प्रभागाच्या मतदार यादीतून ती नावे शोधून यादीची प्रत त्याना पुरविली.

वस्तुतः मतदार यादी हे सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेले अभिलेख असून अशा कागदपत्रांच्या प्रतींची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत केल्यास ती देणे, तसेच नावे शोधून संबंधित यादी देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. तरीही जन माहिती अधिकारी यानी माहिती दिली आहे, हे उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. कल्पना विलास बाणेकर
विजया अपार्टमेंट, फ्लॅट नं. १७, दुसरा मजला,
भैरवनाथ नगर, काटे-पिंपळ रोड, पिंपरी गाव, पुणे ४११ ०१७. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे ४११ ००२
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ, खडकमाळ आळी, पुणे ४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०५२/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/६/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. कल्पना विलास बाणेकर
विजया अपार्टमेंट, फ्लॅट नं. १७, दुसरा मजला, भैरवनाथ नगर,
काटे-पिंपळ रोड, पिंपरी गाव, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय हवेली, शुक्रवार पेठ,
खडकमाळ आळी, पुणे श्री. रणजित राजकुमार भोसले

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्त्या - लिज पेंडन्सीबाबत योग्य कार्यवाही होत नसल्यामुळे त्याबाबतच्या नियमातील तरतुदी आदिबाबतची विचारणा करणाऱ्या अर्जावर योग्य माहिती मिळत नाही. लिज पेंडन्सीच्या दस्ताप्रमाणे मिळकतीत माझ्या नावाची इतर हक्कात नोंद करण्याची मागणी वारंवार करुनही कार्यवाही केलेली नाही. लिज पेंडन्सीची नोंद न करण्याबाबत कायद्यात/नियमात दुरुस्ती/सुधारणा झालेली नसताना तहसीलदार, हवेली यानी बेकायदेशीर कार्यवाही केली आहे. या सर्व बाबींची चौकशी होऊन कायद्यात दुरुस्ती होत नाही तोपर्यंत लिज पेंडन्सीच्या नोंदी करण्याचे आदेश जारी करावेत.

जन माहिती अधिकारी - लिज पेंडन्सीबाबतची प्रशासकीय कार्यवाही, त्या विषयीची तक्रार व कार्यवाहीची मागणी असे अपीलकर्त्यांच्या अर्जाचे स्वरुप आहे. या बाबी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा विषय नाही. त्या बाबतच्या नियमांच्या तरतुदीची माहिती अपीलकर्त्यास दिलेली असून अन्य बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

जन माहिती अधिकारी यांचे निवेदन रास्त आहे. तथापि अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसल्यास तसे विहित मुदतीत कळविणे आवश्यक आहे याची समज जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना देण्यात येत आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. बाळकृष्ण महादेव आपटे
रा. २७३, प्रताप सहकारी संस्था, सहकारनगर क्र. २, पुणे ४११ ००९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष कार्यकारी अधिकारी,
भूमिप्रापण - भूसंपादन कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
भूमी प्रापण कार्यालय, आयातकर भवन, पुणे महानगरपालिका, पुणे

<table>
<tr><td>१</td><td>अपील क्रमांक</td><td>२९६२/२०१०/पुणे</td></tr>
<tr><td>२</td><td>सुनावणीची तारीख</td><td>दि. १२/५/२०११</td></tr>
<tr><td colspan="3">३. उपस्थित<br><br>अपीलकर्ता श्री. बाळकृष्ण महादेव आपटे<br>रा. २७३, प्रताप सहकारी संस्था, सहकारनगर क्र. २, पुणे ४११ ००९<br><br>जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,<br>भूमी प्रापण कार्यालय, आयातकर भवन,<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री. ललित मधुकर बोंद्रे</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.</td></tr>
</table>

## <u>विवेचन</u>

पुण्यातील पर्वती भागातील गांधी ट्रेनिंग कॉलेज चौक ते पर्वती पायथा हा रस्ता ५० फूट रुंदीचा होण्याचे महाराष्ट्र शासनाने सन १९८० मध्ये राजपत्रात प्रसिध्द केले होते.परंतु पुणे महानगरपालिकेने रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष केल्यामुळे सन १९९७ पासून मी व त्या भागातील अनेक नागरिक या रस्त्यासाठी महानगरपालिकेकडे पाठपुरावा करीत आहेत. लोकशाही दिनातही १८ वेळा उपस्थित राहून मी अर्ज दिले आहेत. अनेक अधिकारी बदलून गेले. परंतु या अर्जांना उत्तरही मिळत नाही, व रस्त्याचा प्रश्न मार्गी लागलेला नाही. या रस्त्यासाठी संबंधित जागा महानगरपालिकेने ताब्यात घेतल्याशिवाय हे काम मार्गी लागणार नाही. महानगरपालिकेच्या विविध खात्यांतील अनेक अधिकाऱ्यांना वारंवार भेटून व चर्चा करुनही गेल्या ३० वर्षांत हा प्रश्न सुटत नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता (वय वर्षे ८३) यानी केले. हा सार्वजनिक हिताचा प्रश्न असून कोणतीही वैयक्तिक मागणी वा लाभ त्याच्याशी निगडित नाही, असेही त्यानी आवर्जून नमूद केले.

विकास आराखडयात हा ५० फुटी रस्ता प्रस्तावित आहे. श्री. आपटे व अन्य नागरिकांच्या मागणीनुसार महानगरपालिकेमध्ये त्या बाबत अद्याप ठराव झालेला नाही व या कामासाठी अर्थ संकल्पात तरतूदही झालेली नाही. प्रत्यक्ष जागा ताब्यात घेण्यासाठी कार्यवाही केलेली नाही. सर्वेक्षण चालू आहे. संबंधित खात्याशी याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे, व त्याबाबतची माहिती श्री. आपटे याना वेळोवेळी दिलेली आहे.

अपीलकर्ता हे ज्येष्ठ नागरिक असून सार्वजनिक कामासाठी माहितीच्या अधिकाराचा वापर करीत आहेत, ही बाब उल्लेखनीय आहे. तथापि त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. त्यामुळे संबंधित सर्व कागदपत्रांच्या प्रती त्याना देण्याव्यतिरिक्तची कार्यवाही या अधिनियमांतर्गत होऊ शकत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. ३० जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. जयंतीलाल हरकचंद चोरडिया
१२५४, नवी भवानी पेठ, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पुणे परिमंडळ, ब्लॉक नं. ८, प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ, पुणे ४११ ०११
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
पुणे परिमंडळ, ब्लॉक नं. ८, प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ, पुणे ४११ ०११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९५८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>पुणे परिमंडळ, ब्लॉक नं. ८, प्रशासकीय इमारत,<br>रास्ता पेठ, पुणे श्री. आत्माराम बाबुराव खांडेकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

विजेचे मिटर घेण्यासाठी लागणारी कागदपत्रे व नियमावली याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. जयंतीलाल हरकचंद चोरडिया यानी दि. ५/७/२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. कळविलेले शुल्क त्यानी भरल्यानंतर दि. २७/७/२०१० रोजी माहिती दिली. परंतु माहिती चुकीची, दिशाभूल करणारी व खोटी असल्याचा आरोप करुन मूळ कागदपत्रावर माहिती मिळाल्याची केलेली सही खोडून त्यानी माहिती नाकारली व परत केली. म्हणून दि. ३०.६.२०१० रोजी रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. प्रथम अपिलाच्या अर्जाला त्यानी नियमानुसार २० रुपयांचे शुल्क न जोडता १० रुपयांचे शुल्क जोडले होते. तरीही अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अपीलकर्त्यांनी नंतर उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांच्या अनुषंगाने महाराष्ट्र वीज वितरण नियामक आयोग, मुंबई यांच्या विद्युत पुरवठा संहितेसह विविध कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क पाठविल्या, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, पुणे परिमंडळ,ब्लॉक नं.८, प्रशासकीय इमारत, रास्ता पेठ, पुणे श्री. आत्माराम बाबुराव खांडेकर यानी पाठविलेल्या माहितीच्या प्रतीसह केले. अपीलकर्ता विविध स्वरुपाचे प्रश्न उपस्थित करुन भाष्य, खुलासा वजा विचारणा करीत असतात, असेही त्यानी नमूद केले.

खुलासा, स्पष्टीकरण, अन्वयार्थ अशा स्वरुपाची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच नियमावलीसारखी सार्वजनिकरीत्या उपलब्ध असणारी माहिती जन माहिती अधिकाऱ्यांच्याच कक्षेतील असल्याचे म्हणता येणार नाही व म्हणून ती देणे जन माहिती अधिकाऱ्यांवर बंधनकारक नाही. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ नुसार अशी माहिती संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंस्फूर्तीने जाहीर केलेली असली पाहिजे. अशी माहिती सहजपणे उपलब्ध होणारी नसल्यास मात्र जन माहिती अधिकाऱ्यांनी ती द्यावी लागेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

डॉ. मीनाक्षी माधव बोराटे
समर्थ हॉस्पिटल, ४८४/६, मित्रमंडळ कॉलनी, पर्वती, पुणे - ९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झोन क्र. ३,
पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झोन क्र. ३,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७८५/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ. मीनाक्षी माधव बोराटे
समर्थ हॉस्पिटल, ४८४/६, मित्रमंडळ कॉलनी, पर्वती, पुणे - ९

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झोन क्र. ३,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सुरेश एकनाथ देसाई

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - विकास आराखडयात माझ्या मालकीची काही जमीन रीतसर घेतली जाणार असल्याचे कळल्यावरुन माझ्या व माझ्या पतीच्या मालकीची किती जमीन संपादित होण्याची शक्यता आहे, याची माहिती मागितली होती. आमच्या जमिनीचे ७/१२ उतारे व सरकारी मोजणीचा नकाशा सोबत जोडून या नकाशावरुन जाणारी जमीन आखून देण्याची मागणी केल्यानुसार प्रथम अपिलाच्या सुनावणीमध्ये बांधकाम खात्याने तसा नकाशा आखूनही दिला. परंतु तो चुकीचा आहे. सरकारी प्रतिनिधीने प्रत्यक्ष जागेवर केलेल्या आमच्या जमिनीच्या मोजणीचा नकाशा दुरुस्त करुन द्यावा.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्त्यांना विभागाचे सीमांकन (झोन डिमार्केशन) करुन दिले. जागेच्या मालकीसंदर्भात त्यांचा दावा व ७/१२ वरील नोंद यात तफावत असून या प्रकरणी न्यायालयात दावा चालू आहे.त्यांच्या मागणीनुसार नकाशा सुधारुन देता येणार नाही.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता नकाशा दुरुस्ती करुन देण्याची अपीलकर्त्यांची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि. ३० जून २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. शंकर तुळशीराम थोरात
७२/८२, नखीर तानाजी वाडी,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक,
भूमि अभिलेख, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी क्र. १,
पुणे यांचे कार्यालय, पुणे ४११ ००१.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६३८/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ८/४/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. शंकर तुळशीराम थोरात
७२/८२, नखीर तानाजी वाडी, शिवाजीनगर, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी क्र. १,
पुणे यांचे कार्यालय, पुणे श्री. सुनिल सो. इंदलकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आयोगापुढील सुनावणीत अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता - मिळकत क्षेत्रफळ व नावे नोंदविण्याची पध्दत याबाबत विचारलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याच्या कारणावरुन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नाकारली.

जन माहिती अधिकारी - अपीलकर्ता यानी केवळ प्रश्नार्थक विचारणा केली नसून अभिप्राय, स्पष्टीकरण अशा स्वरुपाची व मोजमापाबाबतचे गणिती विश्लेषण करुन उत्तर देण्याची मागणी केली आहे. तशी माहिती देता येत नसून संबंधित मिळकतीबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती हव्या असल्यास लागणारे शुल्क कळविले. शुल्क भरल्यास त्याना या प्रती मिळू शकतील.

जन माहिती अधिकारी यानी केलेली कार्यवाही योग्य असून प्रथम अपिलाच्या सुनावणीला दोन तारखा दिल्या व अपील अमान्य केले, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे श्री. बा. वा. वानखेडे यांचे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी यानी सादर केले.

स्पष्टीकरण, अन्वयार्थ अशा स्वरुपाची विचारणा व विशिष्ट तक्त्यात माहिती देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. मुरलीधर दत्तात्रय वारुंजीकर
ए-३०२, कुमार प्रयोग, ५९६ नारायण,
पुणे - ३०. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७९/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०/५/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. मुरलीधर दत्तात्रय वारुंजीकर<br>ए-३०२, कुमार प्रयोग, ५९६ नारायण, पुणे - ३०. | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता नसलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा राजपत्रात समावेश करण्याबाबत मागणी केली होती. तसेच महाराष्ट्र वैद्यक परिषदेच्या अधिनियमानुसार काढलेल्या अधिसूचनांबाबतची आधारभूत कारणे व कागदपत्रे मागितली होती. योग्य माहिती अद्याप मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. मुरलीधर दत्तात्रय वारुंजीकर यानी केले.

अपीलकर्त्यांच्या मागणीच्या संदर्भातील प्रस्ताव/नस्त्या शासनाला सादर करण्यात आलेल्या असल्यामुळे शासनाकडून त्या पुन्हा उपलब्ध झाल्यानंतर माहिती देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी  व अपिलीय प्राधिकारी यानी स्पष्ट केले होते. आता संबंधित कागदपत्रे आमच्या विभागात उपलब्ध झाली असून त्याच्या प्रती अपीलकर्त्यांना निःशुल्क देण्यात येतील, असे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई श्री. वि. ला. ढोले यानी आयोगाला सादर केले.

निर्णयाबाबतचे स्पष्टीकरण, प्रशासकीय कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५अंतर्गत येत नाही.मात्र संबंधित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याविषयीच्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार देणे बंधनकारक असल्याची समज जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई श्री. स्वप्नील बोरसे व अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई श्री. वि.ला.ढोले यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० जून २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००

श्री. बाळासाहेब भुजबळ
भारतीय मजदूर संघ कार्यालय, विश्वकर्मा भवन,
१८५, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सल्लागार ( कामगार)
पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आयातकर अधीक्षक,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९७६/२०१०/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/५/२०११ |

**३. उपस्थित**

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा आयातकर अधीक्षक,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. प्रदीप मुकुंद आंबेडकर

**तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. अरुण भगवान खिलारी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पुणे महानगरपालिकेने विविध विभागामध्ये ठेकेदार पध्दतीने नेमलेल्या कामगार/कर्मचाऱ्यांच्या अनुषंगाने ठेकेदारांची नावे, कामगारांना दिले जाणारे वेतन, आदिबाबतची माहिती अपीलकर्ता

श्री. बाळासाहेब भुजबळ यानी मागितली होती. विविध खात्यांकडील ही माहिती असल्यामुळे त्या त्या खात्याकडे अर्ज वर्ग केला. १४ खात्यांनी उत्तरे दिली. दोन खात्यांकडील माहिती परिपूर्ण न मिळाल्याची तक्रार अपीलकर्त्यांनी प्रथम अपिलाच्या वेळी केली. १५ दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी दिले. त्यानुसार त्या खात्यांनीही माहिती दिली. परंतु अपीलकर्त्यांचे समाधान झाले नाही. माहिती-मागणीचा विषय सर्वसाधारण स्वरुपाचा असल्यामुळे सर्व खात्यांकडून माहिती घेणे आवश्यक होते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा आयातकर अधीक्षक, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. प्रदीप मुकुंद आंबेडकर यानी केले.

सर्व खात्यांनी अर्धवट माहिती दिली असल्याची तक्रार अपीलकर्त्यांनी अपील अर्जात केली असून ठेकेदार कामगार कायदा १९७० अन्वये मूळ मालक ( एम्प्लॉयर) पुणे महानगरपालिका असल्याने कामगारविषयक कायद्यांचे पालन व कामगारांचे हित या दृष्टीने सर्व माहिती परिपूर्ण मिळणे आवश्यक असल्याचे त्यानी म्हटले आहे. विषय सार्वजनिक हिताचा आहे, हे लक्षात घेता अपीलकर्त्यास संपूर्ण तपशीलवार माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्यांच्या अर्जानुसार संपूर्ण माहिती दिल्याबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी यानी दि. ३०/७/२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २० जून २०११**